


# मंथन

२००६

संकल्पना :
अवघ्या प्राणिमात्राचा सन्मित्र,
करुणाकर

**मंथन** सन्मानचिन्ह :
षांताराम पवार

**संपादक**
भूषण ठाकूर

**संपादन सहाय्य**
गोपाळ आजगांवकर, सुधाकर बोरकर

**मुखपृष्ठ**
सुनील महाडिक

**छायाचित्रण**
शेखर पितळे / आदित्य जोशी

**अक्षररचना**
आदित्य जोशी

**डिजीटल प्रक्रिया**
प्रवीण वर्मा

**आतील छायाचित्रे**
संदेश भंडारे

■

**प्रकाशक**
भूषण ठाकूर
निमंत्रक
महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य गौरव पुरस्कार समिती
केशव गोरे स्मारक ट्रस्ट, 'स्मृती', आरे रोड
गोरेगाव (पश्चिम)
मुंबई ४०० ०६२

■

**मुद्रक**
प्रकाश विश्वासराव
न्यू एज प्रिंटिंग प्रेस, भूपेश गुप्ता भवन
८५, सयानी रोड, प्रभादेवी
मुंबई ४०० ०२५

# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार प्रदान समारंभ २००६

अध्यक्ष

**रामदास भटकळ**

प्रमुख पाहुणे

**बाबा आढाव**

सूत्रसंचालन

**दत्ता बाळसराफ**

**समारंभ**

शनिवार दिनांक ३० डिसेंबर २००६, सायंकाळी ५ वाजता
यशवंतराव चव्हाण नाट्यसंकुल (यशवंत नाट्यगृह), मनमाला टँक रोड
माटुंगा-माहीम, मुंबई - ४०० ०१६

## २००६ चे मानकरी

### संस्था

**आंबेडकर अकादमी** सातारा

**पुणे शहर मोलकरीण संघटना** पुणे

### विशेष पुरस्कार

**पन्नालाल सुराणा**

### व्यक्ती पुरस्कार

**रूपा कुळकर्णी** नागपूर

**अनंत फडके** पुणे

**वाहरू सोनवणे** नंदूरबार

### सत्कार

**मनीषा वर्मा**

समारंभाचे अध्यक्ष

# रामदास भटकळ



कार्य करण्याची प्रचंड ऊर्जा, तरुणपणात प्रौढांना लाजवेल अशी प्रगल्भता आणि आता सत्तरीतही तरुणाईला लाजवेल असा कामाचा उत्साह, भोवतालच्या जगाविषयीचे अपार कुतूहल आणि उत्सुकता या तीन वाक्यांत रामदास भटकळ यांचे यथार्थ वर्णन करता येईल. परंपरेने चालत आलेला प्रकाशन व्यवसाय, इंग्रजी-मराठीपुस्तकांचा व्यासंग, लेखन, शास्त्रीय संगीताचा रियाज आणि मैफली, पी.एच.डी.चा अभ्यास आणि शोधप्रबंध, साने गुरुजी स्मारक ट्रस्टच्या वतीने अनुवाद सुविधा केंद्राची उभारणी अशा विविध आघाड्यांवर एकाच वेळी कार्यरत राहण्याची किमया भटकळांना साध्य झाली आहे ती त्यांच्या अंगच्या या गुणत्रयीमुळेच.

एल्फिन्स्टन महाविद्यालयात शिकत असतानाच त्यांना साहित्याची गोडी लागली ती घरच्या पुस्तकविक्रीच्या व्यवसायामुळे. १९२४ साली वडील, गणेश रामराव भटकळ यांनी सुरु केलेल्या पॉप्युलर बुक डेपोचा वारसा त्यांना मिळाला तरी ते मनापासून रमले पुस्तकविक्रीपेक्षाही पुस्तकांच्या प्रकाशनांतच. इंग्रजी पुस्तकांचे प्रकाशन प्रथमपासूनच वडील बंधू सदानंद पाहत होते. रामदासांनी आपल्या अभिरुचीनुसार मराठी प्रकाशनाला आकार देण्यास सुरुवात केली. वयाच्या सतराव्या वर्षीच गंगाधर गाडगीळांच्या कथालेखनाचे सामर्थ्य ओळखून त्यातील कलामूल्यांना उठाव येईल अशा प्रकारचे संपादन करत त्यांनी 'कबुतरे' हे पहिले पुस्तक प्रकाशित केले. त्यातच पॉप्युलरच्या पुढील वाटचालीची बीजे स्पष्ट झाली. प्रयोगशील लेखनाचे स्वागत करण्याची वृत्ती आणि उत्तम ते निवडण्याची दृष्टी यामुळे भटकळांनी गेल्या पन्नास वर्षांत पॉप्युलर प्रकाशन या संस्थेला एका वेगळ्याच उंचीवर नेऊन ठेवले. सुमारे एक हजार मराठी आणि जवळपास तेवढीच इंग्रजी पुस्तके पॉप्युलरतर्फे प्रसिद्ध करताना त्यांनी लेखकाच्या नव्याजुन्या पिढीचा फरक केला नाही. सकस आणि चिरकाल टिकणारे लेखन असावे हा एकमेव निकष लावून काम केल्यानेच आज पॉप्युलरच्या यादीत काका कालेलकर, मामा वरेरकर, मो. ग. रांगणेकर, विश्राम व मालतीबाई बेडेकर यांचाही समावेश नवसाहित्यिकांच्या बरोबरीने झालेला दिसतो.

मराठी साहित्याबरोबरच नाटकांचे वेड हाही भटकळांच्या स्वभावाचा एक पैलू. कॉलेजच्या काळात मामा पेंडसे यांच्याकडून अभिनय, दिग्दर्शन यांचे धडे गिरवण्यापर्यंत हे वेड होतेच. पुढे प्रकाशनाच्या व्यापात ही आवड फार प्रगती करू शकली नाही, तरी वृत्तपत्रांतून नाटकांचे परीक्षण करणे आणि मराठीतील उत्तमोत्तम नाटकांच्या संहितांचे प्रकाशन करणे, यासाठी या आवडीचा मोठा फायदा भटकळांना झाला. नाटकांच्या संहितांचा साहित्यकृती म्हणून विचार व्हावा या दृष्टिकोनातून त्यांनी नाट्यसंहितांचे प्रकाशन केले.

नाटकांप्रमाणेच विक्रीच्या दृष्टीने तोट्यात जाणारा म्हणून अनेक प्रकाशनसंस्थांनी नाकारलेला कविता हा वाङ्मयप्रकार भटकळांनी अतिशय आत्मीयतेने जोपासला आणि थेट विंदा, कुसुमाग्रजांपासून अगदी अलीकडच्या प्रफुल्ल शिलेदारपर्यंतच्या बहुतेक महत्त्वाच्या कवींची कविता रसिकांना उपलब्ध करून दिली.

केवळ मराठीच नव्हे तर इंग्रजी प्रकाशनातही वेगळा ठसा उमटवेल असे काम पॉप्युलरने केले आहे ते भटकळांच्या संपादनकुशलतेमुळेच. त्यातही सामाजिक शास्त्रे, राजकीय प्रबोधनपर पुस्तके यामध्ये पॉप्युलरने आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पुस्तकांची निर्मिती केली.

एक प्रथितयश व्यावसायिक प्रकाशक म्हणून भटकळांना या क्षेत्रातले सर्व मानसन्मान त्यांच्या ऐन उमेदीतच प्राप्त झाले आहेत. सोव्हिएत राष्ट्रसंघ आणि अमेरिका यांच्या निमंत्रणावरून भारतीय प्रकाशन व्यवसायाचे प्रतिनिधित्व करण्याचा मान त्यांना मिळाला. त्याचबरोबर मराठी प्रकाशक संमेलनाचे अध्यक्षपद तसेच बॉम्बे बुकसेलर्स अॅण्ड पब्लिशर्स असोसिएशन, फेडरेशन ऑफ इंडियन पब्लिशर्स, कॅपॉक्सिल या निर्यातविषयक संस्थेचा ग्रंथविभाग अशा महत्त्वाच्या संस्थांचे अध्यक्षपद त्यांना मिळाले ते त्यांच्या प्रकाशन कार्यातल्या

नवीनतेमुळेच. याच कारणाने महाराष्ट्र फाउण्डेशनसह अनेक महत्त्वाचे पुरस्कार भटकळांना प्रकाशक म्हणून मिळाले आहेत.

गेले अर्धशतक उत्तरोत्तर पॉप्युलरचा व्याप वाढत असताना भटकळ या एकाच कार्यात गुंतून पडले नाहीत ते त्यांच्या बहुआयामी व्यक्तिमत्त्वामुळेच. पॉप्युलर प्रकाशन ही व्यक्तिकेंद्री संस्था न राहता तिला व्यावसायिक रूप देण्याचा निर्धार करून त्यांनी त्यानुसार नवीन पिढीला प्रशिक्षित केले आणि आजच्या कॉर्पोरेट जगात पाय रोवून उभे राहण्याची ताकद या संस्थेत निर्माण केली.

पॉप्युलरच्या व्यापातूनही सवड काढून त्यांनी आपले इतर छंद जोपासले. विविध नियतकालिकांतून लेखन चालू असतेच, त्याच्या जोडीने गायनाचा रियाजही चालू असतो. गाण्याची आवड त्यांना बालपणापासूनच होती. पं. चिदानंद नगरकर यांच्याशी असलेल्या नातेसंबंधामुळे ते संगीताकडे ओढले गेले. वयाच्या सातव्या-आठव्या वर्षापासून सुरू झालेल्या या आवडीला मधल्या काळात कामाच्या व्यापामुळे खंड पडला होता.पण या आवडीतूनच संगीतविषयक अनेक उत्तमोत्तम ग्रंथांचे प्रकाशन त्यांनी केले. गेल्या वीस-पंचवीस वर्षांपासून त्यांनी पं.एस.सी. आर. भट यांच्याकडे पुन्हा गाण्याची तालीम घेण्यास सुरुवात केली असून देशविदेशात त्यांच्या गाण्याच्या मैफलीही झाल्या आहेत.

भटकळांच्या मनाला व्यापून राहिलेला आणखी एक विषय म्हणजे महात्मा गांधी. मात्र फुटकळ वाचनातून आपले मत बनविण्यापेक्षा गांधींच्या तत्त्वज्ञानाचा सर्वसमावेशक सखोल विचार करण्याच्या प्रेरणेतून त्यांनी सुप्रसिद्ध गांधीवादी विदुषी उषा मेहता यांच्या मार्गदर्शनाखाली 'गांधी ॲण्ड हिज ॲडव्हर्सरीज' या विषयाचा अभ्यास सुरु केला. गांधींचे दोन कट्टर विरोधक डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या दृष्टिकोनातून गांधींच्या तत्त्वांचा अभ्यास करणारा शोधप्रबंध त्यांनी मुंबई विद्यापीठाला सादर केला. तो मान्य होऊन भटकळांना २००६ साली पीएच.डी. पदवी प्राप्त झाली. हा अभ्यास करताना गांधीजींच्या अनेक लहान-मोठ्या सहकाऱ्यांची व्यक्तिचित्रे भटकळांनी 'साधना' साप्ताहिकातून 'मोहनमाया' या सदरातून रेखाटली. या व्यक्तिचित्रांचा 'मोहनमाया' नावाचा संग्रह लवकरच मौज प्रकाशनातर्फे प्रसिद्ध होत आहे.

माणसांशी संवाद साधण्याची आवड, इतरांना सोबत घेऊन काम करण्याची, इतरांच्या मतांचा आदर करण्याची आणि आपल्या सहकाऱ्यांना निर्णयस्वातंत्र्य देण्याची उदार मनोवृत्ती यांमुळे भटकळांचा मित्रपरिवार फार मोठा आहे. यात समाजातल्या सर्व स्तरांतल्या, विविध क्षेत्रांतल्या आणि वेगवेगळ्या वयोगटातल्या माणसांचा समावेश आहे. प्रसन्न व्यक्तिमत्त्व, चेहऱ्यावर कायम असलेले स्मित आणि सौम्यपणे संवाद साधण्याची हातोटी यामुळे ते सहजपणे समोरच्या व्यक्तीला जिंकू शकतात. त्यांच्या या स्वभावामुळे त्यांचे आपल्या लेखकांबरोबरचे संबंध केवळ व्यावसायिक पातळीवर न राहता त्याला जिव्हाळ्याचे रूप मिळाले. आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर भेटलेल्या व्यक्ती आणि त्यांच्याशी जडलेले विविध प्रकारचे नातेसंबंध यांचा शोध घेण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या 'जिगसॉ' या पुस्तकात केला आहे.

माणसे जोडण्याच्या या वृत्तीमुळे एरवी अवघड वाटणारे अनेक प्रकल्प त्यांनी लीलया पार पाडले. पॉप्युलर प्रकाशनाद्वारे प्रकाशनाचेच वेगळे अंकुर म्हणता येतील अशा अनेक गोष्टी केल्या. त्यात चित्रकार प्रभाकर गोरे यांच्या चित्रांचे प्रदर्शन होते, 'स्मृतिचित्रे'वर आधारित सुहास जोशींचे एकपात्री प्रयोग होते. त्यांनी विजय तेंडुलकरांच्या नाट्यवाचनाच्या कॅसेट्स काढल्या. मराठी कादंबऱ्यांवर आधारित दूरदर्शन मालिका निर्माण केली. सर्वसामान्य वाचकांसाठी कादंबरीवरचे आस्वाद शिबीर भरवले. या साऱ्या प्रयोगशील प्रकाशनांचे यश आणि झपाट्याने आकारास येत असलेले अनुवाद सुविधा केंद्र हे त्यांच्या याच स्वभावाचे द्योतक आहे.

उत्साहाने कामाची आखणी करून त्याच्या पूर्ततेसाठी अथक प्रयत्न करतानाच 'एकला चालो रे' पेक्षा 'साथी हाथ बढाना' ही वृत्ती ठेवून इतरानांही कामाला लावण्याची हातोटी त्यांना साध्य झाली आहे. त्यांची ही आणि एखाद्या गोष्टीचा ध्यास घेण्याची आज दुर्मीळ होत चाललेली वृत्ती त्यांच्या तरुण सहकाऱ्यांना प्रेरणादायी ठरत असते.

**अस्मिता मोहिते**

## समारंभाचे प्रमुख पाहुणे

# बाबा आढाव



महाराष्ट्राच्या पातळीवर कष्टकरी-शोषितांच्या वतीने असा एक दूर पल्ल्याचा लढा उभारण्याचे प्रयत्न गेली चाळीस-पन्नास वर्षे बाबा आढाव आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चालवले आहेत. गेली पन्नास वर्षे टिकून राहिलेली, वाढलेली आणि संघर्षशील राजकारणात आघाडीवर राहिलेली चळवळ म्हणून बाबा आढावांच्या नेतृत्वाखालील कष्टकऱ्यांच्या चळवळीचे मोठेपण नि:संशय मान्य करावे लागेल. बाबा आढाव यांच्या नेतृत्वाखालील हमाल पंचायत आणि इतर संलग्न संघटनांनी निरनिराळ्या कष्टकरी समूहांच्या संघटनाचे जे प्रयोग गेली अनेक वर्षे राबवले ते केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातील इतर ठिकाणीही विरळाच सापडतील.

गेली पन्नास वर्षे बाबा हमालांचे नेते आहेत. पण हमालांबरोबरच धरणग्रस्तांचे, देवदासींचे, रिक्षावाल्यांचे, पथारीवाल्यांचे, बांधकाम मजुरांचे, टेम्पोचालकांचे, कागद-काच-पत्रा वेचणाऱ्या गरीब मजुरांचेही नेते आहेत. १९५५ मध्ये सुरु झालेल्या हमाल पंचायतीचा पसारा महाराष्ट्रभर वाढत जाऊन बोजा उचलणाऱ्या हमाल कामगारांची ती एक प्रमुख संस्था बनली आहे हे तर खरेच, परंतु त्याचबरोबर शहरांमधील असंघटित क्षेत्रातील, हातावर पोट असणाऱ्या, शारीरिक श्रम हीच एकमेव संपत्ती असणाऱ्या मजुरांचे संघटन करीत, त्यांना जोडून घेत - बाबांच्या नेतृत्वाखालील 'हमाल पंचायत' ही आता कष्टकऱ्यांच्या चळवळीचे नेतृत्व करणारी एक मध्यवर्ती संघटना बनली आहे.

बाबा आढावांच्या नेतृत्वखालील कष्टकऱ्यांच्या या संघटनेचा प्रवास अतिशय वैशिष्ट्यपूर्ण आहे. १९५३ सालापासून बाबा आढाव यांनी सामाजिक चळवळींमध्ये भाग घेतला. महात्मा फुले यांच्या विचारांचा प्रभावही त्यांच्यावर असल्याने जाती प्रश्नाविषयी त्यांचे आकलन काटेकोर बनले. १९५३ नंतर समाजवादी पक्षातर्फे गोवामुक्ती व संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. भाववाढीविरुद्धच्या आंदोलनात १९५३ मधेच त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९५५ मध्ये बाबांनी एकीकडे हमाल पंचायतीची उभारणी केली तर दुसरीकडे १९६२ पासून ते महाराष्ट्रातील धरणग्रस्तांच्या चळवळीचे नेतृत्व करू लागले. १९७३ मध्ये बाबा आढावांच्या पुढाकाराने पुण्यात 'महात्मा फुले समता प्रतिष्ठान'ची स्थापना करण्यात आली. सत्तरच्या दशकातच त्यांनी सामाजिक विषमतेच्या विरोधातल्या संघर्षास सुरुवात केली होती. या काळात संघटित धर्मसत्तेचे आव्हान, जातिव्यवस्थेतून होणारे शोषण आणि स्त्रीपुरुष समानता या तीनही क्षेत्रात समता प्रतिष्ठानने विविध पातळ्यांवर काम केले. पंढरपूरच्या विठ्ठलाच्या देवळात अभिनव सत्याग्रह केला गेला. याच काळात प्रतिष्ठानच्या वतीने स्त्रियांच्या प्रश्नांवरही महत्त्वाचे काम उभारले गेले. त्यात प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल तो सौंदत्ती येथे देवदासी प्रथेविरुद्ध केल्या गेलेल्या संघर्षाचा. त्याला जोडूनच विडी कामगार स्त्रियांचे संघटन घडवण्याचे प्रयत्नही प्रतिष्ठानने इतर समाजवादी कार्यकर्त्यांच्या मदतीने केले. या दोन्ही आंदोलनांमध्ये समाजातील सर्वात कनिष्ठ गटातील स्त्रियांना संघटित केले गेले.

प्रतिष्ठानच्या वतीने, डॉ. आढावांच्या नेतृत्वाखाली घडलेले सर्वात महत्त्वाचे आंदोलन म्हणजे 'एक गाव एक पाणवठा' मोहीम. १९७१ नंतरच्या, प्रतिष्ठानच्या स्थापनेनंतरच्या दीडदोन वर्षांच्या काळात सुमारे सत्तर-पंचाहत्तर मोठ्या गावांमध्ये आणि तीस तालुक्यांतील चारशेच्या आसपास खेड्यांमधून फिरून डॉ. आढाव यांनी या मोहिमेविषयी प्रबोधन केले. जातिव्यवस्थेच्या प्रश्नासंबंधी केवळ कर्मकांडात्मक उपाय न राबवता, प्रबोधनाच्या चळवळीने नवीन सामाजिक, सांस्कृतिक क्रांती स्वतंत्रपणे चालवायला हवी अशी भूमिका घेत बाबांनी या मोहिमेची आखणी केली होती. दलित चळवळीच्या त्या काळात साकारत असणाऱ्या संघर्षाच्या राजकारणाला, प्रबोधनात्मक भूमिकेची जोड देण्याचे महत्त्वाचे काम या मोहिमेने केले आणि महात्मा फुल्यांचा सांस्कृतिक क्रांतीचा वारसा पुढे चालवला.

हमालांचे स्थानिक आणि राज्यव्यापी पातळीवर संघटन करीत असताना प्रबोधन आणि संघर्ष यांची सातत्याने सांधेजोड करण्याचे प्रयत्न बाबांनी सतत केलेले दिसतात. प्रतिष्ठानच्या

वतीने राबवलेल्या निरनिराळ्या वंचित समूहांसाठीच्या आंदोलनात हमाल कष्टकऱ्यांचा सहभाग होता. संघर्षाचे व्यापक राजकारण करण्यासाठी आवश्यक असणारी कष्टकऱ्यांची व्यापक एकजूट घडवण्याचे प्रयत्न या आंदोलनांनी केले. त्याच वेळेस या समूहांना सामाजिक सुरक्षितता आणि आत्मसन्मान मिळावा म्हणून अनेक कल्याणकारी सहकारी संस्थांची उभारणी बाबांच्या नेतृत्वाखाली या काळात झाली. 'कष्टाची भाकर', 'पुस्तकपेढी', 'भाऊबीज' अशा अनेक अभिनव योजना हमाल पंचायतीने सत्तर व ऐंशीच्या दशकात राबवल्या.

व्यापाऱ्यांकडून वा स्वयंसेवी संस्थांकडून पैचीही मदत न घेता हमाल पंचायतीचा स्वस्त दवाखाना उपक्रम वर्षानुवर्षे अबाधित चालू राहिला, तोही त्यात सहभागी होणाऱ्या डॉक्टरांना पुरेसे मानधन देऊन. शासनाशी संघर्ष आणि स्वतंत्रपणे सुरक्षितता मिळवण्याचे प्रयत्न या बरोबरच व्यापक प्रबोधन मोहिमेचा भाग म्हणून बाबांनी समता प्रतिष्ठानमार्फत अनेक उपक्रम चालवले. १९७८ पासून संस्थेने 'पुरोगामी सत्यशोधक' हे नियतकालिक चालवले. तुटपुंज्या साधन सामुग्रीसह स्वतःचा संशोधन विभाग उभारला. कृतज्ञता निधीची उभारणी केली. असे एक ना अनेक. प्रतिष्ठानच्या या सर्व उपक्रमांमागील बाबांची दृष्टी, राजकीय वास्तवाविषयीचे त्यांचे आकलन फार महत्त्वाचे आहे. नव्वदच्या दशकात जेव्हा सर्व सामाजिक चळवळी थंडावल्या, महाराष्ट्राचे राजकारण अतोनात बदलले व उदारीकरणाच्या झंझावतात पुरोगामी पक्ष हेलपाटले तेव्हाही, वयाच्या सत्तरीत बाबांनी शहरी क्षेत्रात ह्या विखुरलेल्या, असंघटित, कष्टकऱ्यांचे संघटन उभारण्याचे जोमाने प्रयत्न केले.

बाबा आढावांनी हमालांचे राजकारण घडवायला सुरुवात केली तेव्हा 'कष्टकरी अंगमेहनती' कामगारांची व त्यांच्या राजकारणाची संकल्पनात्मक चौकट स्पष्टपणे साकार झालेली नव्हती, परंतु नव्वदीच्या दशकात या कष्टकऱ्यांच्या त्यांनी घडवलेल्या संघटनानंतर बाबांनी स्वीकारलेली 'कष्टकरी अंगमेहनती' कामगारांची संकल्पना भारतातील वर्गीय विश्लेषणाच्या चौकटीत एक वैध व उपयुक्त संकल्पना बनली आहे. काटेकोर वर्गीय आकलनाच्या दृष्टीने फुटकळ स्वयंरोजगारी किंवा सेवा क्षेत्रातील अंगमेहनती हे अर्थव्यवस्थेत उपरे असल्याने क्रांतिकारी राजकारण करू शकत नाहीत असे मानले गेले. परंतु भारतातील राजकीय व्यवहाराच्या दृष्टीने या समूहांचे संघटन ही एक आवश्यक बाब बनली आहे. इथल्या भांडवलशाहीचा विकास आडवळणांनी झालेला असल्यामुळे उत्पादन व्यवस्थेत सेवा क्षेत्राचा विस्तार प्रमाणाबाहेर वाढत गेलेला दिसतो. परिणामी कष्टकऱ्यांचे अधिकाधिक समूह सेवा क्षेत्रात दाखल होताना दिसतात. पुरोगामी राजकारणाला शहरी केंद्रामध्ये आपल्या राजकारणाची सुरुवात याच समूहांपासून करणे भाग आहे. म्हणून विशेषतः उदारीकरणाच्या पर्वातील अर्थराजकीय चौकटीत बाबा आढाव यांनी विकसित केलेली 'कष्टकरी अंगमेहनती' कामगारांची संकल्पना म्हणजे वर्गीय विश्लेषणास केलेले महत्त्वाचे योगदान आहे हे नोंदवायला हवे.

**राजेश्वरी देशपांडे**

# निवेदन

'महाराष्ट्र फाउण्डेशन' (अमेरिका)च्या 'समाजकार्य पुरस्कार योजने'चे हे अकरावे वर्ष. १९९६ पासून ही योजना सुरू झाली. महाराष्ट्रात परिवर्तनवादी सामाजिक कार्य करणाऱ्या अनेक व्यक्ती व संस्था यांच्या कार्याचे मोल जाणून घेऊन त्याबद्दल त्यांचा कृतज्ञापूर्वक सन्मान करावा, या हेतूने अमेरिकेतील 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने ही योजना सुरू केली. सुरूवातीपासून या योजनेची कार्यवाही 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने केशव गोरे स्मारक ट्रस्टकडे सोपविली आहे.

समाजप्रबोधन, स्त्रियांचे प्रश्न व पर्यावरण-संतुलन/संरक्षण या तीन क्षेत्रांपैकी कोणत्याही क्षेत्रात कार्य करणाऱ्या दोन संस्थांना प्रत्येकी दीड लाख रुपयांचा पुरस्कार व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात येते. तसेच या तीन क्षेत्रांबरोबरच जातीय सलोखा आणि परिवर्तनक्षम शैक्षणिक कार्य या दोन क्षेत्रांचा समावेश करून एकूण तीन व्यक्तींना प्रत्येकी पंचवीस हजार रुपयांचा पुरस्कार व सन्मानचिन्ह देण्यात येते. गेल्या वर्षापासून समाज बदलाच्या चळवळींमध्ये अविरत काम करणाऱ्या ज्येष्ठ कार्यकर्त्याला विशेष पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. गेल्या वर्षी शाहीर लीलाधर हेगडे यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. यावर्षी श्री. पन्नालाल सुराणा यांना या पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. रु. १ लाख व सन्मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.

या योजनेची कार्यवाही करण्याकरिता 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ने वरील क्षेत्रांत काम करीत असलेल्या दहा जाणकार व्यक्तींची 'निवड सल्लागार समिती' गठित केली. समितीने महाराष्ट्राच्या विविध भागांतील पत्रकार, प्राध्यापक, कार्यकर्ते यांच्याकडून कोणत्या संस्थेला/व्यक्तीला पुरस्कार द्यावेत, यासंबंधी अभिप्राय मागविले. तसेच, महाराष्ट्राच्या विविध भागांत प्रसिद्ध होणाऱ्या वर्तमानपत्रांतून या आशयाचे आवाहन करण्यात आले. असे अभिप्राय आल्यावर आवश्यक त्या बाबतीत अधिक माहिती मिळवून 'समिती'ने प्रत्येक पुरस्कारासाठी तीन नावांची शिफारस अमेरिकेतील महाराष्ट्र फाउण्डेशनच्या निवड समितीकडे केली. निवडीसाठी साहाय्यभूत होतील, अशा तऱ्हेच्या संस्था व व्यक्तींच्या कार्यासंबंधीची विस्तृत टिपणेही त्यासोबत पाठविण्यात आली. निवड-सल्लागार समितीत मधु आडेलकर, अध्यक्ष व विलास वाघ, सुरेखा दळवी, विजय दिवाण, विलास भोंगाडे, रज़िया पटेल, प्रतिमा जोशी, ज्योती केळकर आणि रवी देवगडकर यांचा सभासद म्हणून अंतर्भाव आहे. निवड-सल्लागार समितीने शिफारस केलेल्या नावांमधून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या निवड समितीने अंतिम निर्णय घेतला. या गौरव पुरस्कारांसाठी संस्था व व्यक्ती यांच्या नावांचा विचार करताना खालील बाबी विचारात घेतल्या :

१. ज्या सामाजिक संस्था व व्यक्ती आपले कार्य व विचार यांच्या साहाय्याने विवेकनिष्ठा, वैज्ञानिक दृष्टी व सामाजिक न्याय ही मूल्ये रुजविण्यासाठी सातत्याने प्रबोधनाचे कार्य करीत आहेत;
२. पर्यावरण संतुलनाचा ध्यास घेऊन त्यासाठी संशोधन, प्रयोग, लोकशिक्षण, जनसंघटन यांसारख्या विविध मार्गांनी निसर्गाच्या संरक्षणाकरिता ज्या व्यक्ती अविरत कार्य करीत आहेत;
३. ज्या व्यक्तींच्या कार्यामुळे स्त्रियांमध्ये स्वावलंबन व स्वातंत्र्य यांविषयीच्या जाणिवा वाढत आहेत आणि अन्यायाविरूद्ध झगडण्याची त्यांची ईर्षा जागृत होत आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या 'पुरस्कार योजने'च्या पूर्वनिश्चित कार्यकक्षेमुळे समाजकार्याची काही क्षेत्रे अथवा व्यक्ती पुरस्कार योजनेच्या बाहेर राहातात. तसेच काही वेळा अशा व्यक्ती शासकीय सेवेत असल्यास त्यांना पुरस्काराने सन्मानित करणे काही तांत्रिक कारणांमुळे शक्य होत नाही. त्यामुळे केशव गोरे स्मारक ट्रस्टने असा निर्णय घेतला की, अशा व्यक्ती किंवा संस्था यांचा दरवर्षीच्या पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या प्रसंगी समाजाला त्यांच्या कामगिरीविषयी वाटत असलेली कृतज्ञता त्यांचा 'सत्कार' करून व्यक्त करावी. त्या निर्णयानुसार अशा व्यक्ती वा संस्था यांचा सत्कार करण्यास २००४ या वर्षापासून सुरुवात करण्यात आली आहे.

समाजकार्य पुरस्कार निवडीच्या या प्रक्रियेत अनेकांचे साहाय्य झाले. या सर्वांचे आम्ही अत्यंत आभारी आहोत.

**मधू आडेलकर**
विश्वस्त

"I believe the profligate waste of resources on irrelevant weapons systems and the Asian economic meltdown, as well as the continuous trail of military 'accidents' and of terrorist attacks on American installations and embassies, are all portents of a twentyfirst century crisis in America's informal empire, an empire based on the projection of military power to every corner of the world and on the use of American capital and markets to force global economic integration on our terms, at whatever costs to others."1

आंतरराष्ट्रीय पातळीवर दहशत निर्माण करणाऱ्या गटांमध्ये प्रामुख्याने दोन प्रकारचे गट आहेत. काही धर्म, संस्कृती किंवा वंश यांच्याशी निगडित भावनांनी दहशतवादी कृत्ये करणारे गट. हे गट देशोदेशी विखुरलेले असले व त्यांच्या दुष्कृत्यांमुळे जीवितहानी व मालमत्तेचे नुकसान होत असले तरी त्याचे प्रमाण दुसऱ्या प्रकारच्या कृत्यांमुळे होणाऱ्या हानीच्या मानाने कमी धोक्याचे व त्या गटांना काबूत आणणे शक्य आहे. धार्मिक वा वांशिक अभिमान ही त्यांची प्रेरणा आहे. असे गट जरी जहाल प्रवृत्तीचे असले तरी त्यांचा प्रभाव स्थानिक भागांतच दिसून येतो. परंतु आंतरराष्ट्रीय पातळीवरील अल कायदासारखे जे गट राजकीय, आर्थिक अन्यायामुळे निर्माण झालेले आहेत, त्यांच्या प्रभावाचे क्षेत्र दूरवर पसरलेले असे आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमामध्ये झालेल्या क्रांतीमुळे व शस्त्रास्त्रांची संहारक शक्ती वाढल्यामुळे तर अशा गटांना आपला प्रभाव सर्वदूर जाणवू देणे शक्य झाले आहे.

या लेखात दुसऱ्या प्रकारच्या दहशतवादाच्या संदर्भात काही मुद्द्यांचा विचार मांडला आहे. प्रामुख्याने शालमर्स जॉहन्सन (Chalmers Johnson) यांच्या 'ब्लो बॅक'[१] या पुस्तकाच्या आधारे मांडलेले हे विचार आहेत.

■ चंद्रकांत केळकर

# आंतरराष्ट्रीय दहशतवाद

## एक अन्वयार्थ

दुसऱ्या महायुद्धाच्या काळात अमेरिकेचे संरक्षण करण्यासाठी जॉहन्सन नौदलात दाखल झाले. अमेरिकेने जगभर जागोजागी—विशेषत: आशियामध्ये—आपले साम्राज्यशाही वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी जी मनुष्यसंहार करणारी लहान-मोठी सतत युद्धे केली, त्यांचा 'उलट परिणाम' (blow back) अमेरिकेला एकविसाव्या शतकात भोगायला लागेल व गेल्या तीस वर्षांमध्ये वाढलेला दहशतवाद हा त्या अमेरिकी धोरणाचाच परिणाम आहे, असे जॉहन्सन यांचे प्रतिपादन आहे. अमेरिकेचे वर्चस्व स्थापण्याच्या कृत्यांचे हे स्वरूप प्रथम लष्करी कारवाईच्या हस्तक्षेपाच्या स्वरूपाचे व नंतर राजकीय व आर्थिक स्वरूपाचे असे राहिले आहे. जॉहन्सन यांच्या मते आजचा आंतरराष्ट्रीय तथाकथित दहशतवाद हा अमेरिकेच्या परराष्ट्रीय वर्चस्ववादी धोरणाला मिळालेला प्रतिसाद आहे. या लेखात अमेरिकेने मध्यपूर्वेतील देशांमध्ये गेल्या पंधरा-वीस वर्षांत केलेल्या प्रचंड हस्तक्षेपाच्या संदर्भात प्रामुख्याने मांडणी केली आहे. अमेरिकेला खनिज तेलाच्या सर्व स्रोतांवर ताबा मिळवायचा आहे व त्याकरता अमेरिकेने केलेल्या लष्करी हस्तक्षेपाला दहशतवादी प्रत्युत्तर मिळत आहे, असा प्रस्तुत लेखाचा आशय आहे.

## आंतरराष्ट्रीय दहशतवादाचा उगम

सकृतदर्शनी 'आंतरराष्ट्रीय दहशतवाद' ही संज्ञा ११ सप्टेंबरनंतर प्रचलित झाली असे वाटत असले तरी ती घटना ज्या घटनांच्या प्रदीर्घ मालिकेचा तीव्र पडसाद होती, त्या मूळ घटनांचा उगम दुसऱ्या महायुद्धानंतर झालेल्या जगातील बदलांमध्ये सापडतो. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिकेखेरीज इतर सर्व जेती राष्ट्रे ज्याला 'पिऱ्हिक व्हिक्टरी' म्हणतात तशा स्वरूपाचा विजय मिळालेली राष्ट्रे होती. ('पिऱ्हिक व्हिक्टरी' म्हणजे असा विजय की ज्या युद्धामध्ये जेते व जित हे दोन्ही बेचिराख झालेले असतात.) दुसऱ्या महायुद्धानंतर पश्चिम युरोप व संयुक्त रशियन राष्ट्रे बेचिराख झाली होती व केवळ अमेरिका अनेक प्रकारे आपले वर्चस्व स्थापू शकणारे, युद्धसामग्री, उद्योग व इतर संपत्ती यांनी संपन्न राष्ट्र म्हणून महायुद्धातून बाहेर पडणारे असे राष्ट्र होते. तथापि,विजेत्या राष्ट्रांमध्ये संयुक्त रशियाही असल्यामुळे व ते राष्ट्र साम्यवादी राष्ट्र असल्याने आपले एकछत्री वर्चस्व प्रस्थापित करण्याला एक प्रकारचा पायबंद बसणार याची सर्व जगावर वर्चस्व स्थापू पाहणाऱ्या अमेरिकेला जाणीव होती. त्यामुळे आपल्या मार्गातील हा अडथळा दूर करण्याकरता अमेरिकेने देशोदेशी साम्यवादाविरुद्ध युद्धसदृश आघाडी उघडली. चीन, कोरिया, व्हिएतनाम या देशांमध्ये अमेरिकेने मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप करून प्रचंड मनुष्यहानी व संपत्तीचा नाश केल्याची जी उदाहरणे आहेत, त्यांतील हानी अल् कायदा, हमास — यांसारख्या अनेक दहशतवादी संघटना करीत असलेल्या हानीच्या मानाने सहस्र पटीने अधिक आहे, हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

याकरता वानगीदाखल दिलेली दोनच उदाहरणे पुरेशी बोलकी आहेत. व्हिएतनाम, कंबोडिया वगैरे देशातील युद्धांमध्ये जवळ जवळ साठ देशांमध्ये ६० ते १०० दशलक्ष जमिनीतील सुरुंग पेरलेले आहेत. त्यापैकी कंबोडियात किमान १० दशलक्ष



व अंगोलामध्ये ९ दशलक्ष सुरुंग पेरलेले आहेत. एका सुरुंगाच्या उत्पादनाचा खर्च केवळ ३ डॉलर असतो. या सुरुंगांच्या फुटण्यामुळे दर वर्षी जवळ जवळ २६ हजार लोक मृत्यूमुखी पडतात. हे पेरलेले सुरुंग काढून टाकायला आज उपलब्ध असलेल्या तंत्राचा वापर केल्यास ११०० वर्षे लागतील असा अंदाज आहे.[२]

दुसरे : १९९१ ते १९९८ मधील गल्फ युद्धात, अमेरिकेच्या पुढाकाराने इराकवर घातलेल्या बंदीमुळे ५ लक्ष इराकी नागरिक औषधोपचार, कुपोषण वगैरेमुळे मृत्युमुखी पडले.

अमेरिकेने इराकशी केलेल्या आताच्या युद्धात ६ लाखाहून अधिक इराकी मारले गेले आहेत.[३]

किंबहुना ११ सप्टेंबरची व तिच्या पुढे-मागे घडलेल्या घटना या अमेरिका दुसऱ्या महायुद्धानंतर वापरीत असलेल्या 'परमनंट वॉर'च्या धोरणामुळे अन्याय झालेल्या देशांतील तरुण पिढीने दिलेल्या प्रतिक्रिया आहेत, असे म्हणणे चुकीचे ठरणार नाही.

## मध्यपूर्वेतील तंट्याची पार्श्वभूमी

दुसरे महायुद्ध संपल्यानंतर जगाच्या राजकीय नकाशामध्ये जेते राष्ट्रांनी अनेक बदल केले. ज्यू धर्मीयांसाठी पॅलेस्टाइनमधील काही भूमी बाजूला काढून निर्माण केलेल्या 'इस्रायल' या देशाची निर्मिती हा त्यांमधील एक बदल आहे. भविष्यात मध्यपूर्वेतील खनिज तेलाच्या साठ्यांवर आपले नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने पाश्चिमात्य राष्ट्रांनी खेळलेली ही एक खेळी होती. या वेळी किंवा त्यानंतरही इस्रायल या राष्ट्राच्या निश्चित अशा कोणत्या सीमा आहेत, हे स्पष्ट झालेले नाही. अशा प्रकारे केलेल्या इस्रायलच्या निर्मितीमुळे इस्रायल व भोवतालची अरब राष्ट्रे यांमध्ये तेव्हापासून सतत युद्धसदृश परिस्थिती नांदत आली आहे. व दैवदुर्विलास असा की ज्या ज्यू धर्मीयांना हजारो वर्षे आपल्या भूमीपासून परागंदा व्हावे लागले त्यांना ही भूमी त्यांच्या पुनर्वसनाकरता मिळाल्यानंतर, त्याच ज्यू धर्मीयांनी अमेरिकेच्या सर्व प्रकारच्या पाठिंब्याच्या आधारे पॅलिस्टिनमध्ये राहत असलेल्या अरबांवर परागंदा होण्याची पाळी आणली आहे. इस्रायलच्या निर्मितीनंतर त्या देशातील व त्या देशाच्या सीमेजवळील अरबांवर सतत अनन्वित अत्याचार केले आहेत व पॅलिस्टाइनच्या प्रदेशाचे लचके तोडून आपल्या देशाची सीमा सतत वाढवीत नेली आहे. उदाहरणार्थ, इस्रायलने १९७८ व १९८२ मधे लेबेनॉनवर हल्ले चढविले. १९७८ मध्ये लेबेनॉनचा दक्षिणेकडील भाग ताब्यात घेऊन तो इस्रायलचा सुरक्षापट्टा म्हणून जाहीर केला. ही घटना १९८२ साली आक्रमणाला विरोध करणारी हिजबोला (Hizbollah) संघटना स्थापन होण्यापूर्वीची आहे. १९८१ नंतरच्या आक्रमणानंतर चार वर्षांनी हिजबोला ही संघटना स्थापन झाली. या आक्रमणातून इस्रायलने लेबेनॉनचा जवळ जवळ अर्धा प्रदेश काबीज करून बैरूट शहराजवळच्या पॅलिस्टिनच्या दोन वसाहतींमधील लोकांची कत्तल केली. हिजबोलाने या कत्तलीमध्ये मारल्या गेलेल्या पॅलिस्टिनांच्या नातेवाईकांमधून आपल्या गनिमी सैनिकांच्या तुकड्या तयार केल्या. या संघटनेने इस्रायलने लेबेनॉनचा लाटलेला बहुतांश प्रदेश २००० पर्यंत मोकळा करून घेतला. आता ही संघटना रीतसर लेबेनॉनच्या संसदेमध्ये राजकीय पक्ष म्हणून निवडून गेलेली आहे व तिच्याबरोबर तिला सहकार्य करणारे निधर्मी व मुस्लीमेतर प्रतिनिधीही आहेत. २००५च्या निवडणुकीत त्यांच्या चौदा शिया प्रतिनिधींबरोबर सहकार्य करणाऱ्या प्रतिनिधींमध्ये पाच ख्रिश्चन धर्मीय, तीन सुन्नी मुस्लीम प्रतिनिधी होते. यावरून हिजबोला संघटना ही मुस्लीम मूलतत्त्ववादी संघटना असल्याचा जो प्रचार इस्रायल व अमेरिका करीत असते, तो किती खोटा आहे हे लक्षात येते. लोकशाहीवर विश्वास असणारी व इतर धर्मीयांबरोबर लेबेनॉनच्या राजकारणात सहकार्याने वागणारी अशी ती संघटना आहे; मुस्लीम धर्मीय राष्ट्र स्थापन करण्याकरिता निर्माण केलेली संघटना नाही. ती एक पाश्चिमात्यांच्या वसाहतवादी धोरणाला विरोध करणारी संघटना आहे, हे लक्षात घ्यावयास हवे.[४]

दोन बाजूंपैकी कोणती बाजू अधिक दहशतवादी आहे, हे अलीकडच्याच, म्हणजे १२ जुलै २००६ नंतर इस्रायलने दाखविलेल्या आपल्या क्रौर्याच्या परिसीमेवरून ठरविता येईल. लेबेनॉनने १९८२ सालापासून इस्रायलच्या ताब्यात राहिलेल्या 'शेबा फार्मस्' ह्या दक्षिणेकडच्या भागावर हल्ला केला असताना इस्रायलचे दोन सैनिक कैद केले. ही घटना इस्रायलच्या प्रदेशात घडली नसतानाही तसा खोटा प्रचार करून इस्रायलने प्रतिशोध म्हणून लेबेनॉनवर विमानांचे ताफे पाठवून बॉंबहल्ला केला व लेबेनॉनचे हजारो नागरिक मारले. लेबेनॉनने इस्रायलच्या दोन सैनिकांना कैद करण्याच्या 'अपराधा'बद्दल हा प्रतिशोध होता. याउलट इस्रायलने हजारो लेबेनिनना दहा वर्षांपेक्षा अधिक काळ तुरुंगात डांबून ठेवले आहे व आता १०,००० पेक्षा अधिक लेबेनिन त्या देशाने कैदी केले आहेत. इस्रायलच्या या प्रतिशोधाचा अमेरिका सोडून इतर सर्व देशांनी तीव्र निषेध केला; मात्र अमेरिकेने 'हिजबोला'ला नष्ट करण्याकरता इस्रायलने काहीही करावयास मुभा आहे, अशी भूमिका घेतली.

लेबेनानमधील हिझबोला संघटनेविषयी काहीशा विस्ताराने लिहिण्याचे कारण असे आहे की, या प्रकरणामुळे इस्रायल - अमेरिका कंपूची मध्यपूर्वेतील साम्राज्यवादी भूमिका लक्षात यावी. सध्याच्या देशादेशांतील बदललेल्या राजकीय परिस्थितीचा अमेरिकेला लाभ उठवावयाचा आहे. जर्मनीमध्ये उजव्या विचाराचे शासन आले आहे. अमेरिकेला पूर्वी केलेल्या विरोधाबद्दल फ्रान्स पापक्षालन करण्याच्या प्रयत्नात आहे. इंग्लंड गेली

काही वर्षे अमेरिकेच्या 'अंगणातच' तळ ठोकून बसले आहे. मध्यपूर्वेतील ईजिप्त, जॉर्डन, सौदी अरेबिया यांसारखी अरब राष्ट्रे अगोदरच अमेरिकेच्या तंबूत आहेत. लिबियाला नरम केले आहे. भारत, चीन व रशिया यांनी युनो संघटनेचे कर्मचारी इस्रायली हल्ल्यात बळी पडल्याबद्दल निषेध व्यक्त केला असला तरी केवळ दोन आठवड्यात लेबेनॉनची एकपंचमांश लोकसंख्या इस्रायलने बेघर केल्याबद्दल ब्रही उच्चारला नाही. अशा तऱ्हेने आजचे जागतिक वातावरण अमेरिकेचे साम्राज्यवादी मनसुबे पुढे रेटण्याला अनुकूल झाले आहे, असे दिसत असल्याने अमेरिका हिजबोलाला 'जहाल दहशतवादी' ठरवून नेस्तनाबूत करण्याच्या प्रयत्नात आहे. अमेरिका-इस्रायलचे हे प्रयत्न यशस्वी झाले तर अमेरिकेला मध्यपूर्व भागातील जवळजवळ सर्व तेलसाठ्यांवर नियंत्रण मिळणे शक्य होईल. अफगाणिस्थान, इराक या देशांवरील अमेरिकेचे हल्ले हा या व्यूहाचाच भाग आहे. अमेरिकेच्या कोन्डोलीझा राइस आपल्या भाषणांतून इस्रायलच्या हल्ल्याचा हेतू अधिकच स्पष्ट करीत असतात. त्यातून अमेरिकेचा साम्राज्यवादी मनसुबाही उघड होतो. लेबेनॉनवरील इस्रायलच्या हल्ल्यातून 'नवीन मध्य-पूर्व' (New Middle East) जन्माला येत आहे, अशी त्यांची प्रतिक्रिया आहे.[५] अर्थात हिजबोल्याच्या गनिमी काव्याच्या युद्धनीतीमुळे इस्रायलला युद्धात प्रथमच काही वित्तहानी, मनुष्यहानी पत्करावी लागली व इस्रायलने यावेळी माघार घेतली. त्यामुळे राईस यांना अपेक्षित असलेला 'नवीन मध्य-पूर्वे'चा उदय होऊ शकला नाही, हे वेगळे.

इस्रायलच्या Olmert यांनी अमेरिकेचे मनसुबे पूर्ण होण्याची मुदतही उघड केली आहे. इस्रायलच्या सरहद्दी २०१० पर्यंत निश्चित होतील, असे ते अलीकडे म्हणाले.[६]

## अमेरिकेचे देशोदेशींचे उपद्व्याप

संयुक्त रशियन संघाच्या विघटनापूर्वी साम्यवादी रशियाचा बागुलबुवा दाखवून अमेरिकेने देशोदेशी साडेआठशेच्या वर आपले लष्करी तळ ठोकले. यांपैकी एकसष्टपेक्षा अधिक लष्करी तळ असे आहेत की ज्यांमधील अमेरिकन सैनिकांकडे अतिशय अद्ययावत शस्त्रास्त्रे आहेत. काही ठिकाणी न्यूक्लिअर शस्त्रांचाही त्यात अंतर्भाव आहे. असे तळ जर्मनी-इटलीपासून पूर्वेकडे दक्षिण कोरियापर्यंत पसरले आहेत. ही सगळी अमेरिकेची 'मित्र राष्ट्रे' आहेत. परंतु म्हणून असे घडले नाही की, अमेरिकेमध्ये इटलीचा किंवा जर्मन सैनिकांचा तळ ठेवलेला आहे. संयुक्त रशियन राष्ट्रसंघाचे विघटन झाल्यावर हे लष्करी तळ काढून घेतले जातील, ही स्वाभाविक अपेक्षा होती. परंतु तसे झाले नाही. याचाच अर्थ असा की अमेरिकेने आपला साम्रज्यवादी मुखवटा रशियाच्या बागुलबुवाच्या मागे लपविला होता.

जॉहन्सन आपल्या पुस्तकात म्हणतात की, साम्राज्यवादी आकांक्षांनी प्रेरित झालेल्या प्रत्येक राष्ट्राला त्याच्या या आकांक्षांच्या परिणामांचा हिशोब मांडावा लागतो. त्या राष्ट्राच्या (येथे अमेरिका) सैनिकांचे स्वच्छंदी, परिणामांचा विचार न करता केलेल्या वर्तनांचे पडसाद जसे खर्चाच्या बाजूला आहेत तसेच त्याहूनही अधिक व्यापक अशा आर्थिक घटनाही खर्चाची बाजू फुगवताना दिसतात. शीतयुद्ध संपल्यानंतरही या लष्करी तळांतील सैनिकांच्या बेदरकार वर्तनाचे किस्से देशोदेशी घडत आले आहेत. उदाहरणार्थ, इटली या अमेरिकेच्या मित्र राष्ट्रामध्ये तळ ठोकून बसलेल्या अमेरिकन लष्कराविषयी अनेक तक्रारी होत्या. कमी उंचीवरून व अधिक वेगाने विमाने उडविणे यासारख्या या तक्रारी असत. फेब्रुवारी १९९८ मध्ये अशाच एका नियमभंगाच्या प्रकरणात अडकलेल्या वैमानिकांना त्यांची चौकशी करून निर्दोष म्हणून अमेरिकेने सोडून दिले व इटलीला नुकसानभरपाई देऊ केली. नंतर अमेरिकन काँग्रेसने ती देण्याचे नाकारले. त्यामुळे नुकसान झालेल्या इटालियन नागरिकांना नुकसानभरपाईसुद्धा मिळाली नाही.

अमेरिकेचे १९४९ चे कोरियाचे युद्ध संपल्यापासून अंकित असलेल्या दक्षिण कोरियासारख्या राष्ट्राने १९९८ मध्ये दिवाळखोरी जाहीर केली. त्याचा तोपर्यंतचा आर्थिक विकास धुळीला मिळाला. दक्षिण कोरियाबरोबर इंडोनेशिया, थायलंड, मलेशिया हे देशही त्यात ओढले गेले. या काळात दिवाळखोरीत निघालेले उद्योग, वित्तसंस्था अमेरिकी भांडवलदारांनी पाडलेल्या भावात विकत घेतल्या. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने लादलेल्या आर्थिक धोरणामुळे ते देश कर्जबाजारी अधिकच दिवाळखोर झाले. या सगळ्यांनी केलेल्या अमेरिकेतील वित्तसंस्थांच्या गुंतवणुकीतील चढउतार अरिष्टाला कारणीभूत होते. १९९७च्या या आर्थिक अरिष्टानंतर या दक्षिणपूर्व देशांतील मार्गदर्शित भांडवलशाही कशी कुचकामी आहे व बाजारावर अवलंबून राहणारी अमेरिकन भांडवलशाहीच कशी निर्दोष आहे, हा मंत्र या राष्ट्रांना अमेरिका ऐकवीत राहिली.

अमेरिकेने देशोदेशी केलेल्या अन्यायाची, अत्याचारांची, आर्थिक लुबाडणुकीची जॉहन्सन अनेक उदाहरणे देतात. दक्षिण अमेरिकेपासून पूर्व-आशियापर्यंतच्या सर्व देशांतून या घटना घडलेल्या आहेत. त्यामध्ये अमेरिकेने सरळसरळ केलेला लष्करी हस्तक्षेप असेल, किंवा अमेरिकेच्या सी.आय.ए नावाच्या गुप्त संघटनेच्या कारवाया असतील, किंवा लष्करी तळांवरील अमेरिकन सैनिकांचे बेदरकार वर्तन या घटनांना जबादार असेल. व्हिएतनाम, इराक, अफगणिस्थान या देशांवर अमेरिकेने निर्लज्जपणे केलेली आक्रमणे, इस्रायलला चेतावणी देऊन घडवून आणलेली पॅलिस्टिनमधील युद्धे, ही अमेरिकेच्या साम्राज्यवादाची ठळक उदाहरणे आहेत. तसेच चिली, कांगो, इंडोनेशिया यांसारख्या अनेक देशांत सीआयएमार्फत डाव्या विचारसरणीची सरकारे उलथून पाडल्याची उदाहरणे आहेत.



यातील अनेक कृत्ये गुप्तपणे कारवाया करून केलेली असल्याने ती कृत्ये प्रकाशात आलेली नाहीत. परंतु त्या त्या देशांतील अमेरिकेच्या लोकांनी दुष्कृत्यांचा प्रतिशोध घेतला, विमान पळविले, चर्च, दूतावास यांवर हल्ले केले तर ती कृत्ये करणारे हे दहशतवादी ठरतात. जॉहन्सन यांच्या म्हणण्याप्रमाणे, आपले आर्थिक धोरण इतरांवर लादून त्यांची स्वायत्तता काढून घेण्याच्या अमेरिकेच्या नीतीमुळे, खनिज तेलाच्या साठ्यांवर नियंत्रण मिळवण्याकरता इराक, इराण, पॅलिस्टिन या प्रदेशांवर केलेल्या सर्वनाशी हल्ल्यांमुळे, एकविसाव्या शतकामध्ये अमेरिकेला त्या दुष्कृत्यांचे परिणाम भोगावे लागतील; त्या कृत्यांच्या प्रतिशोधाला तोंड द्यावे लागेल.

आज अमेरिकेचा शत्रू नंबर एक असलेला ओसामा बीन लादेन हा अमेरिकेने अफगाणिस्तानावर केलेल्या हल्ल्याच्या वेळी अमेरिकेचा मित्र होता. परंतु त्याच्या सौदी अरेबियातील आपले तळ ज्यावेळी अमेरिकेने सोडले नाहीत त्यावेळी तो अमेरिकेचा शत्रू झाला आहे. इराण-इराक युद्धात अमेरिका इराणला साहाय्य करीत होती. आज इराण अणुबाँबसज्ज राष्ट्र होईल, अशी भूमिका घेऊन अमेरिका इराणविरुद्ध युद्ध पुकारण्याच्या, किमान पक्षी बहिष्कार (sanctions) लादण्याच्या तयारीत आहे. इराकवर हल्ला करण्यापूर्वी अमेरिकेने इराकवर असाच बहिष्कार टाकला होता. त्यावेळी तेथील लाखो मुले-बाळे, नागरिक औषधे व अन्न यांच्या टंचाईमुळे मृत्युमुखी पडले. आता पूर्वीचा मित्र पण आताचा शत्रू इराण याची तशीच पाळी आली आहे, असे दिसते.

१९९० मध्ये कर्ज देताना अमेरिकेच्या अंकित असलेल्या आंतरराष्ट्रीय संघटनांनी भारतावर अनेक अटी लादल्या आहेत. देशाची अर्थव्यवस्था खुली करावयाला भाग पाडले आहे. अमेरिका व भारत यांच्या सैन्यांचे एकत्रितपणे सराव सुरू झाले आहेत. अलीकडे भारत व अमेरिका यांमध्ये न्यूक्लिअर करार होऊ घातला आहे. त्यामुळे भारताचे परराष्ट्रीय धोरण व भारताची सुरक्षा दोन्ही धोक्यात येतील, असे काही नामवंत शास्त्रज्ञांचे व तज्ज्ञांचे मत आहे. अशा सगळ्या बदलांमुळे भारत हे अमेरिकेचे एक अंकित राष्ट्र होईल, अशी भीती व्यक्त होत आहे. परिणामी, भारतात अगोदरच घडत असलेल्या अंतर्गत दहशतवादी कारवायांना आंतरराष्ट्रीय परिमाण लाभेल, अशी सार्थ भीती व्यक्त होत आहे.

थोडक्यात, जगभर पसरलेल्या या दहशतवादाचा बीमोड त्याच्याविरुद्ध जगभर मोहिमा उघडून होणार नाही; तर त्या दहशतवादाचे अमेरिकेचे साम्राज्यवादी धोरण हे जे मूळ आहे, त्यामध्ये बदल होण्याची गरज आहे. लष्करी सामर्थ्यामुळे मत्त झालेल्या आर्थिक महासत्तेला हे कोण समजावून सांगेल? केवळ अमेरिकेतील नागरिकच. अर्थात प्रश्न सोडविण्याचा हा नजीकच्या काळातील मार्ग नाही, हे खरे असले, तरी तोच एक मार्ग जागतिक दहशतवादाचे प्रमाण किमान करील, हेच खरे.

### संदर्भ


१. Blow Back : 'The costs and consequences of American Empire' by Chalmers Johnson, (2000), Herry Holt & Co., New York, Page 7
२. कित्ता, पृ. ६९
३. कित्ता, पृ. ९
४. फ्रंट लाइन, कव्हर स्टोरी, ११ ऑगस्ट २००६, पृष्ठ ६
५. कित्ता, पृष्ठ ९
६. कित्ता, पृष्ठ १०


❑

# भारतातील दहशतवाद

## पेच सर्वसमावेशकतेचा

**प्रकाश बाळ**

*दहशतवादाला शह देण्यासाठी एका नव्या कडक कायद्याची गरज आहे*—इ. एस. एल. नरसिंहन, संचालक, गुप्तचर विभाग.

*नव्या कडक कायदेशीर उपायांनी नव्हे, तर आहे त्याच कायद्यांचा परिणामकारकरित्या वापर करून दहशतवादाला तोंड दिले जाणे गरजेचे आहे*—पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंह.

दहशतवादाचा मुकाबला करताना भारतीय राज्यसंस्थेसमोरचा (स्टेटसमोरचा) पेच कसा आहे, हे दर्शवणारी ही दोन विधाने आहेत.

हा लेख लिहीत असतानाच एका दिवसाच्या अंतराने ही विधाने प्रसिद्ध झाली आहेत. ती प्रासंगिक आहेत. पण ती तेवढीच प्रातिनिधिकही आहेत. अशासाठी की, गुप्तचर विभागाचे संचालक किंवा पंतप्रधान या पदांवर कोणतीही व्यक्ती असली, तरी गेल्या दोन अडीच दशकांत भारतीय राज्यसंस्थेला हा पेच पडत आला आहे आणि तो या कालावधीत या दोन्ही पदांवर बसलेल्या कोणालाही सोडवता आलेला नाही.

दहशतवाद हा हिंसाचारच आहे, फक्त ती हिंसाचाराची वेगळी अभिव्यक्ती आहे एवढेच, तेव्हा हिंसाचाराच्या इतर प्रकारांप्रमाणे ती सुरक्षा दलांच्या बळावर निपटता येऊ शकते, नव्हे ती तशीच निपटली गेली पाहिजे, हा राज्यसंस्था चालवणाऱ्यांचा ठाम समजच असा पेच निर्माण होण्यास कारणीभूत आहे.

मग दहशतवादाचे खरे स्वरूपच भारतातील राज्यकर्त्यावर्गाला कळलेले नाही, असे मानायचे काय?

...तर तसेही नाही.

दहशतवादामागची कारणे, त्याचे स्वरूप यांचे चांगले व पक्के आकलन भारतातील राज्यकर्त्यावर्गाला निश्चितच आहे. साहजिकच दहशतवाद फोफावण्यामागच्या मूळ कारणांना हात घालून ती दूर करण्यासाठी भारतीय राज्यसंस्था पावले का टाकत नाही, हा प्रश्न उद्भवतो.

...आणि तेथेच घोडं पेंड खातं आहे.

भारत हा अठरा पगड जाती-जमाती, धर्म, वंश, भाषा इत्यादींनी नटलेला देश आहे, असे गोडवे आपण गात असतो. 'वैविध्यात एकात्मता' असे पालुपदही आपण सतत आळवत असतो. भारताच्या बहुसांस्कृतिकतेचे आपण केवढे कौतुक करीत असतो. आपली संस्कृती सर्वसमावेशक असल्यानेच ती काळाच्या ओघात टिकून राहू शकली, याचा केवढा अभिमान आपल्याला असतो. मात्र वांशिक, धार्मिक, भाषिक, प्रादेशिक, जाती-जमातींच्या अशा विविध ओळखी (आयडेन्टीटीज्) एकूण भारतीयत्वाच्या ओळखीत सामावून घेण्यात आणि त्याद्वारे हे भारतीयत्व अधिक सघन व सखोल बनवण्यात स्वातंत्र्यानंतरच्या गेल्या सहा दशकांत आपल्याला जे अपयश आले आहे, त्यामुळेच दहशतवादाला तोंड फुटले व आज तो देशभर फैलावला आहे. परकीय शक्ती आज या दहशतवादाला खतपाणी घालीत आहेत, हे खरे. पण तसे करण्यास त्यांना संधी दिली आहे, ती आपणच.

आपली कथनी आणि करणी यातील दरी वाढत गेल्याने ही संधी परकीय शक्तींना मिळत गेली आहे.

...आणि तसे घडण्यास प्रतिगामी व पुरोगामी अशी लेबले ज्यांना लावली जातात, ते सर्व राजकीय पक्ष, संघटना व गट हे दोषी आहेत. त्यातून स्वत:ची सुटका करवून घेण्याचा प्रयत्न जर कोणी करीत असेल, तर तो चक्क ढोंगीपणा ठरेल. या राज्यकर्त्यावर्गाच्या जोडीलाच या देशातील समाजाकडेही- विशेषत: या समाजातील बोलघेवड्या मध्यम, उच्च मध्यम व अभिजन वर्गाकडे-काही प्रमाणात दोष जातो.

जर आज दहशतवादाला खरोखरच शह द्यायचा असेल, तर राज्यकर्तावर्ग व समाज यांनी आत्मसंशोधन करून आधीच्या चुका सुधारण्याची मनोमन तयारी केली पाहिजे.

कोणत्या चुका आपल्याकडून घडल्या आहेत आणि त्यांचे स्वरूप काय आहे?

प्रातिनिधिक लोकशाही भारतात आणण्यासाठी ब्रिटिशांनी २०व्या शतकाच्या दुसऱ्या दशकात टप्प्याटप्प्याने पावले टाकण्यास सुरुवात केल्यापासून स्वतंत्र भारतातील राज्यसंस्था कशी असावी आणि तिने कारभार कसा करावा, यासंबंधीच्या विचारमंथनाला आपल्या देशात प्रारंभ झाला होता. भारताची बहुविधता टिकावी आणि समाजातील सर्व घटकांना स्वतंत्र भारतात विकास व प्रगतीची फळे जास्तीत जास्त सम प्रमाणात मिळावीत, या दिशेने काय करता येईल, हे या विचारमंथनाचे प्रमुख सूत्र होते. भारतीय समाजाची बहुविधता व त्याचबरोबर त्याची सर्वसमावेशकतेची प्रवृत्ती या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक होत्या. पण त्याचबरोबर प्रत्येक समाजघटक आपापली ओळख प्रखरपणे टिकवून होता. त्यामुळेच स्वतंत्र भारतात केंद्रीय व प्रांतीय स्तरांवर सत्तासमतोल कसा राखावा आणि तसा तो राखताना देशाची एकात्मताही कशी टिकवून धरावी, हा पेच होता. तो सोडवण्यासाठी प्रांतांना स्वायत्तता देतानाच केंद्रही कसे बळकट होईल, या दृष्टीने विचार होत होता. म्हणूनच स्वातंत्र्यपूर्व काळातील बहुतेक सर्व काँग्रेस अधिवेशनात प्रांतीय स्वायत्ततेचा ठराव संमत होत असे. पण १९३५ च्या कायद्यानुसार पहिल्या निवडणुका १९३७ साली झाल्या, तोपर्यंत गंगा-यमुना नद्यांतून बरेच पाणी वाहून गेले होते. सत्तेच्या राजकारणाची नांदी झाली होती. शिवाय देशातील जमातवादी वातावरण तापत होते. त्याचीच परिणती पुढे फाळणीत व त्यावेळच्या नरसंहारात झाली. भौगोलिकदृष्ट्या देश एकत्र राहिला, तरी समाज दुभंगण्याचा धोका मोठा



आहे, याची जाणीव स्वतंत्र भारतातील राज्यकर्त्यावर्गाला झाली होती. भारताची राज्यघटना बनवण्यासाठी घटना समितीत जेव्हा चर्चा सुरू झाली, तेव्हा या सगळ्या वातावरणाचा एकत्रित परिणाम घडून येऊ लागला होता. त्यामुळेच संघराज्यात्मक वा केंद्राला सर्वाधिकार देणे, अशी दोन्ही टोके टाळून मध्यममार्ग स्वीकारला गेला. प्रांतांनाही काही अधिकार देण्यात आले, केंद्रही मजबूत राहील याकडे लक्ष देण्यात आले, आणि त्याचवेळी केंद्र व प्रांत या दोघांनाही संयुक्त अधिकार देण्याची तरतूद करण्यात आली.

हा जो घटनात्मक आराखडा होता, त्याची आशयपूर्ण अंमलबजावणी आणि लोकशाही राज्यव्यवस्थेच्या अंतर्गत स्वीकारण्यात आलेली प्रौढ मतदानावर आधारलेली निवडणुकीची पद्धती, या दोन गोष्टींमुळे आपलाही देश चालवण्यात सहभाग आहे, ही भावना विविध समजघटकांत रुजेल, अशी आशा घटनाकारांना होती. ती खरी ठरण्याची शक्यताही स्वातंत्र्यानंतरच्या सुरुवातीच्या काही वर्षांत दिसू लागली होती. काश्मीर वा ईशान्य भारतातील संघर्ष हा त्याला अपवाद होता. पण पन्नासच्या दशकाच्या मध्यापासूनच भाषिक अस्मितेला धुमारे फुलू लागले. त्यामुळे भाषावर प्रांतरचना करावी लागली. पण त्यानेही हे अस्मितेचे अंगार शांत होऊ शकले नाहीत. साठच्या दशकाच्या सुरुवातीपासून दक्षिणेतील द्राविडी चळवळीने जोर धरला.पंजाबी सुभ्याच्या मागणीवरून असंतोष खदखदू लागला. इतर राज्यांतही कुरबुरी सुरु झाल्या. महाराष्ट्रात शिवसेनेचा उदय झाला.

भाषिक, वांशिक, प्रादेशिक अस्मिता सामावून घेण्यात भारतीय राज्यसंस्था कमी पडत असल्याचे हे लक्षण होते. यावर उपाय होता, तो या अस्मितांना सामावून घेता येऊ शकेल अशा रीतीने राज्यकारभाराला आणि राजकारणाला वळण देणे. पण हे घडले नाही. उलट सत्तेच्या राजकारणाला जसा वेग आला आणि ते जसे अधिकाधिक निरंकुश व नंतर जीवघेणे बनत गेले, तसे एकीकडे या भाषिक, वांशिक, प्रादेशिक अस्मिता दडपण्याचा किंवा अधूनमधून त्या विधिनिषेधशून्यरित्या राजकीय फायद्यासाठी वापरून घेण्याचा प्रकार सुरु झाला.

साहजिकच आपल्याला जे हवे आहे, ते पदरात पाडून घेण्याचे अस्मिता हेच हत्यार आहे अशी समजूत समाजातील भाषिक, वांशिक, प्रादेशिक गटांनी करून घेतली. या अस्मिता अधिक धारदार बनवण्याचे प्रयत्न सुरु झाले. हे अस्मितेचे हत्यार वापरून आपण पाहिजे ते पदरात पाडून घेऊ शकतो, असे आश्वासन देणारे सौदागरही या गटांत तयार झाले आणि या अस्मितांच्या कल्लोळावर स्वार होऊन राजकारण करण्याला ऊत आला.

त्यामुळेच परकीय शक्तींना देशात हस्तक्षेप करून दहशतवाद फोफावण्याची संधी मिळाली.

पंजाबातील खलिस्तानी दहशतवाद हे याचे उत्तम उदाहरण आहे.

वेगळ्या पंजाबी सुभ्याची मागणी ही तशी जुनी, अगदी स्वातंत्र्यापूर्वीपासूनची आहे. आम्ही वेगळे आहोत, अशी शिखांची भावना होती. त्यांचे वेगळेपण टिकवण्याची संधी देऊन देशाच्या मुख्य प्रवाहात त्यांना सामील करून घेता येणे अशक्य नव्हते. पण राजकीय फायद्याची गणिते मांडून त्यांच्या हिशेबातच पावले टाकण्यापायी ही वेगळेपणाची भावना भारतीयत्वात सामावून घेतली न जाता अधिक धारदार बनत गेली आणि शिखांतील अतिरेकी प्रवृत्तींना बळ मिळत गेले. त्यांना चुचकारणे या पंथातील इतरांनाही भाग पडू लागले. त्यातूनच १९७३ सालचा आनंदपूर साहेब ठराव झाला. सौदेबाजीच्या राजकारणात हा ठराव हे हत्यार प्रतिस्पर्धी बाजूंनी वापराला सुरुवात केली.

आणि जर्नेलसिंह भिन्द्रेनवाले हा भस्मासुर उभा केला गेला. धार्मिक कट्टरतावादाचे वादळ उठवण्यात आले.

तोपर्यंत शिखांच्या वेगळेपणाला जो प्रादेशिकतेचा रंग होता तो बदलत जाऊन या मागणीला धार्मिक जामानिमा चढवण्यात आला. राजकीय मागणी मागे पडून धर्मांधतेचा प्रभाव वाढत गेला.

ही संधी पाकने साधली आणि खलिस्तानी दहशतवादाचा झंझावात निर्माण झाला. शेकडो शीख तरुण मारले गेले. हजारो कुटुंबे उद्ध्वस्त झाली. लष्करी कारवाई करण्याची पाळी आली. शिखांचे श्रद्धास्थान असलेल्या सुवर्ण मंदिरात सैन्य घुसवावे लागले. या श्रद्धास्थानाची मोडतोड झाली. त्याचे तीव्र पडसाद शीख समाजात उमटले. खलिस्तानच्या मागणीला प्रखर विरोध करणाऱ्या शीख समाजातील अनेक जणांना या कारवाईने राज्यसंस्थांच्या विरोधात उभे केले. भारतीय ऐक्याचे प्रतीक मानल्या जाणाऱ्या लष्करात स्वातंत्र्यानंतर प्रथमच बंडाळी झाली. शेवटी देशाच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या हत्येने साऱ्या देशाला हादरवून सोडले.

हीच चूक काश्मीरमध्येही केली गेली.

काश्मीर ही भळभळती जखम आजही तशीच सहा दशकांनंतर राहिली आहे, त्यामागे या जनतेची वेगळेपणाची भावना, हेच कारण आहे. पाक घुसखोरांना तोंड देण्यासाठी भारताची मदत आवश्यक बनल्याने काश्मीर भारतात विलीन झाला. प्रत्यक्षात महाराज हरीसिंह, शेख अब्दुल्ला व काश्मिरी जनता यांना स्वतंत्रच राहायचे होते. पाकने ते अशक्य बनवल्याने

एका विशिष्ट परिस्थितीत काश्मीरने भारतात सामील होण्यास संमती दर्शवली. अन्यथा भौगोलिक सलगता व मुस्लिम बहुसंख्यता या दोन निकषांवर काश्मीर पाकलाच जायला हवा होता. पण पाकमध्येही सामील होण्याची काश्मिरी जनतेची इच्छा नव्हती. ती जीनांना अमान्य होती. म्हणून त्यांनी घुसखोर पाठवले. भारतात सामील होताना इतर संस्थानांनी जो सामीलनामा स्वीकारला, त्यावरच काश्मीरच्या महाराजांनी सही केली. त्यानुसार संरक्षण, परराष्ट्र धोरण, चलन असे काही मोजके विषय सोडता इतर सर्व कारभार स्थानिकांच्या हातातच राहणार होता. हैदराबाद, जुनागड अशी काही मोजकी संस्थाने वगळता इतर संस्थानांनी आपले हक्क स्वखुषीने भारत सरकारला देऊन टाकले. हैदराबाद व जुनागडची तशी तयारी नव्हती. त्यामुळे त्यांनी संघर्षाचा पवित्रा घेतला. पण भौगोलिक सलगतेच्या निकषावर पाकमध्ये सामील होणे त्यांना शक्य नव्हते. जुनागडमध्ये लोकांनीच उठाव केला व तेथील नबाबाची सत्ता गेली. हैदराबादेतही तेच घडत होते. पण उठावाला तोंड देण्यासाठी रझाकारांचा जुलूम निझामाने लोकांवर लादला, तेव्हा भारत सरकारला पोलिस कारवाई करणे भाग पडले.

सामीलनामा करून भारतात आलेल्या काश्मीरची विशिष्ट परिस्थिती लक्षात घेता, त्याच्या पूर्ण विलीनीकरणाला वेळ लागेल, हे जाणून काश्मीरचे वेगळेपण टिकवून धरणारे ३७०वे कलम राज्यघटनेत घालण्यात आले. पण काळाच्या ओघात काश्मिरी जनताही भारतात इतर संस्थानांप्रमाणेच पूर्णत: विलीन होईल, अशी नेतृत्वाची अपेक्षा होती. राज्यघटनेतील ३७०वे कलम ही केवळ तात्पुरती उपाययोजना आहे, असेच मानले जात होते. उलट हे कलम ही आपल्या वेगळेपणाची ग्वाही असल्याचे काश्मिरी नेते व जनता मानत होती.

दिल्ली व श्रीनगर येथील अपेक्षांत असा, इतका विसंवाद असल्यानेच पुढचे सगळे रामायण घडले आहे.

तरीही भारतीय संघराज्यांतर्गतच आपले हे वेगळेपण टिकवता येईल, अशी आशा ऐंशीच्या दशकाच्या मध्यापर्यंत काश्मिरी जनतेने बाळगली होती. त्यापायीच १९६५ व १९७१च्या युद्धात काश्मिरी जनता पाकच्या बाजूने उभी राहिली नाही. पण दिल्लीकर राज्यकर्ते आपले हे वेगळेपण टिकवण्यात आणि आपल्या नेत्यांना राज्य करण्यात आडकाठी आणत आहेत, ही भावना बळावत गेली आणि तिचा कडेलोट झाला, तो १९८३ साली फारूख अब्दुला यांचे सरकार केंद्राने बरखास्त केल्यावर. या भावनेला प्रखर विरोधाचे टोक येण्यास कारणीभूत ठरली, ती सत्तेच्या हव्यासाने केंद्रातील सत्ताधाऱ्यांशी हातमिळवणी करण्याची फारूख अब्दुल्ला यांची चाल. केंद्र सरकार व त्याच्या हातातील बाहुले बनणारे खोऱ्यातील नेते यांच्या विरोधात जनमत आकाराला येऊ लागले. ही संधी पाकने साधली.

अशा रितीने खलिस्तानी दहशतवाद निपटला जात असतानाच ही दुसरी आघाडी उघडण्याची संधी आपण पाकला दिली. बघता बघता पाकने या मूळच्या राजकीय मागणीचे धार्मिकतेत रुपांतर करून टाकले.

...आणि हा दशहतवाद निपटताना भारतीय राज्यसंस्थेच्या कारवाईत देशातील मुस्लिम समाज भरडला जाईल, अशा दृष्टीने पाक डावपेच खेळू लागला.

'हिंदू' भारतात मुस्लिम असुरक्षित आहेत, हे दाखवण्यावर पाकचा सतत भर राहिला आहे. जर भारतात मुस्लिम सुरक्षित आहेत, असे जगाला दिसू लागले, तर हिंदू व मुस्लिम समाज एकत्र नांदू शकत नाहीत, म्हणून वेगळे पाकिस्तान हवे, हा द्विराष्ट्रवादाचा सिद्धांतच कोलमडून पडतो. तसे घडल्यास पाकच्या अस्तित्वालाच अर्थ उरत नाही.

या डावपेचांचे उत्तम उदाहरण म्हणजे १९९३च्या जानेवारीत मुंबईत घडवून आणण्यात आलेली दंगल व नंतर त्याच वर्षी



मार्चमध्ये झालेले बॉम्बस्फोट. बाबरी मशीद पाडण्यात आल्यावर मुस्लिमांत निर्माण झालेल्या असंतोषाचा फायदा उठवून पाकने मुंबईतील दंगलीला चिथावणी दिली आणि त्या सापळ्यात हिंदुत्ववादी अलगद अडकल्यावर मुस्लिमांना त्याची जी झळ बसली, त्याचा बदला म्हणून बॉम्बस्फोट घडवून आणण्यासाठी त्यांच्यातील काहींना प्रवृत्त करण्यात आले.

त्यानंतरच्या गेल्या १३ वर्षात दहशतवादाला शह देण्यासाठी कडक कायदे हवेत, सुरक्षा दलांना जादा अधिकार दिले पाहिजेत, अशा मागण्यांतून टाडा, पोटा इत्यादी कायदेशीर उपाययोजना करण्यात आल्या. त्यांचा रोख मुस्लिम समाजावरच होता आणि त्या समाजातील असंतोष खदखदतच राहिला.

एकीकडे दहशतवादाच्या विरोधातील कारवायांचा रोख मुस्लिम समाजावर राहिला आहे आणि दुसऱ्या बाजूला राखीव जागांचे गाजरही त्याला दाखवले जात आले आहे. त्यामागे एकगठ्ठा मते मिळवण्याचेच राजकारण आहे. मुस्लिम समाज आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागास अवस्थेत आणि धर्मकारणाच्या चक्रव्यूहात अडकून राहण्यातच राज्यकर्त्यांवर्गाला आपले हित दिसत आले आहे.



भारत स्वतंत्र झाला, तेव्हा भारतात जो मुस्लिम समाज होता, त्यात प्रामुख्याने दोनच वर्ग होते. एक म्हणजे रईस मुस्लिमांचा आणि दुसरा होता सर्वसामान्य गरीब मुस्लिमांचा. रईस होते त्यापैकी काही उद्योग व्यवसायात होते. पण त्यांच्यापैकी बहुसंख्य हे जमीनदारी व वतनदारी करीत होते. उलट गरीब मुस्लिमांत मुख्यत: विविध प्रकारच्या कारागिरांचा भरणा होता. मुस्लिम समाजात मध्यमवर्गच नव्हता. समाजाचे नेतृत्व हे बहुतांश रईस मुस्लिमांच्या हाती होते आणि मुल्ला व मौलवी अशा धार्मिक लोकांचा समाजावर पगडा होता. हे मुल्ला व मौलवी आणि रईस मुस्लिम यांचे हितसंबंध एका स्तरावर समान होते. आपले महत्त्व टिकवण्यासाठी सर्वसाधारण मुस्लिमाला सतत आपल्या पाठीशी ठेवण्याकरता एकूणच समाज संकटात आहे, असे भासवणे या रईसांना आवश्यक वाटत होते. स्वातंत्र्यानंतर भारतात सतत या ना त्या वेळी होत असलेल्या जमातवादी दंग्यांमुळे तसे भासवणे मुस्लिमांतील रईसांना शक्यही होत होते. बहुसंख्य हिंदूंच्या देशात आपल्याला तगून राहायचे असेल, तर ऐक्य हवे आणि आपले वेगळेपण टिकवले जायला हवे व ते धर्माच्या आधारेच टिकू शकते, असे हे रईस समाजमनावर सतत बिंबवत राहिले. त्यामुळे कोणत्याही समाजात काळाच्या ओघात जशा धार्मिक व इतर सुधारणा होत राहतात, ती प्रक्रिया मुस्लिमांत फारशी झालीच नाही. महाराष्ट्रात मुस्लिम सत्यशोधक चळवळ झाली, नाही असे नाही. पण या चळवळीचा प्रभाव अगदीच अत्यल्प होता आणि सर्वसामान्य मुस्लिम तिच्यापासून दूरच राहिला. समाजावर पगडा राहिला तो मुल्ला व मौलवींचा व पकड राहिली ती रईस मुस्लिमांची. आणि आपण घेरले गेलो आहोत, अशा मन:स्थितीतच हा समाज वावरत राहिला.

जेव्हा केव्हा जमातवादी दंगे होत, तेव्हा ही घेरल्याची भावना अधिकच बळकट होत जाई आणि त्या प्रमाणात प्रस्थापित नेतृत्वाची समाजावरील पकड अधिक घट्ट होई. मुस्लिमांची अशी मनोवस्था असल्याने त्यांच्या नेतृत्वाला हाताशी धरले आणि त्याची सत्तालालसा पुरी केली की, संपूर्ण समाजाला आपल्या पाठीशी उभे करता येते, हे राजकीय पक्षांनी ओळखले. त्यामुळे मुस्लिम समाजाची एकगठ्ठा मते मिळण्यासाठी त्याच्या नेत्यांना आपल्या वेठीला बांधण्याचे प्रयत्न सुरु झाले.

त्यात काँग्रेस आघाडीवर होती. इतर पक्षांनीही हेच धोरण अवलंबले. अगदी कट्टर हिंदुत्ववादी भाजपालाही शोभेपुरते का होईना, मुस्लिम नेते आपल्या बाजूला घेणे आवश्यक होऊन बसले.

मुस्लिम मतदारांची लक्षणीय आणि देशाच्या अनेक भागांतील निर्णायक संख्या हे त्याचे कारण होते.

या राजकारणात मुस्लिम समाजाच्या विकासावर आणि धार्मिक सुधारणांवर कोणीही लक्ष दिले नाही. एकूणच हा समाज धार्मिकतेच्या गर्तेत राहिला, तरच आपले त्यात हित आहे, असे मानण्याकडे केवळ राजकीय पक्षांचाच नव्हे, तर या समाजाच्या नेत्यांचाही कल होता.

मात्र देशाच्या प्रगतीच्या ओघात मुस्लिम समाजातही काही बदल होत होते. मात्र त्यामुळे या समाजाला पूर्ण न्याय मिळाला, असे झाले नाही. पण बदल होत होता, हेही तेवढेच खरे. एक उद्योजक वर्ग या समाजात आकार घेत होता. या वर्गाच्या आकांक्षा समाजाच्या परंपरागत पठडीपेक्षा वेगळ्या होत्या. धार्मिकतेच्या पलीकडे जाऊन बघण्याची या वर्गाची इच्छा होती. आम्ही या देशाचे नागरिक आहोत, इतरांप्रमाणेच आम्हाला हक्क हवेत, विकासाच्या संधीही हव्यात, त्यासाठी देशाच्या मुख्य प्रवाहात राहायची आमची तयारी आहे, धर्माची बंधने झुगारून न देताही त्याचे अवडंबर मोडून काढायची आमची तयारी आहे, असे हा वर्ग म्हणू लागला. स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षांनंतर एका पिढीचे स्थित्यंतर मुस्लिम समाजात झाल्यावर हा बदल प्रकर्षानं जाणवू लागला.

मुस्लिम समाजात मध्यमवर्ग आकाराला येण्याची ही सुरुवात होती.

ही प्रक्रिया जर वेगाने घडत गेली असती, तर मुस्लिम समाजात सुधारणांचे दमदार पाऊल उचलले गेले असते. धर्माचा पगडा कमी झाला असता आणि आर्थिक व इतर स्तरांवरील प्रश्न ऐरणीवर आले असते. पण असे होणे हे जसे मुस्लिम समाजाच्या नेतृत्वाला व त्याला वेठीला धरणाऱ्या राजकीय पक्षांना परवडणार नव्हते, तसेच एकसाची सांस्कृतिक राष्ट्रवादाचा पुरस्कार करणाऱ्यांनाही ते पचणारे नव्हते. अशा रीतीने समाज सुधारला, तर त्यात आपल्याला धोका आहे, असे प्रस्थापित नेतृत्वाला वाटत होते. एकगठ्ठा मतांची सोय जाईल, ही भीती मुस्लिमांच्या नेतृत्वाला वेठीला बांधणाऱ्या राजकीय पक्षांना वाटत होती. मुस्लिमच जर बदलले, त्यांनी धार्मिक सुधारणा घडवून आणल्या, या समाजावरील धर्माचा पगडा हळूहळू दूर होत गेला, तर ज्या शत्रूकडे बोट दाखवून राजकारण करायचे, तोच नाहीसा होईल, हे सांस्कृतिक राष्ट्रवाद्यांना परवडणारे नव्हते. त्यांच्या राजकारणाचा व समाजकारणाचाच नव्हे, तर विचारसरणीचा पायाच हलला असता. साहजिकच या आकारास येणाऱ्या मध्यमवर्गापेक्षा प्रस्थापित नेतृत्वाची पकडच घट्ट राहावी, यासाठी पुराणमतवादी प्रवृत्ती प्रबळ होतील, असे निर्णय हे राजकीय पक्ष सत्तेत असताना घेत राहिले. शहाबानो प्रकरणानंतर मुस्लिम महिला विधेयक आणण्याचा राजीव गांधी यांचा निर्णय हा याच सदरात मोडणारा होता. दुसऱ्या बाजूला सांस्कृतिक राष्ट्रवादी या ना त्या निमित्ताने मुस्लिमांतील याच उदयाला येणाऱ्या मध्यमवर्गाला लक्ष्य बनवत राहिले. गोध्रा दुर्घटनेनंतर गुजरात घडवून आणणे, हे या डावपेचांचे ठळक उदाहरण होते. आपण घेरले गेलो आहोत, ही मुस्लिमांची भावना अधिकाधिक तीव्र बनावी, याच उद्देशाने हे डावपेच खेळले जात आले आहेत. गेल्या दोन दशकातील जमातवादी राजकारणामुळे मुस्लिम समाजातील ही भावना तीव्र बनत गेली आहे, हेही तेवढेच खरे. विशेषत: मुंबईची दंगल आणि त्यानंतर एका दशकाने घडवून आणण्यात आलेला गुजरातेतील नरसंहार यामुळे या भावनेला बळकटी येत गेली आहे. केवळ आम्हाला जगू द्या, इतर कोणत्याही मागण्या आम्ही करणार नाही, अशी शरणागती पत्करली, तरच या देशात राहता येईल, असेही मत मुस्लिम समाजात गेल्या काही वर्षात आकाराला येऊ लागले होते. विशेषत: राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या राजवटीच्या काळात असे मानण्याकडे मुस्लिम समाजाचा असलेला कल स्पष्टपणे दिसून येत होता.

जर दीर्घकाळ शांतता व सुरक्षितता यांची हमी मिळाली, तर या घेरले गेल्याच्या मन:स्थितीतून मुस्लिम समाज बाहेर पडू शकतो, नव्हे तसे करण्यास तो उत्सुक आहे, हे बिहारच्या निवडणुकीतील लालूप्रसाद यांच्या पराभवास कारणीभूत ठरणाऱ्या मतदानाच्या आकडेवारीने दाखवून दिले आहे. अशी घेरले गेल्याची मुस्लिमांची भावना अधिक बळकट करण्यासाठी लालूप्रसाद यादव यांनी आटोकाट प्रयत्न करूनही त्यांच्या पक्षाच्या मुस्लिम मतांत ११ टक्क्यांनी घट झाली आणि तीही गरीब मुस्लिमांनी पाठ फिरवल्याने घडून आली, ही लक्षणीय घटना आहे. भारतातील मुस्लिम समाज हा एकसाची आहे, या समजाला धक्का लावणारे हे मतदान होते. आपापल्या आर्थिक स्तराप्रमाणे मुस्लिमही मतदान करून शकतात, हे दर्शवणारी ही घटना आहे. ती मुस्लिम समाजातील बदलाची नांदी होऊ शकते.

तसे झाल्यास प्रस्थापित नेतृत्वाची पकड आणि धर्मवादाच्या आधारे मुल्ला व मौलवी यांनी समाजावर बसवलेला पगडा यांतून मुस्लिमांची सुटका होण्याच्या दिशेने पावले पडू लागतील.

तसे घडल्यास केवळ मुस्लिम समाजाच्याच नव्हे, तर संपूर्ण देशाच्या राजकारणाला एक कलाटणी देणारी ती घटना ठरेल.

अर्थात तसे घडण्यासाठी मुस्लिमांच्या आर्थिक आकांक्षांना प्रतिसाद दिला गेला पाहिजे. रोजगार हे मुस्लिमांचे मोठे दुखणे आहे. मुस्लिमांच्या लोकसंख्येतील प्रमाणाच्या तुलनेत समाजजीवनातील बहुतेक क्षेत्रांत त्यांना स्थान मिळत असलेले दिसत नाही. मुस्लिमांच्या आर्थिक स्थितीची कल्पना आणून देणारी काही सरकारी आकडेवारी बघणे उद्‌बोधक ठरेल. हस्तकला व्यवसायातील रोजगारात मुस्लिमांचे प्रमाण चांगले आहे. पण हस्तकला व्यवसायात मुस्लिमांच्या मालकीचे उद्योग फक्त ४.४ टक्के आहेत. सहकारी क्षेत्रातही मुस्लिमांना मिळणाऱ्या कर्जाचे प्रमाण केवळ २.५२ टक्के आहेत. खादी आणि ग्रामोद्योग मंडळाच्या कार्यक्षेतील हातमागाच्या उत्पादन केंद्रात ६५ टक्के मुस्लिम विणकर आहेत. पण अशी केंद्रे ज्यांच्या मालकीची आहेत त्यात फक्त २.७६ टक्के मुस्लिम आहेत. या मंडळातर्फे देण्यात येणारी आर्थिक मदत ज्यांना मिळते, त्यातील मुस्लिमाचे प्रमाण २.७ टक्केच आहे. बँका ज्यांना कर्ज देतात, त्यातील मुस्लिमांचे प्रमाण ३.७३ टक्के आहे. या मुस्लिमांना देण्यात आलेली कर्जेही एक लाख वा त्या खालच्या रकमांची आहेत. फक्त मालमोटरी, रिक्षा वा टॅक्सी खरेदी करण्यासाठी बँका देत असलेल्या कर्जातील मुस्लिमांचा वाटा २० टक्क्यांच्या वर आहे. ग्रामीण भागातील छोटे शेतकरी, शेतमजूर, भूमिहीन मजूर इत्यादीसाठींच्या सरकारी योजनांचा फायदा ज्यांना मिळतो, त्यातीलही मुस्लिमांचे प्रमाण अत्यल्प आहे.

इतर क्षेत्रांतील आकडेवारीचे स्वरूप असेच आहे. एकूणच मुस्लिमांच्या आकांक्षाना दृश्य स्वरूप आणून द्यायचे असेल, तर त्यांना सुरक्षा आणि शांततेच्या जोडीला आर्थिक स्थैर्यही मिळवून द्यावे लागणार आहे.

सच्चर समितीच्या अहवालात याच चित्राचे अधिक तपशीलावर ठळक प्रतिबिंब पडले आहे.

मुस्लिमांना खऱ्याखुऱ्या पद्धतीने रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील आणि त्या साधण्यासाठी त्यांना शिक्षण घेण्याची सोय असेल, या दृष्टीने प्रयत्न होत नाहीत. केवळ अल्पसंख्याकांसाठी मंत्रालय काढून काही साध्य होत नाही. प्रशासनाच्या जोडीला राजकीय व सामाजिक स्तरावरही मुस्लिम समाजाला देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोहिम हाती घेतली जायला हवी. पण तसे होताना दिसत नाही. मुस्लिमांच्या भौतिक गरजांपेक्षा त्यांच्या धार्मिक भावनांना हात घालणारे आणि त्या योगे समाजाला पुराणमतवादी विचारांच्या चौकटीत बांधून ठेवणारे निर्णयच घेतले जाताना दिसतात. मग तो स्थलांतरितांच्या संदर्भातील कायद्यात केवळ आसामसाठी बदल करणाचा प्रश्न असूदे किंवा त्यांना राखीव जागा देण्याचा वाद असूदे.

असा असुरक्षित व धर्माच्या घेऱ्यात अडकून पडलेला मुस्लिम समाज़ पाकला हवाच आहे आणि आपला राज्यकर्तावर्ग सत्तेच्या अनिर्बंध हव्यासापायी राजकारणातील सर्व विधिनिषेध बाजूला सारून मुस्लिमांनाही तसेच ठेवू पाहत आहे. त्यापायीच उद्या जरी काश्मीरचा प्रश्न सुटला, तरी या मुस्लिम समाजातील





काही जण पाकच्या कारवायांना बळी पडत राहतील आणि तसे ते पडून दहशतवाद माजतो, म्हणून कडक कारवाईच्या मिषाने राज्यसंस्था साऱ्या समाजावर रोख ठेवून कारवाया करीत राहील.

...आणि सर्व मुस्लिम दहशतवादी नसतात, पण सर्व दहशतवादी मुस्लिम असतात, हे अलीकडच्या काळात मान्यता पावत असलेले समीकरण अधिकाधिक पक्के होत जाईल.

साहजिकच जर भारतातील दहशतवादाला आळा घालायचा असेल, तर तो फोफावण्यामागची कारणे दूर करण्यासाठी राजकीय कारवाई व्हायला हवी. भारतीयत्वाच्या संकल्पनेत सर्व अस्मिता सामावल्या जाऊ शकतात आणि त्या दृष्टीने आम्ही खरोखरच बांधील आहोत, हे पारदर्शी प्रामाणिकपणे राज्यसंस्था हाकणाऱ्या राज्यकर्त्यावर्गाला दाखवून द्यावे लागेल. केवळ राजकीय फायदा होतो, म्हणून जुजबी व मलमपट्टी करणाऱ्या उपाययोजना निर्धाराने राजकर्त्यावर्गाला बाजूला साराव्या लागतील. काही कटू निर्णय घेणे भाग पडेल.

उदाहरणार्थ, काश्मीरचा गुंता सोडवण्यासाठी पाकशी चर्चा चालूच राहील. पण भारताने जम्मू-काश्मीरमधील सर्व राजकीय गटांशी चर्चेला प्रारंभ करायला पाहिजे. ही चर्चा स्वायत्तता किंवा स्वयंशासन या उद्दिष्टांबाबत असू शकते. मात्र अशी चर्चा करताना संपूर्ण भारतीय संघराज्याची पुनर्रचना करण्याचे शिवधनुष्य उचलण्याचीही तयारी ठेवायला हवी. स्वातंत्र्याच्या ६० वर्षांत आलेल्या अनुभवाच्या आधारे राज्यघटनेची पुनर्मांडणी केली जायला हवी. याचे कारण देशाच्या विविध भागांत आज अस्मितांचा जो विस्फोट झाला आहे आणि त्याच्या आधारे जे राजकारण खेळले जात आहे, ते परकीय शक्तींना दहशतवाद फोफावण्यास पूरक ठरणारेच आहे. ईशान्य भारतातील गनिमी चळवळींना बांगलादेशातून मिळणारी पाकची व त्या देशाची मदत हे त्याचे एक ठळक उदाहरण आहे. अर्थात अशी पुनर्मांडणी भारताची बहुविधता टिकवणारी व सर्वसमावेशकता अधिक सघन व सखोल करणारी हवी. बहुसंख्यांकांच्या सांस्कृतिक राष्ट्रवादाला अधिमान्यता देणारी ही पुनर्मांडणी असल्यास ती परकीय शक्तींना नव्याने संधी प्राप्त करून देणारी ठरेल.

अर्थात इतकी दूरदृष्टी व राजकीय धमक दाखवणारे आणि सत्ता मिळवण्यापलीकडे देशाच्या हिताला प्राधान्य देणारे नेतृत्व आज देशात आहे काय, हा खरा प्रश्न आहे.

...आणि त्याचे उत्तर आज तरी 'नाही' असेच आहे.

ही विदारक वस्तुस्थिती अधोरेखित करते, म्हणूनच या मांडणीच्या सुरुवातीस पंतप्रधानांच्या त्या विधानाचा उल्लेख केला होता. ❑

तरुणपणात जॉर्ज ऑरवेलची 'ॲनिमल फार्म' व '१९८४' ही पुस्तके मनात भिनली होती. माणूस, राष्ट्र व सत्ताधारी इतके नीच होऊ शकतील? याचे आश्चर्य वाटत होते. ते पुन्हा होणार नाहीत असेही वाटत होते... पण आज याच दोन प्रतिमा पुन्हा-पुन्हा मनात येतात. आजच्या कार्पोरेट डेमॉक्रसीत या सर्व प्रतिमा घट्ट बसतात.

दहशतवाद म्हटले की साधारणत: ट्विन टॉवर्स, बॉम्बस्फोट, संसदेवरचा हल्ला, नक्षलवादी, जिहादी, उल्फा हेच आठवतात. यात राज्यसंस्थेतर्फे आचरला जाणारा दहशतवाद फारसा चर्चेत येत नाही. गेल्या वीसेक वर्षांत मुक्त अर्थव्यवस्थेच्या नामघोषात राज्यसंस्थेची पीछेहाट (withdrawal of the state) याचा नारा जोरात लावला गेला. मात्र याच वर्षांत 'राज्या'च्या दहशतवादात प्रचंड वाढ झाली. दहशतवादी कृती करणाऱ्या गटांविरुद्धचाच हिंसाचार नव्हे तर विकास, संपन्नतेच्या नावाने एन्रॉन, एस. कुमार, होंडा, अंबानी, टाटा वगैरे कंपन्यांच्या वतीने त्यांना संरक्षण देण्यासाठी, त्यांच्या हितसंबंधांसाठी राज्यसंस्थेच्या पोलिसांनी बेछूट हिंसाचार केला आहे. आजही करीत आहेत.

**संजय संगवई**

# कार्पोरेट दहशतवाद

## पुन्हा एकदा ॲनिमल फार्म

पारंपरिक, ठोकळेबाज पद्धतीने, भांडवलाच्या जोरावरच होणारा तो विकास—तोच फक्त विकास—त्या व्यतिरिक्त इतर सर्व किंवा त्याला आव्हान देणारे काहीही नष्ट करायचे, दडपून टाकायचे, किंवा बदनाम-बहिष्कृत करायचे हा नवा 'कार्पोरेट दहशतवाद' गेल्या वीस-पंचवीस वर्षांत प्रचंड वाढला आहे. याला दहशतवाद न म्हणता फ्री-मार्केट व लिबरॅलिझम (खुला बाजार व उदारमतवाद) म्हणा–याची जणू जबरदस्तीच केली जात आहे. पुन्हा 'ॲनिमल फार्म' व '१९८४'ची आठवण!!

दहशत म्हणजे इतरांच्या जिवाला असुरक्षित करणे, त्यांना जे वाटते ते न करू देणे - त्यापासून त्यांना जबरदस्तीने रोखणे व सतत माणसाला धडधडत ठेवणे. अमूक केले म्हणजे शरीराला किंवा जिवाला धोका आहे, तमुक केले तर तुमची इज्जतच काढणे, बदनाम करणे - थोडक्यात आयुष्यातून उठवणे - शारीरिक, मानसिकदृष्ट्या हल्ला, खच्चीकरण, हतबल करणे होय. दहशतवाद म्हणजे कोणत्या तरी एका कथित तात्त्विक-राजकीय गृहीतकाच्या आधारे सार्वत्रिक दहशत पसरवणे होय. अशा दहशतवादाचा आधार हा वैचारिक, राजकीय सर्वंकषवाद (totalitarianism) असतो. सर्व जगाने, इतर समुहांनी आम्ही सांगू ते ऐकले पाहिजे व आमचे जो ऐकणार नाही किंवा आमच्याहून अलग-वेगळी काही कृती असली, विचार असला, तर तो चालवून घेतला जाणार नाही. अशातून हा सर्वंकषवाद व फॅसिझम वाढत जातो व पुढे अशी कोणतीही विरोधी कृती रोखण्यासाठी दहशतीचा आश्रय येतो.

असा सर्वंकषवादी दहशतवाद जगण्याच्या प्रत्येक क्षेत्रात मौजूद असतो. रोजच्या जगण्यातल्या सवालापासून ही दहशत वा हा फॅसिझम सुरु होतो. मात्र त्याच्याकडे आपण फारच कमी किंवा नगण्य लक्ष देतो. त्याच्यातून काही दहशती सर्वंकषवादाचा निष्कर्षही काढत नाही. मात्र शहरी वा निम-शहरी व अर्ध ग्रामीण व ग्रामीण भागातही आपण रोजच्या जगण्यातही प्रत्येक टप्प्यावर अशी व्यवस्थेतली असहायता व अनाहत दहशत अनुभवतो. शहरात पाणी, दूध, स्वयंपाकाचा गॅस, फोन, वाहतूक, शाळा,उच्चशिक्षण, इस्पितळ, नोकरी, बेरोजगारी, व्हीआरेस असे माणसाची पिळवणूक करणारे, पराभूत करणारे मुद्दे आहेत. तर ग्रामीण भागात अगदी प्रचलित विकासप्रक्रियेतील तलाठी-ग्रामसेवक-लाइनमन-पाटकरी-फौजदार इत्यादी षड्रिपुंच्या दहशतीपासून आता नव्या आर्थिक सुधारणांमुळे शेती, रोजगार, ग्रामीण उद्योगांचे संरक्षण काढून घेणे व त्यांना बाजारवादी ताकदींच्या पुढ्यात टाकून देणे यामुळे शेतकरी-विणकरांच्या आत्महत्यांपासून ते आत्यंतिक दारिद्र्य, बकालपणा व ग्रामीण भागातील उद्ध्वस्त स्थिती आहे. या सर्वांमुळे माणसांची आयुष्ये, पिढ्यानपिढ्या बरबाद होताहेत, खुरटून जाताहेत.

हाच शेतकरी-ग्रामीण व आदिवासी शेतकरी व कष्टकरी शहरात येतो, तेव्हा येथेही त्याला स्थान नाही. त्याच्या जगण्याची, राहण्याची, उपजीविकेची तर हमी नाहीच. त्याउलट तिथून हाकलून देण्याचीच निश्चिती आहे. मुंबईतील किमान ४ लाख झोपडपट्टीवासी कष्टकऱ्यांना डिसेंबर २००४ पासून उखडून टाकण्यात आले. त्यांच्यापैकी काहींनी जिथे फेकले गेले त्या जागी उन्हा-पावसापासून निवारा उभारला. तोही मायबाप सरकारने व पोलिसांनी तोडून टाकला. सुमारे दीड लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे दिवस होते. ते वर्ष वाया गेले. किमान २ लाख स्त्रिया व त्यातही अर्धा लाख वयात आलेल्या मुली - हे सर्व थंडीपावसात, उन्हात उघड्यावर राहात आले आहेत. ६ एप्रिल २००५ रोजी काढलेल्या मोर्चावर अमानुष लाठीहल्ला झाला हे एरवी झोपडवासियांविरुद्ध खोडसळ बातम्या देणाऱ्या काही वृत्तपत्रांनाही मान्य करावे लागले. मात्र या कशावरही 'सकाळ', 'नवाकाळ', 'महानगर' सारखे काही अपवाद वगळता मराठी वृत्तपत्रांनी सहानुभावाने लिहिले नाही. केली ती फक्त मेधा पाटकरांवर जबरी टीका व टिंगल. इंग्रजी वृत्तपत्रातल्या कार्पोरेट संस्कृतीतही काही नव्या मुली प्रारंभी सरकारी अत्याचार पुढे आणत होत्या. मात्र त्यांनाही तत्परतेने बदलण्यात आले.

मुख्य म्हणजे ज्या धोरणाच्या व विचारधारेच्या प्रभावाखाली हे केले जात आहे, त्याला सवाल फार कमी माध्यमांनी केला. मुंबईचे सौंदर्यीकरण व पायाभूत सुविधांच्या नावाखाली लाखो लोकांना बेघर करून त्या जमिनी पुन्हा मोठ्या बिल्डर्सच्या हाती सोपवायच्या, हे राजकारण सुरू आहे. त्यासाठी सामान्य गरीब उत्पादक व कष्टकरी वर्गाला आपल्या राहण्याच्या व व्यवसायाच्या जागेवरून हटवायचे व त्यानंतर त्याच्यासंबंधी कोणतीही जबाबदारी पार पाडायची नाही हे महानगरांतून आणि अगदी लहान शहरांतूनही होत आहे. या प्रकरणात राज्य सरकारचे राजकीय निर्णयकर्ते व नोकरशहा तर असतातच. मात्र ही मंडळी जे करतात ते या बड्या कार्पोरेट्सना जे हवे त्यानुसारच करत असतात हे मुंबईत स्पष्ट झाले. सुमारे ९०-१०० झोपडपट्ट्या व चार लाख लोक हटवून केवळ ३०० एकर सरकारी जमीन मोकळी झाली. मात्र त्याच वेळी महाराष्ट्र सरकारने कापड गिरण्यांच्या जमिनीच्या संदर्भात बोटचेपी भूमिका घेऊन मध्यमवस्तीतील किमान ६०० एकर जमीन या बड्या कार्पोरेट्सच्या घशात जाऊ दिली. शहरी कमाल जमीन धारणा कायद्याच्या (अर्बन लँड सिलिंग ॲक्ट) वापरच थंड्या बासनात ठेवला. त्या कायद्याचा वापर करून गोदरेज,

दिनशॉ व अन्य बड्या कार्पोरेट्सकडील अतिरिक्त जमीन काढून घेतली असती तर आजमितीस किमान ५००० एकर जमीन मुंबईत घरबांधणी, पुनर्वसन व पायाभूत सुविधांना उपलब्ध झाली असती असे ज्येष्ठ समाजवादी नेत्या मृणाल गोरे यांनी सविस्तर वारंवार दाखवून दिले होते. मुंबईत गरिबांसह सर्वांना घर बांधण्याची योजना करण्यासाठी चंद्रशेखर प्रभु, अरविंद आडारकरांसारखे नामवंत वास्तुरचनाकार व त्यांच्या संस्था तयार होत्या. मेधा पाटकरांसह प्रत्यक्ष झोपडपट्ट्यांत काम करणारे अनेक कार्यकर्ते, राज अवस्थींसारखे वकील व अन्य व्यावसायिक सरकारशी या विषयावर चर्चा करायला तयार होते व अजूनही आहेत.

मात्र त्या कुणाशीही विचारविमर्श न करता, मेधाताई, राज अवस्थी यांना तुरुंगात डांबून सरकारने फक्त उद्योगपती व कार्पोरेट्सच्या 'सिटीझन्स ॲक्शन ग्रुप' या समुहाशीच संबंध ठेवले. मुंबईतले बडे बिल्डर हिरानंदानी, रुपाणी, उद्योगपती अंबानी, रहेजा ही मंडळी यात आहेत. तर राज्य सरकारने सर्व संबंधित अधिकाऱ्यांना या 'कॅज' च्या बैठकांना हजर राहण्याचा आदेश दिला. या मंडळींनी झोपडपट्ट्या हटविण्याचे स्वागत केले, त्यासाठी पंतप्रधानांचे व मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन केले. महाराष्ट्राच्या नगरविकास खात्याचा एक अधिकारी मुंबईच्या या व्यापारी योजनांचा अधिकारी आहे. मुंबई महानगर विकास, महानगर वाहतूक विकास (MMRD, MUTP) यानंतर आता मुंबई महानगरी बाजार क्षेत्र (Mumbai Urban Business Plan) आकाराला येत आहे.



या सर्वांची चर्चा या कार्पोरेट्सबरोबरच जागतिक बँकेच्या अधिकाऱ्यांबरोबर होते. त्यांचाही आग्रह जमिनी खुल्या कराव्यात. बिल्डरांप्रमाणे बँकही शहरी जमीन धारणा कायदा काढून टाकू इच्छिते. पाण्याचे, कचरा उचलण्याचे खासगीकरण तर होतच आहे. (शिवाय गेल्या वर्षी मुंबईच्या बजेटचेही कंत्राट वीस कोटी रुपयांना मॅकिन्सी कंपनीला दिले गेले. ही माहिती कुठेही बाहेर येऊ नये अशी व्यवस्था होतीच.) कॉंग्रेस, शिवसेना, भाजप व राष्ट्रवादी - सर्व पक्ष अशा लोकविरोधी व बहुराष्ट्रीय उद्योगांचे—कार्पोरेट्सचे हितरक्षक झाले आहेत. तेही सर्व लोकशाही संस्था, बिरुदे वापरून. लोकशाहीची जबाबदारी व नियंत्रण नष्ट करून.

हिटलरनेही १९३३ नंतर जर्मनीमधील सर्व लोकशाही संस्था, संज्ञांचा उपयोग करून आपला सर्वंकष नाझी दहशतवाद बळकट केला. आज राज्य स्तरावर व केंद्रीय स्तरावर राजकीय पक्ष, संसद यांचा अक्षरश: वापर करून कार्पोरेट्स शक्ती, नोकरशाही व काही राजकीय पक्ष व नेत्यांमार्फत भारतीय लोकांच्या हातातली साधनसंपदा काढून घेताहेत, त्यांना दुबळे, असहाय्य व अनुत्पादक ठरवून त्यांना अनिश्चित असलेल्या योजना (ज्या केव्हाही गुंडाळल्या जाऊ शकतात) त्यांच्यावर लादत आहेत. याची आणखी बृहद उदाहरणे म्हणजे नर्मदा खोऱ्यातील धरणांची उंची वाढवण्याचे राजकारण व आताचा विशेष आर्थिक क्षेत्राचा नवा घोटाळा.

नर्मदा खोऱ्यात गेली वीस वर्षे आदिवासी व शेतकरी सरदार सरोवर धरणाविरुद्ध, स्वत:चा जगण्याचा अधिकार व संसाधने वाचवण्यासाठी लढत आहेत. त्यांचे मुद्दे वारंवार सिद्ध होऊनही केंद्रीय नोकरशाहीने व महाराष्ट्र-मध्यप्रदेशाच्या सत्ताधाऱ्यांनी, सूडबुद्धीने लोकांना बुडविण्याचे राजकारण केले. धरणाच्या लाभ-हानीचे राष्ट्रहिताच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मुद्दे या नोकरशाहीने सतत दडपून ठेवले. (आज जे गृहस्थ जलतज्ज्ञ म्हणून मिरवत आहेत ते माजी केंद्रीय सिंचनसचिव माधव चितळे यांचा या दडपेगिरीत सर्वात मोठा हात आहे.) निखालस खोटी गैरसंविधानिक व बेकायदा तत्त्वे निर्माण करून हा प्रकल्प लोकांवर लादण्याच्या त्यांच्या व त्यांच्या नंतरचे सचिव थत्ते किंवा त्यांच्यापूर्वीचे पाध्ये यांच्या करामतींना स्टालिनिस्ट रशियातील खरे म्हणजे खोटे-खोटे म्हणजे खरे या 'ॲनिमल फार्म' सारख्या वर्तनाचीच उपमा शोभते. महाराष्ट्र व गुजरात सरकारच्या हिंसक पोलिसी कारवायांना योग्य ती भूमी तयार करून देण्याचे कामही नोकरशहा मंडळीच करू शकतात. आता न्यायाधीशही त्याच रांगेत जातात की काय अशी भीती आहे. निवृत्त झाल्यावर किंवा मुदतीपूर्वी निवृत्त होऊन अनेक अधिकारी जागतिक बँकेच्या किंवा कार्पोरेट्सच्या सेवेत जातात.



शहरविकास खात्याचा सचिव राजीनामा देऊन डीएलएफ आकृतीचा सीईओ होतो. नर्मदाप्रकरणी धरण बिनदिक्कत बांधावे व त्यामुळे लोकांच्या अधिकारांचे कोणतेच उल्लंघन होत नाही; धरण चांगले, पुनर्वसनही चांगले असा निकाल देणारे व काहीही कारण नसताना नदी-जोड योजना अंमलात आणण्याला व पाण्याच्या खासगीकरण करण्याला चालना देणारे सर्वोच्च न्यायालयाचे न्या. बी. एन. किरपाल हे निवृत्त झाल्यावर कोका-कोला कंपनीचे कायदा-सल्लागार होतात. केवळ काही अधिकारी अट्टाहासाने धरणाचे काम चालू ठेवून ३५,००० कुटुंबांना संकटात बुडवतात असे चित्र इथे दिसते.

नर्मदा संघर्षात साधे 'पुनर्वसन होईस्तोवर धरणाचे काम पुढे जाऊ देऊ नका' असे म्हणणे म्हणजे हटवादी, अतिरेकी दृष्टिकोन आहे; आमीरखानसारख्या नटाने किंवा इतर कुणीही धरण बांधण्यापूर्वी पुनर्वसन करा म्हणणे म्हणजे काहीतरी भयानक आहे अशी आवई उठवली जाते. तोडफोड, जाळपोळ, मारहाण, धमक्या या सर्वांचा उपयोग नर्मदा प्रकरणात जेवढा केला गेला तेवढा इतर प्रकल्पाबाबत क्वचितच असेल. चिमणभाई, नरेंद्र मोदींसारख्या नेत्यांचा फॅसिझम, अधिकाऱ्यांचा स्टॅलीनिझम यांचा इथे संगम आहे.

### महाप्रचंड जमीन घोटाळा

यातच आता आणखी एका विकास-दहशतवादाची भर पडत आहे. 'विशेष आर्थिक क्षेत्रा'च्या नावाने हजारो हेक्टर्स जमीन अंबानी, हिरानंदानी, रहेजा, पोस्का, टाटा, कल्याणी, महिंद्रा इत्यादी कार्पोरेट्सना दिली जात आहे. त्यात भर म्हणून लाखो कोटी रुपयांची करांतून सूट त्यांना दिली जात आहे. तुम्ही कोणत्याही कराचे नाव घ्या तो या विआक्षे (सेझ) ला लागू नाही. कामगार, पर्यावरण, बँकिंग, कंपनी इत्यादी कायदे तिथे लागू नाहीत. ती 'विदेशी भूमी' आहे व तिथे पोलिस व न्याय व्यवस्थाही त्यांचीच राहणार आहे. आज जमीन, पैशांची सबसिडी व लूट यांचे राजकारण इतके जोरदार सुरू आहे की त्याला थोडा जरी विरोध केला तरी 'इंडियन एक्सप्रेस'सह सर्व कार्पोरेट माध्यमांची तुमच्याविरुद्ध बदनामीची मोहीम सुरू होते. लोकांनी जमीन सोडावी यासाठी रिलायन्स कंपनी रायगड जिल्ह्यात दहशतवादी मार्ग अवलंबत आहे. जमीन हे अन्न उत्पादनाचे साधन नव्हे - त्यापेक्षा अधिक फायदेशीरपणे जमीन उपयोगात आणता येते, असे ऑर्वेलच्या '१९८४'मध्ये शोभेल असे वाक्य ज्यावेळी कार्पोरेट्सचा प्रवक्ता 'इंडियन एक्स्प्रेस' म्हणतो त्यावेळी येणाऱ्या थंड दहशतीच्या जाणिवेने आपण थिजून जातो. आज कमलनाथ, शरद पवार, मनमोहनसिंग, अरूण जेटली, गडकरी, ठाकरे ही सर्व मंडळी अशीच भाषा बोलताहेत.

या सर्वांचा परिपाक असलेले, पण मृदू बोलणारे अर्थमंत्री पी. चिदंबरम म्हणतात की, देशाचा वाढीचा दर हा ८ टक्के राहील, याबाबत मतभेद नको. तुमची काय मते असतील ते मांडा. मात्र ८ टक्के वाढीच्या दराला जे कोणी विरोध करतील तो विरोध पुसून टाकला (brushed off) जाईल. चिदंबरमसारख्या माणसाने अशी brush off ची धमकी देणे हा देशातल्या सामान्य, गरीब, संघर्षरत लोकांना, आदिवासी, दलित व मागासांना इशारा आहे — नव्हे आव्हान आहे.

आज या प्रचलित विकासाची दहशत एवढी वाढली आहे की सामान्य माणसाला एक तर त्याला शरण जावे लागते किंवा त्याच्या समोर चिरडून जावे लागते. जो यात सामील होत नाही त्याचे आयुष्य असुरक्षित केले जाते. सकल राष्ट्रीय उत्पादन (जीडीपी) वाढवण्याच्या नादात आज बड्या कार्पोरेट्सना प्रचंड सवलती देऊन, त्यांच्या ताब्यात समाजातील सर्व आर्थिक साधने देऊन त्यांना संपन्न बनवले जात आहे. आणि त्यांची संपन्नता जणू देशातील लोकसंख्येत विभागून जीडीपी वाढवल्याची हवा निर्माण करण्यात येत आहे. हा अडाणीपणा व फसवणूक आहे हे दिसत असूनही 'ॲनिमल फार्म' मधल्याप्रमाणे ते खरे मानायचे. कारण दिवसरात्र त्याच्या अस्तित्वाविषयी खात्री देणाऱ्या माध्यमांच्या मेंढ्या आहेत व न मानले तर पोलिस सुरक्षा सैनिकांचे चमकणारे दात व सुळे आहेत. राजकारणी व नोकरशहा त्यांचे एजंट-दलाल झाले आहेत.

आज जमीन, जंगल, पाणी, वीज, वाहतूक, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य अशा अनेक क्षेत्रांवर या महाकंपन्यांचा व खासगी मालकांचा कब्जा होत चालला आहे. लोकांचे अधिकार, सार्वजनिक सेवा, समानता, लोकशाही निर्णयप्रक्रिया यांना दडपले जात आहे. विशेष म्हणजे या दडपशाहीला दहशतीचे मूल्य देण्यात खाजगी भांडवलदारांच्या टोळ्यांबरोबरच, राज्य संस्था, लोकनियुक्त सरकारेही सामील आहे. त्यासाठी नवी मिथके, नव्या व्याख्या घडवाव्या लागतात. ते काम आपली कार्पोरेट माध्यमे करीतच आहेत. पोलिसव्यवस्था त्यात भांडवलदारांसाठी राबत आहे. आणि न्यायव्यवस्था या सर्वांवर जणु मान्यतेची मोहरच उठवत आहे.

हे सर्वच थिजवून टाकणारे व निराश करणारे आहे.

मात्र सामान्य लोक या विकासाचा, या दहशतवादाचा आपल्या पद्धतीने प्रतिकार करीत आहेत. मुंबई, दिल्ली, कोलकातासकट ठिकठिकाणी झुग्गी-झोपडीवासी व फेरीवाले अंतिम लढा देत आहेत. झारखंड-छत्तीसगड व उडीसाचे आदिवासी लढत आहेत. विदर्भातल्या किसानांच्या आत्महत्या होताना 'सेझ'च्या नावाखाली लोकांच्या उत्पादनाची साधने-जमिनी-काढून घेतल्याचा देशभरातले किसान प्रतिकार करीत आहेत. कोका-कोलाच्या जाहिरात युगाला न जुमानता प्लाचीमाड, वाराणसी, कालाडेरामध्ये जनसंघर्ष सुरु आहे. पाणी-जमिनीच्या अधिकारांसाठी, माहितीच्या अधिकारांसाठी सतत मोहिमा सुरु आहेत. विस्थापनाच्या, विनाश व विषमतेच्या विरोधात ठिकठिकाणी संघर्ष जारी आहेत. जितकी जास्त दहशत फैलावण्याचा प्रयत्न होईल तेवढा तीव्र व व्यापक प्रतिकार होत जाईल.

या जन-प्रतिकाराला बदनाम करण्याचा, दडपण्याचा प्रयत्न फार काळ यशस्वी होणार नाही. या देशी-विदेशी भांडवलदारांबरोबर त्यांच्या राजकीय व नोकरशाही दलालांनाही उखडून टाकण्याची तयारी जन संघटना आंदोलने, पुरोगामी पक्ष-संघटना करीत आहेत. नव्हे; तसे करणे आपल्या सर्वांच्याच निकोप जगण्यासाठी जरूरी आहे.

❑

**डॉ.** बाबासाहेब आंबेडकर अकादमीची स्थापना ७ जून १९९२ रोजी सातारा येथे झाली. सामाजिक परिवर्तनाला पूरक प्रबोधन, परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण आणि सामाजिक-राजकीय प्रश्नांवर संशोधन ही प्रमुख उद्दिष्टे अकादमीच्या स्थापनेमागे होती. १९८० पासून भारतीय समाजात वाढत असलेल्या प्रतिगामी राजकारणाला अटकाव करण्याची निकड जाणवूनच आंबेडकर अकादमीच्या स्थापनेचा विचार पुढे आला होता. प्रतिगामी शक्तींच्या प्रादुर्भावामुळे आक्रसत चाललेल्या परिवर्तनाचा अवकाश अस्वस्थ करणारा होता. एकीकडे वर्गीय चळवळींची पीछेहाट तर दुसरीकडे भगव्या फैलावामुळे वाढत चाललेले अस्मितेचे राजकारण, यामुळे परिवर्तनाच्या प्रक्रियेला खिळ बसत होती. याच टप्प्यावर भारताने नव्या आर्थिक नीतीचा स्वीकार केला आणि अर्थव्यवस्था खुली केली. बाजारकेंद्री अर्थव्यवस्था आणि राज्यसंस्थेने सामाजिक न्यायाच्या भूमिकेपासून फारकत घेण्यासाठी चालवलेली तयारी यामुळे शोषणाचे स्वरूपही अधिक गडद होणार, हेही स्पष्ट दिसत होते. या पार्श्वभूमीवर समतालक्षी विचारांची पाठराखण करण्यासाठी 'आंबेडकर अकादमी'ची स्थापना झाली.

■ चैत्रा रेडकर

डॉ. आ. ह. साळुंखे, प्रा. रा. ग. जाधव व श्री. किशोर बेडकीहाळ हे अकादमीचे त्यावेळचे निमंत्रक होते. अकादमीची स्थापना ज्येष्ठ समाजवादी श्री. विनायकराव कुलकर्णी आणि ज्येष्ठ अभ्यासक डॉ. य. दि. फडके यांच्या हस्ते झाली. डॉ. आ. ह. साळुंखे हे अकादमीचे पहिले अध्यक्ष तर डॉ. य. दि. फडके हे पहिले उपाध्यक्ष होते. प्रा. एन. डी. पाटील, दिवंगत प्रा. सत्यरंजन साठे, प्रा. भास्कर भोळे, प्रा. रावसाहेब कसबे, श्रीमती विद्या बाळ, प्रा. पुष्पा भावे, प्रा. फक्रुद्दिन बेन्नूर, श्री. गजानन खातू, श्री. महंमद खडस, श्री. प्रकाश बाळ, डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. राजेंद्र व्होरा, डॉ. सुहास पळशीकर, डॉ. यशवंत सुमंत, श्री. नरेंद्र दाभोलकर, श्री. प्रमोद कोपर्डे, श्री. संजीव साने यांसारखे परिवर्तनावर निष्ठा असणारे अनेक मान्यवर कार्यकर्ते, अभ्यासक आणि विचारवंत अकादमीला सदस्य म्हणून लाभले. दिवंगत समाजवादी कार्यकर्ते श्री. माधव साठे यांचा 'आंबेडकर अकादमी'च्या जडणघडणीत मोलाचा वाटा होता. 'आंबेडकर अकादमी'च्या स्थापनेतून महाराष्ट्राच्या विविध गावांत/शहरांत कार्यरत असलेल्या समतावादी कार्यकर्ते-अभ्यासक-विचारवंतांचा आवाज संघटित झाला आणि वैचारिक देवाण-घेवाणीतून सामाजिक हस्तक्षेपासाठी व्यासपीठ उपलब्ध झाले.

गेल्या १४ वर्षांत 'आंबेडकर अकादमी'ने सामाजिक प्रबोधनासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. त्यापैकी 'विचारवेध संमेलन' हा महाराष्ट्रात सर्वत्र परिचित असा उपक्रम आहे. विचारवेध संमेलनांची सुरुवात बाबरी मशिदीच्या पाडावाच्या पार्श्वभूमीवर झाली. हिंदुत्ववादी राजकारणामुळे धार्मिक तेढ तर वाढत होतीच, त्याचबरोबर सर्व प्रकारच्या श्रेणीबद्धतेचे आणि विषमतेचे छुपे व खुले समर्थनही जमातवाद्यांकडून केले जात होते. या सर्वाचे टोक बाबरी मशिदीच्या पाडावातून गाठले गेले आणि भारतीय संविधानिक मूल्यांनाच प्रतिगामी शक्तींनी पायदळी तुडवले. हे सर्व समतावादी कार्यकर्त्यांसाठी अनेक अर्थाने धक्कादायक होते. ज्या विसाव्या शतकाने मानवमुक्तीच्या अनेक विचारधारा दिल्या, मार्क्स, फुले-आंबेडकर, गांधींसारखे मानवमुक्तीचा समग्र विचार करणारे द्रष्टे दिले, त्याच शतकाचा शेवट माणुसकीला काळिमा फासणाऱ्या दंगलींनी आणि विषमतावादाच्या पुनरुत्थानाने व्हावा, हे अत्यंत विदारक होते. या सर्व पुनरुज्जीवनवादी, विषमतावादी प्रवाहांविरुद्धची लढाई अधिकाधिक परिणामकारक होण्यासाठी वेगवेगळ्या समतावादी चळवळींमध्ये कार्यरत असलेल्या आणि परिवर्तनावर निष्ठा असणाऱ्या कार्यकर्त्या-अभ्यासकांमधील संवाद वाढविण्याची गरज होती. त्याचबरोबर ज्या विसाव्या शतकाने या परस्परविरोधी प्रवाहांना जन्म दिला त्याचे समग्र आकलनही आवश्यक होते. विचारवेध संमेलनांच्या माध्यमातून 'आंबेडकर अकादमी'ने या दोन्ही बाबी साध्य करण्याचा प्रयत्न केला. पहिले विचारवेध संमेलन फेब्रुवारी १९९४ मध्ये 'विसाव्या शतकातील धर्मचिंतन'




शोर बेडकिहाळ

या विषयावर सातारा येथे प्रा. मे. पुं. रेगे यांच्या अध्यक्षतेखाली भरले. तेव्हापासून दरवर्षी विविध सामाजिक प्रश्नांची चिकित्सा करणारी विचारवेध संमेलने महाराष्ट्रातील विविध ठिकाणी आयोजित करण्यात आली आहेत. आतापर्यंत लातूर, इचलकरंजी, नाशिक, औरंगाबाद, सोलापूर, बेळगाव, सावंतवाडी, परभणी, वर्धा, वाशी, बार्शी, वडघर (माणगाव), शिरूर या ठिकाणी विचारवेधचे आयोजन झाले आहे. यात भारतातील विसाव्या शतकातील धर्मविचार, सामाजिक चळवळी, राजकारण, अर्थकारण, जातिव्यवस्था, समताविचार, संस्कृती आणि सामाजिक परिवर्तन इत्यादी विषयांवर सखोल चर्चा झाली आहे. २००१ पासून एकविसाव्या शतकात भारतीय समाजापुढे उभ्या राहिलेल्या विविध आव्हानांच्या संदर्भात भारतातील लोकशाही, भारतीय समाजापुढील यक्षप्रश्न, शिक्षण, विकास, वंचितांच्या चळवळी, स्त्री चळवळ इत्यादींविषयीचे विश्लेषण आणि चिंतन विचारवेधमध्ये झाले आहे. आतापर्यंत प्रा. मे. पुं. रेगे, प्रा. रावसाहेब कसबे, डॉ. य. दि. फडके, प्रा. राम बापट, प्रा. नलिनी पंडित, प्रा. भा. ल. भोळे, डॉ. आ. ह. साळुंखे, डॉ. गोपाल गुरू, डॉ. एन्. डी. पाटील, श्री. वसंत पळशीकर, प्रा. रमेश पानसे, श्री. बगाराम तुळपुळे, डॉ. यशवंत सुमंत, डॉ. छाया दातार यांनी विचारवेधचे अध्यक्षपद भूषविले आहे. महाराष्ट्रातील अनेक मान्यवर अभ्यासक-कार्यकर्त्यांनी ज्याप्रमाणे विचारवेधमधे मांडणी केली आहे, त्याचप्रमाणे महाराष्ट्राबाहेरील डॉ. इम्तियाज अहमद, डॉ. योगेंद्र यादव, डॉ. उमा चक्रवर्ती, डॉ. गो. पु. देशपांडे, डॉ. बी. एस्. बावीस्कर, डॉ. अनिल सद्गोपाल, डॉ. सतीश सभरवाल, प्रा. अंजुमन इस्लाम, डॉ. स्मित कोठारी, प्रा. अजीत झा, श्री. प्रफुल बिडवई, डॉ. प्रभात पटनाईक, श्रीमती मधु किश्वर (सर्व दिल्ली), डॉ. रणधीर सिंह (चंदिगड), श्रीमती राधाबेन भट (इंदूर), डॉ. वीणा आलासे (कलकत्ता), श्री. ज्योतीभाई देसाई (सुरत), श्री. गोपाल राठी (भोपाळ), डॉ. शांता सिन्हा (हैद्राबाद) यासारख्या मान्यवरांनीही विचारवेधमध्ये आपले विचार मांडले आहेत.

''विचारवेधमध्ये निव्वळ चर्चा होतात. सामाजिक परिवर्तनाचा कोणताही ठोस कार्यक्रम दिला जात नाही.'' असा आक्षेप विचारवेधच्या संदर्भात घेतला गेला आहे. मात्र ८० नंतरच्या दशकांत पुढे आलेल्या चळवळींचे स्वरूप लक्षात घेतले तर विचारवेधची प्रस्तुतता स्पष्ट होऊ शकेल. १९८० नंतरच्या कालखंडात उभ्या राहिलेल्या बहुसंख्य चळवळी या स्वप्रतिनिधित्वाची भूमिका घेतलेल्या आणि/किंवा एकप्रश्नलक्षी चळवळी आहेत. त्यामुळे विशिष्ट प्रश्नांसंबंधीचे त्यांचे अनुभव सखोल असले तरीही ज्या प्रस्थापिताविरुद्ध लढायचे आहे त्याच्या अधिक समग्र आकलनासाठी अशाप्रकारची वैचारिक देवाणघेवाण निव्वळ आवश्यकच नाही तर अपरिहार्य बनली आहे. विचारवेधच्या व्यासपीठावरील वैचारिक देवाणघेवाण ही 'सामाजिक प्रगल्भता, वैचारिक परिपक्वता आणि क्रियाशील बंधुत्वा'च्या उभारणीसाठी उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. विचारवेधच्या आयोजनात स्थानिक पातळीवर कार्यरत असलेल्या समविचारी संघटनांना सहभागी करून घेण्याची अकादमीची भूमिका ही महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील परिवर्तनवादी संघटनांचे जाळे तयार होण्यासाठी केलेला प्रयत्न आहे.

आंबेडकर अकादमीने सातत्याने चालवलेला प्रबोधनात्मक स्वरूपाचा दुसरा उपक्रम हा पत्रकार प्रबोधन शिबिरांचा आहे. पत्रकारांसाठी व्यावसायिक स्वरूपाची शिबिरे अनेक ठिकाणी आयोजित होत असतात, मात्र अशा शिबिरात सामाजिक संवेदना विकसित करण्यापेक्षा करिअर यशस्वी करण्याचे तंत्र आणि मंत्र सांगण्यावर अधिक भर असतो. 'आंबेडकर अकादमी'ने आयोजित केलेली पत्रकार प्रबोधन शिबिरे पत्रकारांची राजकीय-सामाजिक जाण प्रगल्भ करण्यासाठी केलेला प्रयत्न आहे. बदलत्या सामाजिक वास्तवात प्रसारमाध्यमांपुढे उभ्या राहिलेल्या आव्हानांबद्दल पत्रकारांना जागरूक करण्यासाठी ही शिबिरे आयोजित केली जातात. आतापर्यंत 'मराठी पत्रकारिता : काल आणि आज', 'दंगली आणि प्रसारमाध्यमे' इत्यादी विषयांवर अकादमीने पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भात पत्रकार प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन केले आहे.

सातारा आणि परिसरात चर्चासत्रे, युवा शिबिरे, कार्यशाळा यांचे आयोजनही आंबेडकर अकादमी सातत्याने करत आहे. धर्मनिरपेक्षता आणि लोकशाही या मूल्यांचा आग्रह धरत 'समान नागरी कायदा', 'मुस्लिम राजकारण', 'हिंदुत्वाचे राजकारण', 'जागतिकीकरण', 'नवे आर्थिक धोरण', 'भारतीय राज्यसंस्थेची जडणघडण', 'पर्यायी विकासनीती', 'फुले-आंबेडकरी चळवळ', 'गांधी आंबेडकरांच्या सामाजिक चळवळी', 'धर्मसंकल्पनेचा विकास' यासारख्या अनेक विषयांची सखोल चिकित्सा या चर्चासत्रांत आणि शिबिरांत झाली आहे. सामान्य नागरिकांसाठी आयोजित केलेल्या या विचारमंथनाच्या कार्यक्रमामुळे चर्चासत्रे हा निव्वळ विद्यापीठीय उपक्रम मानला जाण्याचा प्रघात अकादमीने मोडला आणि वैचारिक चर्चा हा उन्नत व प्रगल्भ नागरी जीवनाचा अविभाज्य घटक म्हणून प्रचलित करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर अभ्यासकांची परिदृष्टी आणि कार्यकर्त्यांचे अनुभव यांची सांगड घालण्यासाठी आवश्यक असा अवकाशही उपलब्ध करून दिला.




व्यक्तीच्या जाणिवांना आकार देण्यात 'ललित' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाङ्मयाचा मोलाचा वाटा असतो याचे भान ठेवून आंबेडकर अकादमीने नियमितपणे साहित्यचर्चांचे आयोजनही केले आहे. रंगनाथ पाठारे, गौरी देशपांडे, अरूण साधु, शाम मनोहर यांच्या साहित्यावर, मराठीतील कथा, कादंबरी, कविता, नाटक या साहित्यप्रकारांच्या बदलत्या स्वरूपावर, मराठी साहित्यातील विविध वाङ्मयीन चळवळींवर, आधुनिकता, उत्तराधुनिकता आणि गांधीवाद, स्त्रीवाद यांसारख्या विचारप्रणालींच्या मराठी साहित्यावरील परिणामावर आंबेडकर अकादमीने परिसंवाद आयोजित केले आहेत. विजय तेंडुलकर, शांता शेळके, आशा बगे या मान्यवर साहित्यिकांच्या दीर्घ मुलाखती अकादमीतर्फे घेतल्या गेल्या आहेत. तसेच नवोदित लेखकांसाठी कार्यशाळेचा उपक्रमही अकादमीने राबवला आहे.

विचारवेध आणि चर्चासत्रांतील निबंध, साहित्यचर्चा, कार्यशाळा आणि शिबिरातील चर्चा आंबेडकर अकादमीने पुस्तक रूपाने प्रकाशित केल्या आहेत. शिवाय वेळोवेळी सामाजिक-राजकीय विषयांवरील पुस्तिका, निबंधसंग्रह, ग्रंथ यांचे प्रकाशन करून अकादमीने मराठीतील वैचारिक वाङ्मय समृद्ध करण्याला हातभार लावला आहे. डॉ. भा. ल. भोळे लिखित 'जाती आणि राजकारण' व 'भारतीय धर्मनिरपेक्षतेला जमातवादाचे आव्हान', डॉ. सुहास पळशीकरलिखित 'डॉ. आंबेडकरांचे हिंदूकरण' व 'शिवसेना : निमफॅसिस्ट मोहिनी', डॉ. यशवंत सुमंतलिखित 'आरक्षण : लक्ष्मणरेषा की रामबाण' व 'विवेकानंद : साधक की प्रचारक', श्री. राजीव सानेलिखित 'हरवलेला सर्वहारा आणि नव्या आशयाचे आव्हान' या पुस्तिका, डॉ. भा. ल. भोळेलिखित 'विसाव्या शतकातील समताविचार', प्रकाश बाळ व किशोर बेडकीहाळ संपादित 'बदलता महाराष्ट्र', विचारवेधमधील भाषणांचा संग्रह, विचारवेधमधील निबंधांचा 'शतकांतराच्या वळणावर' हा संग्रह यासारखी पुस्तके ही आंबेडकर अकादमीची काही महत्त्वाची प्रकाशने आहेत. अकादमीतर्फे घेतलेल्या संशोधनपर पाहाण्यांपैकी 'सातारा जिल्ह्यातील परित्यक्तांची पाहणी' व 'कमावत्या स्त्रियांची बदलती मानसिकता' या दोन पाहाण्यांचे अहवालही अकादमीने प्रकाशित केले आहेत. सामाजिक शास्त्रांच्या मराठी भाषक विद्यार्थ्यांना जाणवणारी मराठी वाचन साहित्याची उणीव काही प्रमाणात भरून काढण्यात ही प्रकाशने यशस्वी ठरली आहेत.

बुद्धिनिष्ठ पद्धतीने धर्मचिकित्सा करणाऱ्या व जमातवादाविरुद्ध सातत्याने लढा देणाऱ्या व्यक्तींना रा. भि. जोशी पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा उपक्रम अकादमीने १९९५ ते २००० या पाच वर्षात राबवला. दिवंगत ज्येष्ठ साहित्यिक रा. भि. जोशी यांच्या कन्या श्रीमती नीलिमा भावे यांनी दिलेल्या निधीतून हा पुरस्कार दिला जात असे. डॉ. सदानंद




मोरे, डॉ. रावसाहेब कसबे, श्रीमती तीस्ता सेटलवाड, श्री. असगर अली इंजिनियर व डॉ. अलीम वकील यांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

समाज प्रबोधनातून व्यवस्थेच्या परिवर्तनासाठी प्रबुद्ध कार्यकर्ता घडविण्याच्या आंबेडकर अकादमीच्या कार्यात सातत्य राखण्याचे आणि कार्यक्रमांना मूर्तरूप देण्याचे श्रेय अकादमीचे कार्याध्यक्ष श्री. किशोर बेडकीहाळ व साताऱ्यातील त्यांचे सहकारी श्री. प्रमोद कोपर्डे, प्रा. एम्. ए. शेख, श्री. दिनकर झिंब्रे, श्री. अशोक काळे, प्रा. अण्णासाहेब होवाळे, श्रीमती सुनीता सरदेशमुख यांना आहे. विचार प्रबोधनचे उपक्रम सातत्याने राबविण्यासाठी आवश्यक असलेली विचारांवरील श्रद्धा, वैचारिक भूमिकेत कोणतीही तडजोड न करता लोकसंग्रह करण्याचे व तो टिकवण्याचे कसब आणि चिकाटी या टीमकडे मुबलक प्रमाणात आहे आणि परिवर्तनावरील त्यांच्या निष्ठेएवढीच तीही वादातीत आहे. अकादमीचे विद्यमान अध्यक्ष प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे अनुभवसंपन्न, पुरोगामी नेतृत्व व मार्गदर्शन या टीमची उमेद वाढवणारा सर्वात मोठा घटक आहे.

गेल्या १४ वर्षांत आयोजित केलेल्या विचारमंथनाच्या विविध कार्यक्रमांतून 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकदामी' परिवर्तनवादी 'विचार' हा व्यवस्थेच्या परिवर्तनाच्या प्रक्रियेतील एक महत्त्वाची कृतीच असते ही जाण निर्माण करण्यात मोठ्या प्रमाणात यशस्वी झाली आहे असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. आंबेडकर अकादमीच्या यापुढील वाटचालीसाठी आपल्या सर्वांतर्फे सदिच्छा!

❑

पुण्याचे शहरीकरण ही तशी अलीकडचीच गोष्ट. ६१च्या पानशेतच्या पुरानंतर पुणे जरा विस्तारायला लागले. पुण्याच्या सीमाभागांवर औद्योगिक कारखाने निर्माण व्हायला लागले, तशा रोजगाराच्या संधीही उपलब्ध झाल्या. नोकरी करणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढू लागली. कारखान्यांप्रमाणेच पोस्ट, बँक, एलआयसीसारख्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर स्त्रिया कामे करू लागल्या. नवरा-बायको दोघांच्या कमावतेपणामुळे मध्यमवर्गाचा विस्तार झाला. वाडा संस्कृतीकडून फ्लॅट संस्कृतीकडे झपाट्याने वाटचाल झाली. विभक्त कुटुंब पद्धती निर्माण झाली - स्थिरावली.

पण नोकरी करून बाई कमवायला लागली म्हणून तिची घरातली जबाबदारी मात्र अजिबात कमी झाली नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेत घरकामात पुरुषांचा अजिबात सहभाग नसल्यामुळे घर-कुटुंब, मुलांचे संगोपन, वृद्धांची देखभाल या प्रामुख्याने तिच्याच जबाबदाऱ्या मानल्या गेल्या. घरकामाला बाई ठेवणे हे तिच्या दृष्टीने कमीपणाचे मानले गेले. आपल्या घरातले काम आपण करत नाही याचा एक अपराधीपणा तिच्या मनात निर्माण झाला. किंवा हेतुपुरस्सर तसा निर्माण केला गेला. पण काही काळानंतर अशी परिस्थिती निर्माण झाली की धुण्याभांड्याला बाई असणे हे सुखवस्तुपणाचे लक्षण मानले जाऊ लागले आणि कामाच्या बाईला मान्यता मिळाली.

अंजली मुळे

# 'मोला'करता मोलाचा संघर्ष
# पुणे शहर मोलकरीण संघटना


पुणे शहर मोलकरीण संघटना
असंघटीत क्षेत्रातील कामगारांना न्याय मिळवण्यासाठी संघर्ष
करा. देशातील ४० कोटी कामगार कष्टकऱ्यांपैकी
३७॥ कोटी असंघटीत क्षेत्रात
अ. कामाची शाश्वती, सुरक्षितता आणि न्याय
ब. आरोग्याची हमी मिळालीच पाहिजे.
क. पेन्शन मिळाले पाहिजे.
एकजूट उभारा

मेधा शते

दुसऱ्या बाजूला पुण्याच्याच आजूबाजूच्या भागात दुष्काळ, धरणे आणि इतर प्रकल्पांमुळे झालेले विस्थापन आणि रोजगाराच्या आशेने जगण्यासाठी माणसांचे ग्रामीण भागाकडून शहरी भागाकडे स्थलांतर व्हायला लागले. पुरुषांनी काही बारीकसारीक व्यवसाय सुरु केले किंवा लहान-मोठी नोकरी पत्करली. बायका अशिक्षित आणि शेतीकामाशिवाय कुठलेच विशेष कौशल्य नसलेल्या, त्यामुळे त्यांनी धुण्याभांड्यांची कामे मोलाने करायला सुरुवात केली. एकट्या, विधवा, परित्यक्ता यांना तर तेवढाच एक आधार होता.

नोकरी करणाऱ्या स्त्रिया तसेच घरकामाच्या तोच तोच पणाला कंटाळलेल्या गृहिणी आणि मोलकरणी यांना एकमेकींच्या गरजा भागवण्याची संधी प्राप्त झाली. मोलकरणींनी मालकिणींच्या गरजा भागवल्या खऱ्या, पण उलटे मात्र झाले नाही. हा साधारण ७०-७५ चा काळ.

या मोलकरणींची परिस्थिती त्यावेळी खूप वाईट होती. मूर्तिमंत दारिद्र्य म्हणजे काय हे त्यांच्याकडे नुसते बघूनच समजायचे. दंड घातलेली जोडाची-ठिगळं लावलेली लुगडी, फाटके कपडे. त्यांच्या अपार कष्टाला-श्रमाला कुठलीही प्रतिष्ठा नव्हती. जितके जास्त श्रम तितका हीन दर्जा अशी आपली संस्कृती! अतिशय अपमानास्पद वागणूक त्यांना मिळत असे. त्यांचे कष्ट, त्यांचा वेळ आणि त्यांचे वेतन यात कुठलाच ताळमेळ नव्हता.

त्यावेळी जातीपातीचेही खूप प्रस्थ होते. सवर्णांच्या बायकांना मोलाने काम करायची वेळ आली तर त्या चोरून लपून करायच्या. ब्राह्मण बायका फक्त स्वयंपाकाची काम करायच्या. अस्पृश्यताही पाळली जायची. मोलकरणींना स्वयंपाकघरात प्रवेश निषिद्ध. तिने घासलेली भांडी पाणी टाकून मगच वापरली जायची. मोलकरणींकडे माणूस म्हणून बघितलेच जायचे नाही.

या पार्श्वभूमीवर मालकीण-मोलकरीण या दोन्ही स्त्रियांच्याच संबंधांचा विचार करताना त्यातली गुंतागुंत लक्षात घ्यावी लागते.

बऱ्याच वेळा मालकीण ही बाहेर नोकरी करणारी एक कामगारच असते आणि कामगार म्हणून स्वत:चे हक्क संप करून पदरात पाडून घेण्याचे भान तिला असते, पण घरातल्या मोलकरणीला मात्र ती कामगार मानायला तयार नसते. त्यामुळे बायकांचे घरकामाचे श्रम अदृश्यच राहतात. कुटुंबातील स्त्रिया जेव्हा मोलकरणींकडून काम करुन घेतात तेव्हाच या कामाचे 'मोल' त्यांना समजते. पण आता त्या मालकिणीच्या भूमिकेत आल्यावर भांडवलदार वर्गाप्रमाणेच मोलकरणींच्या श्रमांकडे दुर्लक्ष करतात. परिणामत: स्त्रियांच्या घरकामाचे मोल वाढण्याची एक शक्यता नाहीशी होते आणि घरकामाचे श्रम अदृश्यच राहतात. या अदृश्य श्रमांना दृश्यरुप देण्याचे खूप महत्त्वाचे काम केले ते पुणे शहर मोलकरीण संघटनेने.






**संघटनेची स्थापना :** संघटनेची स्थापना मोठ्या नाट्यपूर्ण रितीने झाली. या संघटनेत अगदी पहिल्या संपापासून ते आजपर्यंत धडाडीने काम करणाऱ्या पद्माताई सुतार या संघटनेचा चालता बोलता इतिहास आहेत. त्या सांगतात, "खिलारेवाडीत राहणाऱ्या कंधारेबाई कर्वेरोडवरच्या एका सोसायटीत मोलकणीचं काम करायच्या. त्या आजारी पडल्यामुळे चार दिवस कामाला गेल्या नाहीत. पाचव्या दिवशी गेल्या तर त्यांना मालकिणीने कामावरून काढून टाकलं होतं. मालकिणीला त्यांनी काही सांगायचा प्रयत्न केला तर तिने त्यांचं काहीही ऐकून घेतलं नाही. सोसायटीतल्या बाकीच्या कामवाल्यांना त्यांनी आवाज दिला, आणि आपण संप करु असं सांगितलं. 'आज त्यांना काढलं, उद्या आपल्याला काढतील' अशा विचाराने सगळ्या गोळा झाल्या. रस्त्यारस्त्यातून फिरून बाकीच्यांना गोळा करायला लागल्या. सगळीकडे संपाची बातमी वाऱ्यासारखी पसरली. मला कळल्यावर मी पण आमच्या सोसायटीतल्या ११ कामवाल्यांना घेऊन निघाले. सगळ्याजणी कर्वेरोडवरच्या एका पेट्रोलपंपाजवळ गोळा झाल्या होत्या. ३००-४०० बायका जमल्या होत्या. संप तर केला; पण पुढे काय करायचं कुणालाच माहीत नव्हतं. त्याच वेळी तिकडून विमा कामगार नेते कॉ. भालचंद्र केरकर आणि नगरसेवक खिलारे गाडीतून चालले होते. बायकांचा घोळका बघून त्यांनी गाडी थांबवून चौकशी केली. काय झालं म्हणून विचारलं तर बायकांनी एकदम त्यांना तक्रारी सांगायला सुरुवात केली. मग खिलारेंनी सगळ्यांना रात्री ९ वाजता त्यांच्या घराच्या गच्चीवर बोलावलं. बायकांनी ७ वाजल्यापासूनच तिथे जमायला सुरुवात केली. मग रात्री तिथे मिटिंग झाली. केरकर, लीलाताई भोसले यांनी आम्हाला मार्गदर्शन केलं. नंतर लीलाताईंच्या पुढाकाराने ताराबाई सोनावणे, वसुधा सरदार, अमरजा पवार, लता भिसे यांनी मोलकरणींच्या सभा घ्यायला सुरुवात केली. त्यातूनच मग पुणे शहर मोलकरीण संघटनेची स्थापना झाली. ही फेब्रुवारी १९८० ची गोष्ट."

## संप हेच संघटनेचे हत्यार

कुणी नेता नाही, संघटना नाही, कुणाचे मार्गदर्शन नाही, तरी ८० साली एवढा मोठा संप कसा काय झाला, याचे विश्लेषण करताना कॉ. मुक्ता मनोहर म्हणतात, "औद्योगीकरण, शहरीकरण, वाढत्या झोपडपट्ट्या, बेरोजगारी यामुळे शहराचं स्वरूप बदलत होतं. वाढती कारखानदारी-कामगारांच्या समस्या-त्यांच्या मागण्या यासाठी संप-मोर्चे होत होते. त्यातून काही मागण्या मान्य होत होत्या. त्यांच्या घरच्या बायका हे सर्व अनुभवत होत्या. त्याचे चटके सोसत होत्या. त्या ज्या घरी काम करायच्या तिथली परिस्थिती बघून त्यांच्याही आकांक्षा वाढत होत्या. मुलांना शिकवण्याची स्वप्नं त्या बघत होत्या. आणि स्वतःच्या तुटपुंज्या पगाराने अस्वस्थही होत होत्या. ही अस्वस्थता सामुदायिक होती. आणि ही अस्वस्थता हीच त्यांची ऊर्जा होती. १९७५च्या महिला वर्षात पुण्यात कष्टकरी महिलांची एक परिषद झाली होती. महिलांच्या हक्कांबाबत सातत्यानं बोललं जात होतं. कार्यक्रम-चर्चा सभा होत होत्या. समाजात एक घुसळण होत होती. या सगळ्याचा एकत्रित परिणाम म्हणजे ८०चा उत्स्फूर्तपणे झालेला संप."

संघटना स्थापन झाल्यानंतर खऱ्या अर्थाने मालकीण-मोलकरीण संबंध, मोलकरणींचे कामगार म्हणून स्थान, त्यांचे हक्क या सगळ्याच्या विचाराला सुरुवात झाली.

पुण्यातल्या प्रमुख वृत्तपत्रांनी या संपाला चांगलीच प्रसिद्धी दिली आणि डॉ. कुमुद पोरे, डॉ. सत्यरंजन साठे, डॉ. बाबा आढाव, मालिनीबाई तुळपुळे, प्रा. सुलोचना नाडकर्णी यासारख्या पुण्यातल्या प्रतिष्ठित नागरिकांनी संपाला पाठिंबा देऊन काही शिफारशीही केल्या.

संघटनेने सुरुवातीला तरी मोलकरणींच्या तातडीच्या मागण्या मान्य करुन घेण्यावर भर दिला, कारण मोलकरणी संपावर होत्या आणि त्यासंदर्भात फार अभ्यास किंवा सैद्धान्तिक विचार करायला पुरेसा वेळ नव्हता. त्यामुळे मागण्यांचे स्वरूप ढोबळ मानानेच ठरवण्यात आले, ते असे—पगारवाढ, महिन्यातून दोन पगारी सुट्ट्या, आजारपणाच्या रजेबद्दल पगार कापला जाऊ नये, दिवाळीला एक महिन्याच्या पगाराएवढी रक्कम किंवा तेवढ्याच रकमेची भेटवस्तू, घरामध्ये मोलकरणींना अपमानास्पद वागवू नये.

मालकिणींना अर्थातच हे काहीच मान्य नव्हतं. 'माजल्यात फार', 'बघून घेऊ' अशा त्यांच्या प्रतिक्रिया होत्या. पण रागाच्या भरात 'आमचं काम आम्ही करून घेऊ' हे म्हणणं सोपे असले तरी तसे करणे फार अवघड होते हे लौकरच त्यांच्या लक्षात यायला लागले आणि संघटनेने केलेल्या बऱ्याच मागण्या मान्य झाल्या.




मग संपाचे लोण इतर वस्त्यांमधूनही पसरायला लागले. पुणे शहरातल्या २०-२५ वस्त्यांमधून संघटनेचे काम चालू झाले. संप-मोर्चे, सोसायट्यांच्या दारात सभा, पिकेटिंग, पोस्टर्स, घोषणा असे वातावरण दणाणून जायला लागले. संघटनेची सभासद संख्या ५००० पेक्षाही जास्त झाली. संपातूनच संघटना निर्माण झाली, वाढली आणि संप हेच संघटनेचे महत्त्वाचे हत्यार राहिले.

## मोलकामाचा अभ्यास

एका बाजूला संप-मोर्चे चालू असताना दुसरीकडे कार्यकर्त्यांनी मोलकरणींचा अभ्यास करायला सुरुवात केली. मोलकरणींची परिस्थिती, त्यांचे उत्पन्न, कामाचे तास, मिळणारे वेतन, नवऱ्याच्या कामाचे स्वरूप, वय, शिक्षण, कामाची वर्षे अशा स्वरूपाच्या अनेक पाहण्या संघटनेने केल्या.

या पाहण्यांमधून, घरच्या आर्थिक दुरवस्थेमुळेच मोलकरणी घरकाम पत्करतात ही गोष्ट अधोरेखित झाली.

पाहण्यांचे इतर निष्कर्ष असे होते-ही मंडळी कुटुंबनियोजन करत नाहीत या आरोपात तथ्य नाही. नव्या पिढीतल्या मोलकरणी थोड्याफार शिकलेल्या आहेत. आपल्या नशिबी जे काम आले आहे ते मुलांच्या नशिबी येऊ नये म्हणून मुलांना शिकवण्याची धडपड त्या करीत आहेत.

८०च्या संपानंतर असे वातावरण निर्माण झाले की नंतर ८१,८४,९१ साली मोलकरणींचे मोठे मोठे संप झाले. संप झाल्याशिवाय कधीही त्यांच्या मागण्या मान्य झाल्या नाहीत. मोलकरणींच्या अडीअडचणीच्या वेळी मालकिणी मेहेरबानी म्हणून मदत करीत. पण मोलकरणींचा हक्क म्हणून त्यांना काही देणे त्यांना मान्य नव्हते.

संघटनेचा मालकिणींशी संपर्क मोलकरणींमार्फतच होता. मालकिणींशी बोलणी मोलकरणीच करायच्या. पत्रके-फॉर्म, दरपत्र वगैरे मोलकरणींमार्फतच मालकिणीपर्यंत पोचायची. संघटनेने स्वतःहून कधी संप घडवून आणले नाहीत. पण उत्स्फूर्तपणे झालेल्या संपांना मार्गदर्शन करण्याचे काम आवर्जून केले. कॉ. लीलाताई भोसले, कॉ. भालचंद्र केरकर, कॉ. मेधा थत्ते, कॉ. मुक्ता मनोहर यांच्यासारख्या कामगार चळवळ आणि स्त्रीमुक्ती चळवळीचे नेतृत्व करणाऱ्या कार्यकर्त्यांचा सहभाग आणि सहकार्य मोलकरीण संघटनेला लाभले असले तरी स्वतः मोलकरीण म्हणून काम करणाऱ्या आणि चळवळीतूनच घडलेल्या कार्यकर्त्यांच्या गटाकडूनच संघटना मुख्यतः चालवली जाते हे तिचे वैशिष्ट्य आहे.

संपांमुळे मोलकरणींमध्ये जागृती झाली, कार्यकर्त्या निर्माण झाल्या तसेच मालकिणींनाही एक नवा दृष्टिकोन या संपांनी दिला. ८४ च्या संपकाळात काही गृहिणींनी आपणहून फोन




करुन, भेटून, तर काहींनी प्रत्यक्ष सभेत भाषण करून मोलकरणींच्या मागण्या मान्य केल्या व संपाला पाठिंबा जाहीर केला. त्यांची संख्या जरी थोडी होती तरी विचाराला सुरुवात झाली होती हे महत्त्वाचे होते. संघटनेने नंतर या स्त्रियांचा सत्कार केला.

## कामाचा विस्तारणारा परिघ

या कामाच्याबरोबरच मोलकर्णींवरच्या इतर अन्याय-अत्याचारांच्या तक्रारींची दखलही संघटना घेऊ लागली. सासरचा छळ, व्यसनी नवरा, गुंडांचा त्रास, लैंगिक फसवणूक, घटस्फोट, पोटगी, याबरोबरच वस्तीतली स्वच्छता, पाणी, शाळा, आरोग्य या प्रश्नांच्या संदर्भात संघटनेची मदत मोलाची ठरू लागली. संघटनेची ही कामे चालू असताना मोलकरणींमधून कार्यकर्त्या तयार होण्याची प्रक्रिया चालू होतीच. या श्रमिक कार्यकर्त्यांची संख्या वाढली तेव्हा मोलकरीण संघटनेच्या कामाबरोबरच त्यांनी स्त्री-मुक्ती चळवळीतही सक्रिय सहभाग घ्यायला सुरुवात केली. हा सहभाग नंतर एवढा वाढला की पुढे १९७८ मध्ये स्थापन झालेल्या 'स्त्री मुक्ती मंच' या संघटनेच्या या कार्यकर्त्या मोलकरणी प्रमुख आधारस्तंभ ठरल्या. या श्रमिक महिलांच्या प्रमुख सहभागामुळेच नंतर 'स्त्री मुक्ती मंच' हे नाव बदलून संघटनेला 'श्रमिक महिला मोर्चा' हे नाव देण्यात आले. आता व्यापक स्वरूपात महिलांचे प्रश्न सोडवण्याचे काम 'श्रमिक महिला मोर्चा' तर्फे होऊ लागले.

निरनिराळ्या वस्त्यांमधून 'मोर्चा' ची केन्द्रे स्थापन झाली. त्या त्या वस्तीतील मोलकरणींपैकी अनेकजणी 'श्रमिक महिला मोर्चा'च्या कामात भाग घ्यायला लागल्या. मोलकरीण संघटना आणि महिला मोर्चा या दोन्ही संघटना एकमेकांना पूरक असे काम करायला लागल्या.

## मोलकरीणींची सजग कार्यकर्ती

संघटनेने बायांमध्ये नवा आत्मविश्वास जागवला. त्यांचे माणूसपण इतरांच्या लक्षात जाणून दिले. त्यामुळे बायांना मिळणाऱ्या वागणुकीत बराच फरक पडला. त्यांचा पगार तर वाढलाच पण त्यांनी तो उपकार म्हणून न घेता केलेल्या कष्टाचा मोबदला म्हणून हक्काने स्वीकारला. बोनस, सुट्टी, हक्काची रजा, जादा कामाचे पैसे इत्यादी मागण्याही बऱ्यापैकी मान्य झाल्या. बाया बोलक्या झाल्या. एकमेकींची सुखदु:खे जाणून घ्यायला लागल्या. सभेत धीटपणे आपले विचार मांडू लागल्या. एकत्र येण्याची ताकद त्यांना कळायला लागली. ही संघटनेची ताकद त्यांच्या वागण्या-बोलण्या-दिसण्यात जाणवायला लागली. त्यांच्या चेहेऱ्यावरचे अगतिकतेचे भाव नष्ट झाले. थोडक्यात बाया 'स्मार्ट' झाल्या. स्वच्छ नीटनेटकी राहणी, मुलांचे शिक्षण, कुटुंबनियोजनाचे फायदे, आरोग्याची काळजी, बचत करणे, त्यासाठी पोस्ट-बँक यांचा उपयोग करणे, ती वापरणे या गोष्टी त्यांना कळत गेल्या. ज्या घरामध्ये त्या काम करत होत्या, तिथे हे सगळे पाहतच होत्या. फक्त त्याचे महत्त्व कुणीतरी उलगडून सांगणे जरुरीचे होते. ते काम संघटनेने केले.

## हे व्हायला हवे

बेरोजगारीचे प्रमाण आणि महागाई दिवसेंदिवस प्रचंड वाढतेच आहे. मोलकरणींना काही महागाई भत्ता वगैरे मिळत नसल्यामुळे पगारवाढीसाठी संपाला पर्याय नाही. त्यामुळे मोलकरीण संघटनेचे संप सातत्याने चालू असतात. मोलकरणींसाठी किमान वेतनाचा कायदा, कामगार कायद्याचे संरक्षण, बोनस, बाळंतपणासाठी आणि इतर हक्कांच्या रजा या त्यांच्या सुरुवातीपासूनच्या मागण्या अजूनही मंजूर झाल्या नाहीत. संघटनेने अलीकडेच मागण्यांसाठी मंत्रालयावर मोर्चा काढला होता.

या मोर्चात महाराष्ट्रातल्या विविध जिल्ह्यातून हजारो बायका सामील झाल्या होत्या.

अदृश्य श्रमशक्तीला दृश्यरूप देण्याची अथक धडपड संघटना करते आहे. त्यात त्यांना यशही मिळाले आहे. पण मालकिणींच्या मानसिकतेत जोपर्यंत परिवर्तन घडून येत नाही, तोपर्यंत या धडपडीचे यश मर्यादितच राहते असे म्हणावे लागेल. ❑

प न्नालाल सुराणा म्हटले की डोळ्यांसमोर येते ते उंचेपुरे धिप्पाड व्यक्तिमत्व. सतत पायाला भिंगरी लावून देशभर संचार करणारे. सातत्याने कार्यकर्त्यांसाठी पत्रे, वर्तमानपत्रांसाठी लेख किंवा चळवळीसाठी पुस्तिका लिहिणारे. कोणत्याही शिबिरात साध्या सोप्या विषयांची मांडणी करणारे. स्वत: साधेपणा आणि काटकसरी वृत्ती आचरणारे व इतरांना त्यासाठी प्रोत्साहित करणारे. वेळेचे नियोजन काटेकोरपणे करणारे आणि इतरांनीही वेळा पाळाव्यात आणि प्रत्येक मिनिट कामांसाठी कारणी लावावा असा आग्रह धरणारे. असे हे पन्नालाल सुराणा उर्फ भाऊ वयाची पंचाहत्तरी ओलांडूनही अजूनसुद्धा केरळपासून उत्तरांचलपर्यंत आणि पूर्वेकडे बिहारमधल्या पूर्णियापर्यंत भ्रमंती करतात तेव्हा अनेक तरुण कार्यकर्ते आपोआपच आपला आळस झटकून कामाला लागतात.

पन्नालाल सुराणा मूळचे बार्शीचे. बार्शीच्या राष्ट्र सेवा दल शाखेत त्यांनी बालवयातच राष्ट्रभक्तीचे, समतेचे आणि सार्वजनिकतेचे संस्कार घेतले. बालवयात राष्ट्रसेवा दलाशी नाते जुळल्यावर पुढे दहा वर्षे ते राष्ट्रसेवा दलाचे अध्यक्ष राहिले. आजही त्यांचा अणुरेणू सेवा दलाशी घट्टपणे जोडला गेला आहे.

**सुभाष वारे**

## शांत, प्रज्ञाशील व्यक्तित्व

# पन्नालाल सुराणा

पन्नालाल सुराणा यांनी समाजवादी चळवळीत अनेक जबाबदाऱ्या पार पाडल्या. समाजवादी पक्ष, संयुक्त समाजवादी पक्ष, जनता पक्ष, जनता दल आणि आता समाजवादी जन परिषद अशा अनेक राजकीय पक्षांची महत्त्वाची पदे भूषविली, आंदोलनांचे नेतृत्व केले, अभियानांची आखणी करून पार पाडले आणि अर्थातच कार्यकर्त्यांचा वैचारिक विकास व्हावा म्हणून अखंड प्रयत्न केले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, महागाई विरोधी आंदोलन, जमीन बळकावो आंदोलन, आणीबाणीविरोधी लढा अशा अनेक आंदोलनात ते अग्रभागी राहिले, तुरुंगातही गेले. आणीबाणीविरोधी लढ्यातील सहभागाबद्दल तर त्यांनी अठरा महिने कारावास भोगला आहे. हिंदु-मुस्लिम ऐक्यासाठी ते सातत्याने कार्यरत राहिले. त्याच कामासाठी राष्ट्र सेवा दलाच्या वतीने त्यांच्या नेतृत्वाखाली आयोजिलेली अयोध्या सद्भावना पदयात्रा याचा खास उल्लेख करावा लागेल.

देशभरातून पन्नालालजींना कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिरात विषयमांडणीसाठी सतत निमंत्रणे असतात. कुठल्याही दूरच्या खेड्यात शिबीर असो, रेल्वेचे रिझर्व्हेशन झालेले असो-नसो, पन्नालालजी वेळेत शिबिरात हजर असतात. कोणताही विषय असो, कार्यकर्त्यांना समजेल अशा सोप्या भाषेत मांडतात. कार्यकर्त्यांशी आगामी कार्यक्रमांविषयी बोलतात आणि लगेचच पुढच्या गावाला पुढच्या कार्यक्रमास निघतात. कार्यकर्त्यांच्या वैचारिक विकासाची ही मालिका, व्याख्यानापुरती नसते. पन्नालालजी त्यासाठी सतत छोट्या पुस्तिका-पुस्तके लिहीत असतात. प्रकाशित करत असतात. त्यांनी आजवर असंख्य पुस्तिका-पुस्तके लिहिली आहेत. अर्थात ही सर्व चळवळीची पुस्तके पन्नालालजींची आजपर्यंतची ग्रंथसंपदा -

**पुस्तके**

आपला महाराष्ट्र-विविधांगी महाराष्ट्र
राजकीय पक्षासाठी आचारसंहिता (मराठी/इंग्रजी)
ग्रामीण औद्योगिकीकरण
मानवाचे अर्थकारण
लोकशाही समाजवाद
कारगिल आणि भारताची संरक्षण सिद्धता
म. गांधी आणि दलित समस्या
कथा वीणाची





पन्नालाल सुराणा



लोकशाहीचे धोके (अनुवाद)
पाकिस्तान (अनुवाद)

**पुस्तिका**

शेती आणि समाजवादी धोरण
चीनचे आक्रमण-राजकीय पार्श्वभूमी
रूपयाचे अवमूल्यन
महंगाईकी समस्या
भारतका भूमिमुक्ती आंदोलन
कच्छकी धरती देशकी धरती
धर्म आणि धर्मनिरपेक्षता
पाण्यापाण्या थांब थांब
भारतीय संविधानाची तोंडओळख
गांधीजींची ओळख
निवडणूक पद्धतीत सुधारणा
महाराष्ट्र सरकारचा पाटबंधारे विषयक कायदा
Indian Peasantry and Twenty Five Years of Planning
प्रजासत्ताकाला आव्हान (६ डिसेंबर १९९२)
गुजरातचे आरक्षण विरोधी आंदोलन

आजही पन्नालालजी राष्ट्र सेवा दल, सोशलिस्ट फ्रंट, समाजवादी जनपरिषद, साने गुरुजी कथामाला, समतादर्शन प्रतिष्ठान बार्शी, सामाजिक कृतज्ञता निधी, साधना साप्ताहिक, शेती व ग्रामीण विकास संशोधन मंडळ, आसू, पाणलोट विकास समिती घाटपिंपरी, वृक्ष पट्टा योजना दुधी अशा अनेक संस्थांचे पदाधिकारी/विश्वस्त आहेत. त्यासाठी सातत्याने विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या ते आजही पार पाडत असतात.

राष्ट्रसेवा दलाच्या नळदुर्ग येथील 'आपले घर' या अनाथ निराधार मुलांच्या बालग्रामसाठी मात्र त्यांच्या मनात आणि व्यग्र अशा वेळापत्रकात खास अशी जागा असते. म्हणूनच दिवाळीच्या काळात कुठेही कार्यक्रम नसतात. ही संधी घेऊन पन्नालालजी ते चार दिवस आवर्जून तिथल्या मुलामुलींसोबत, कार्यकर्ते, गृहमातांसोबत घालवितात. अर्थात देशभर फिरताना त्यांचा एक कान सतत 'आपलं घर'चे व्यवस्थापन ठीक चालले आहे ना याकडे असतोच.

पन्नालालजींच्या साध्या व काटकसरी राहणीबद्दल आणि काटेकोर नियोजन व वक्तशीरपणाबद्दल ज्याप्रमाणे बोलले जाते तसेच त्यांच्या व्यक्तिगत जीवनातील स्त्रीपुरुष समानता आणि त्या अनुषंगाने घरातील सर्व प्रकारची कामे सहजपणे करण्याबद्दल विशेषत्वाने बोलावे लागेल. अनेक कार्यकर्त्यांना घरात पत्नीला लहानसहान कामात मदत करताना मी बघितले आहे. परंतु पत्नीची वैयक्तिक कामे करतानाही अजिबात न संकोचणारे फक्त पन्नालालजीच. त्यांच्या पत्नी वीणाताई याही कार्यकर्त्याच. संसाराची सर्व प्रकारची जबाबदारी सांभाळतानाही त्यांनीसुद्धा सार्वजनिक जीवनात अनेक उपक्रम राबविले. त्यांचाही स्त्रीपुरूष समानतेच्या प्रत्येक व्यवहाराबद्दल कठोर आग्रह असायचा. याबाबतीत पन्नालालजी व वीणाताई दोघांच्या तारा छानच जुळल्या होत्या. अर्थातच पन्नालालजींच्या या देशव्यापी सार्वजनिक कार्यात वीणाताईंच्या सहकार्याचा आवर्जून उल्लेख करावा लागेल.

समाजवादी चळवळीचे वैशिष्ट्य निवडणुका जिंकण्यात कधीच नव्हते आणि नाही. परंतु समाजाचा गाडा योग्य दिशेने चालायचा असेल आणि दलित, आदिवासी, महिला, भटके, इतर मागास, छोटे शेतकरी, शेतमजूर, बेरोजगार असे जे समाजातील वंचित-शोषित घटक आहेत, त्यांना जर खरोखरच सुखाचे दोन घास मिळायचे असतील तर विषमताविरोधी लढ्याला पुढे नेणारे विषय सतत उठवले पाहिजेत. त्या बाजूने समाजात दबावगट निर्माण केला पाहिजे आणि हे करत असताना व्यक्तिगत आचरणात काही काटेकोर आचारसंहिता कठोरपणे पाळली पाहिजे असे मानून त्याप्रमाणे सतत कार्यरत राहणारे कार्यकर्ते हीच समाजवादी चळवळीची खरी ओळख आहे आणि ही ओळख निर्माण करण्यात पन्नालालजींसारखे आदर्श सर्वात आघाडीवर असतात. पन्नालालजींना उत्तम आरोग्य आणि दीर्घ आयुष्य लाभो ही सर्व राष्ट्र सेवा दल सैनिकांच्या वतीने सदिच्छा! ❑

**आ**जच्या आत्मकेन्द्री समाजरचनेत दुसऱ्यासाठी धडपडणारी माणसे दुर्मीळ होत चालली आहेत. जी काही करतात त्यांच्या हेतूंबद्दल, उद्दिष्टांबद्दल समाज साशंक असतो. रूपा कुळकर्णी यांच्याबाबत असे कधी कुणाला वाटले नाही. कारण उमेदीच्या वयात त्या रस्त्यावरची आंदोलने करीत होत्या. संस्कृत विषयाची विद्यापीठातली प्रपाठक-प्राध्यापक असलेली ही पांढरपेशी बाई साधारणपणे १९८० पासून 'यंग अँग्री वुमन' म्हणून नागपूरकरांना व पुढे महाराष्ट्राला ज्ञात झाली.

रूपाताईंचा ॲकेडेमिक आलेख चढता व भारावून टाकणारा आहे. गानसोपन (संगीतशास्त्र), अभिनवलोचन (साहित्यशास्त्र), बौद्धाचार्य अश्वघोषांची वज्रसूची, सद्धर्मपुण्डरकिसूत्र, विपरित आरक्षण व अन्य लेख अशी मोठी ग्रंथसंपदा, शिवाय चर्चासत्राच्या निमित्ताने थेट जर्मनीपर्यंत अवगाहन.

**प्राचार्य डॉ. श्रीकांत तिडके**

# निश्वासाचा डंका

## डॉ. रूपा कुळकर्णी



रूपा कुळकर्णी

संगीत, संस्कृत अध्ययन-अध्यापन यापेक्षा त्यांचा जीव चळवळीत अधिक रमतो. म्हणून तर अलीकडे त्यांनी चळवळीचा दस्तऐवज नोंदवला जावा म्हणून मोलकरीण, लढा दोन दशकांचा, विदर्भ मोलकरीण संघटना : २५ वर्षांची वाटचाल, राष्ट्रीय झोपडपट्टी धोरण, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संघटनविषयक संकल्पना अशा छोट्या-छोट्या पण माहितीपूर्ण प्रेरक पुस्तिका लिहून मोलाचे काम केले. त्यांच्या विद्वत्तेला सामाजिकनिष्ठेचा स्पर्श आहे. म्हणून महाराष्ट्र शासनाने Writings and Speeches of Dr. B. R. Ambedkar, Vol. 14 या ग्रंथाच्या मराठी भाषान्तराचे काम त्यांच्याकडे सोपवले आहे. डॉ. आंबेडकरांचा 'क्रांतीविचार' आणि गौतमबुद्धांचा 'समताविचार' हे सूत्र घेऊन त्यांनी धम्मदीक्षा सुवर्ण जयंती निमित्ताने विविध विशेषांक-नियतकालिकांतून लेखन केले आहे. इंदिरा गांधी मुक्त विश्वविद्यालयासाठी बौद्ध तत्त्वज्ञानी दिङ्नाग, नागार्जुन, वसुबंधु व असंग यांच्यावर त्या पाठलेखन करीत आहेत. त्यांचे विद्वत्व समाजाभिमुख होतेच, पण अलीकडे ते साधे, संवादी होत आहे. अलीकडचे त्यांचे लेखन हे जनतेशी, सामान्यांशी साधलेल्या मुक्तसंवाद स्वरूपात आहे. या परिवर्तनामागे त्यांच्या सक्रिय सामाजिक संघटनांची व उपक्रमांची पार्श्वभूमी आहे.

१९८०च्या दरम्यान त्यांनी 'विद्यार्थिनी क्रांती दल' स्थापन करून, शिकणाऱ्या तरुणींच्या मनात सत्त्व जागविण्याचे काम सुरू केले. लग्नाचा बाजार आणि त्यात होणारा स्त्रीत्वाचा अवमान याची जाणीव त्याच्या माध्यमातून तरुण-तरुणींच्या मनात जागी झाली. त्यातून 'हुंडाविरोधी आघाडी' स्थापन झाली. चळवळीतल्या बऱ्याच तरूण-तरूणींनी निरपेक्ष सहजीवनाचा वस्तुपाठ समाजासमोर ठेवला. त्यामागे रुपाताईंच्या प्रेरक चळवळीची प्रेरणा होती.

हातावर पोट असणाऱ्या कष्टकऱ्यांसाठी काही करावे असे या दरम्यान त्यांना वाटू लागले. १९९३ साली 'इन्स्टिट्यूट ऑफ विमेन अँड चाईल्ड डेव्हलपमेंट' असा 'पब्लिक ट्रस्ट' त्यांनी विलास भोंगाडे, सुजाता पाटील, डॉ. अरुणा पाटील आदींच्या साहाय्याने स्थापन केला. बालमजूर मुलींसाठी १९९४ साली 'ओसरी' नावाचा खुल्या शाळांचा प्रकल्प सुरू केला. कष्टकऱ्यांसाठी राबताना धर्माच्या जोखडाने स्त्री बांधली गेली आहे, हे त्यांना जाणवू लागले. १९९० ते १९९५ या काळात त्यांचा कामाचा प्रवास गतिशील आणि अधिक बंडखोरीचा होत गेल्याचे दिसते. १९९२ साली त्यांनी धम्मचक्रप्रवर्तन दिनाला बौद्धधम्माची दीक्षा घेतली.



पांढरपेशांचा घर-संसार सुरळीत चालावा म्हणून घरा-घरात स्वयंपाकिणी विशेषत: भांडी-धुणी करणाऱ्या स्त्रिया राबतात म्हणून 'मध्यमवर्गीय बाई' अर्थार्जन करू शकते. पण तुमच्या अर्थार्जनासाठी झटणाऱ्या मोलकरीणीच्या घराचे काय? असा प्रश्न घेऊन रूपाताई नागपूरात उभ्या राहिल्या. त्यांनी 'बाई' व नंतर 'घर कामगार बुलेटीन' ही चळवळीची मुखपत्रे सुरू करून फ्लॅट व बंगल्यांचे 'बंद दरवाजे' घोषणांनी ठोठावले. विदर्भ मोलकरीण संघटनेचे नागपुरातच ८००० सदस्य आहेत. आता विदर्भाच्या सर्व जिल्ह्यांमध्ये शाखा स्थापन होत आहेत. १९९९ पासून दरवर्षी नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात घरकामगारांचा प्रचंड मोर्चा तर कधी या प्रश्नासाठी धरणे, सत्याग्रह, उपोषण, रास्ता रोको असे करीत त्यांनी शासनाचे लक्ष वेधले. त्यामुळेच महाराष्ट्र शासनाने घर कामगार विधेयक तयार केले. या सक्रिय चळवळीला २५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त १३ फेब्रुवारी २००६ला भव्य मेळावा पार पडला. भारताचे कृषीमंत्री शरद पवार, बाबा आढाव इत्यादींच्या उपस्थितीत नागपूरच्या कामगारभवनात झालेल्या या मेळाव्यात कष्टकरी महिलांच्या संघटनशक्तीचे विशाल रूप नागपूरने पाहिले.

घरकामगारांसाठी व त्यांच्या पाल्यांसाठी त्यांनी संघटनेमार्फत जनश्री विमा व शिष्यवृत्ती योजना राबविली. लता मंगेशकर हॉस्पिटलमध्ये त्यांच्यासाठी नि:शुल्क स्वास्थ्यसेवा मिळवून दिली. महात्मा गांधी इन्स्टिट्यूटने रूपाताईंच्या प्रयत्नामुळे कॉम्प्युटर प्रशिक्षण घरकामगार महिलांपर्यंत पोहोचविले. विल्क संघटना, आय.एम.ए.,रोटरी क्लब यांना त्यांनी घरकामगार महिलांच्या स्वास्थ्यविषयक साहाय्यासाठी प्रेरित केले.

मोलकरीणी व त्यांचे प्रश्न हे त्यांच्या कामाचे केन्द्र झाले आहे. ३९ वर्षे संस्कृतचे अध्ययन-अध्यापन करतानाही स्वत:च्या उपक्रमांबरोबर त्या नामान्तर आंदोलन, मंडल आयोग, रिडल्स समर्थन या समकालीन चळवळींशी संबद्ध राहिल्या. गोसीखुर्द प्रकल्पग्रस्तांच्या आंदोलनासाठी त्या सक्रिय झाल्या. या शिवाय महाराष्ट्र विधी प्राधिकरण मुंबई, साहित्य संस्कृती मंडळ, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई इथपासून ते हमाल पंचायत, पुणे, समर्थन, मुंबई, अंगमेहनती कष्टकरी संघर्ष समिती, राष्ट्रीय संबुद्ध महिला संघटन, दीक्षाभूमी धम्म महिला परिषद, नागपूर अशा संस्थांच्या कामात त्या सक्रिय आहेत.

उच्चमध्यमवर्ग जाणिवेतून मुक्त झालेल्या रूपाताईंनी स्त्रियांचे, त्यातही कष्टकरी स्त्रियांचे नि:श्वास सहृदयतेने ऐकले. त्या आवाजांचा आत्मस्तर त्यांनी नेणिवेतून स्वीकारला. आणि त्यांच्या जीवनाचा कृतार्थ 'पंचम' लागला. त्यांनी 'आंदोलनाचा डंका' रस्त्यावर, विधानसभेसमोर वाजवला. त्यांच्या कामाची दखल महाराष्ट्र शासनाने १९९२ साली दलित पुरस्कार देऊन घेतली. नागपूरचा बौद्धमित्र पुरस्कार, मुंबईचा कुसुमताई चौधरी महिला कल्याणी पुरस्कार, नाशिकचा सावित्रीबाई फुले पुरस्कार, बहुजन सांस्कृतिक संघ, भंडारदऱ्याचा समताभूषण पुरस्कार, कोल्हापूरचा आबाजी गवळी, चंद्रपूरचा लोकसेवा प्रतिष्ठान, इंडियन मर्चंट चेंबरचा प्लॅटिनम ज्युबिली पुरस्कार, फुले-शाहू-आंबेडकर हा महात्मा गांधी ट्रस्ट नागपूरचा पुरस्कार अशी पुरस्कारांची खैरात त्यांच्या कामामुळे त्यांच्यावर झाली. त्यांच्या अविरत सामाजिक संघर्षातही त्यांनी ज्ञाननिष्ठा कोमेजू दिली नाही, म्हणून तर महाराष्ट्र शासनाने २००६ला कालिदास संस्कृत साधना पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

घरात, घराबाहेर, समाज, धर्माच्या परिघात 'बाई' असहाय्य का? तिचा गुदमरलेला नि:श्वास आपण कान देऊन जसा ऐकला तसा तो सर्वांना ऐकविण्यासाठी समाजव्यवस्था, धर्मव्यवस्था या सर्वांशी रूपाताईंनी बंडखोरी केली. या बंडखोरीची कहाणी रूपाताईंच्या प्रत्येक कामातून आपल्याशी बोलते. ❑

# नवनिर्माण आणि संघर्ष यांची सांगड महत्त्वाची

# डॉ. अनंत फडके

डॉ. अनंत फडके गेल्या तीस वर्षांहून अधिक काळ सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीत पूर्णपणे कार्यरत आहेत. लोकविज्ञान संघटना, मेडिको फ्रेंड सर्कल, सेहत, साथी, जनआरोग्य अभियान या व यासारख्या आरोग्यव्यवस्था निकोप व लोकाभिमुख व्हाव्या यासाठी झटणाऱ्या संस्था-संघटनांशी त्यांचे नाव अतूटपणे जोडले गेले आहे. तसे तर सामाजिक परिवर्तनाच्या प्रवाहात प्रत्येकच व्यक्तीचे योगदान महत्त्वाचे असते. परंतु या प्रवाहात सहभागी होतानाच जे आपली स्वत:ची वाट शोधतात, घडवतात, ते आपला वाटाही अधिक प्रभावीपणे उचलू शकतात. अनंत फडके यांचे काम याप्रकारचे - चळवळीतील विचार आणि कृती या दोन्ही पातळ्यांवर भर घालणारे असे राहिलेले आहे.

काहीसे मितभाषी, बरेचसे स्पष्टवक्ते आणि अत्यंत कार्यमग्न अशी अनंत फडके यांची प्रतिमा त्यांना सतत पाहाणाऱ्यांच्यात बिंबलेली आहे. प्रत्यक्षात जमिनीवर बदल घडवण्याचे काम ते धोरणात्मक बदलासाठीचे काम हा त्यांच्या कामाचा पल्ला स्तिमित

विद्या कुलकर्णी




करणारा आहे. गावपातळीवरील अल्पशिक्षित स्त्रीला आरोग्य साथी म्हणून प्रशिक्षण आणि साहाय्य देणे हे त्यांच्या कामाचे एक टोक म्हणता येईल. तर त्याचबरोबर जनआरोग्य अभियानाचे सहनिमंत्रक या नात्याने राज्य व देश पातळीवर पोषक धोरणनिर्मितीसाठी प्रयत्नशील राहणे, हे त्यांच्या कामाचे दुसरे टोक संबोधता येईल. या व्यापक पल्ल्यादरम्यान आरोग्य हक्कासाठी हाती घेतलेली इतर अनेकविध कामे, मोहिमा, प्रयोग आपसूकच येतात. या सोबतच विविध प्रसारमाध्यमांसाठी या सर्व कामांवर आधारित लेखन कोणताही खंड न पडता चालू असते.

## भूमिका

सोलापुरात स्थायिक असलेल्या आपल्या कुटुंबातून शिक्षणानिमित्ताने अनंत फडके पुण्याला आले. तिथल्या महाविद्यालयीन जीवनात वैचारिक वाचन, चर्चा यांची गोडी लागली होती. मार्क्सवादी विचारांकडे ओढा निर्माण झाला होता. या वैचारिकतेला आणखी खतपाणी घालणारा मित्रसमुदाय पुण्याच्या बीजे महाविद्यालयातून वैद्यकीय शिक्षण घेत असतानाच त्यांना मिळाला. त्यातूनच प्रफुल्ल बिडवई, दिनानाथ मनोहर, कुमार शिराळकर, प्रकाश सामंत, सुधीर बेडेकर आदी तरुणांसोबत मागोवा हा गट तयार झाला. फडके सांगतात, 'मागोवा गटात आम्ही १८ जण पूर्ण वेळ काम करत होतो. आमची वैचारिक भूमिका डाव्या नवमार्क्सवादाचा पुरस्कार करणारी होती. अत्यंत भारावलेलं वातावरण आणि कामाची झिंग यामुळे व्यावसायिक शिक्षण घेतले तरी ते काम न करता सामाजिक-राजकीय कामाला पूर्ण वेळ वाहून घ्यायचे आमच्यापैकी प्रत्येकाने ठरवले. त्यामुळे वैद्यकीय अधिकारी म्हणून दोन वर्षे नोकरी केली. ही नोकरी करत असतानाच पुढील कार्यक्षेत्राबद्दलचा विचार मनात पक्का झाला. वैद्यकीय व्यवसायात पडायचे नाही हा निर्णय शिक्षण चालू असतानाच घेतला.' वैद्यकीय पदवीनंतर किमान दोन वर्षे सरकारी नोकरी करण्याचे बंधन त्यावेळी विद्यार्थ्यांवर होते. त्यामुळे हा बाँड पूर्ण करण्यासाठी म्हणून पुण्यातील हाफकीन इन्स्टिट्यूटमध्ये वैद्यकीय अधिकारी म्हणून दोन वर्षे नोकरी केली. ही नोकरी करीत असतानाच पुढे काय करायचे हा विचार त्यांच्या मनात पक्का झाला. वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग केवळ चरितार्थासाठी न करता समाजातील आरोग्य व्यवस्थेचा ढाचा बदलण्यासाठी करायचा हा निर्णय त्यांनी घेतला. त्यासाठी विज्ञान व आरोग्याच्या क्षेत्रातच काम करायचे डॉ. फडके यांनी ठरवले.

ऐन तारुण्यात उमेदीच्या काळात हाताशी घसघशीत पदवी असतानाही वैद्यकीय व्यवसायात काम करायचे नाही हे ठरवणे ही काही सोपी गोष्ट नाही. परंतु अनंत फडके म्हणतात, 'पारंपरिक वैद्यकीय कामात माझा जीव रमला नसताच. मी जे ज्ञान संपादित करू शकलो त्याला माझी मध्यमवर्गीय पोषक परिस्थिती कारणीभूत होती. या वर्गात जन्माला आल्यामुळे मला कितीतरी सुविधा आपसूक मिळाल्या. माझ्या सामाजिक परिस्थितीमुळेच केवळ मला ज्ञान आणि विशेषाधिकार सहजी मिळू शकले. पण या वर्गात जन्माला न येणाऱ्या आणि शिक्षण व अन्य किमान सुविधाही सहज न मिळणाऱ्या समाजाचे काय? त्यांचे आपण देणं लागतो. म्हणूनच मला वाटते प्रगत




अनंत फडके

आणि सधन वर्गातील प्रत्येकच व्यक्तीने सामाजिक कामात उतरले पाहिजे. आपल्या गरजा भागतील इतकेच काम करून उरलेला वेळ आणि शक्ती ही सामाजिक परिवर्तनासाठी वापरली पाहिजे. माझ्यापेक्षा वर किती गेले हे पाहण्यापेक्षा माझ्या खाली किती आहेत हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे, असे मला मनापासून वाटते.'

परिवर्तनाचे काम करण्याच्या या वैयक्तिक बांधिलकीला तितक्याच ठाम वैचारिक भूमिकेचीही जोड त्यांनी दिली आहे. मुळात आरोग्य क्षेत्रातील काम म्हणजे लोकांना आरोग्य सेवा पुरवणे होय असा बऱ्याच जणांचा समज असतो. तो खोडून काढून आपली भूमिका स्पष्ट करताना अनंत फडके म्हणतात, 'आरोग्य सेवा सुधारायची तर आरोग्य व्यवस्थेचा ढाचा बदलणे गरजेचे आहे. मुळात अनारोग्य का आहे? या प्रश्नाचे उत्तर शोधले तर आपल्या लक्षात येते की आपण जो विकासाचा मार्ग स्वीकारला आहे तोच रोगकारक आहे. जितका विकास झाला असा दावा केला जातो तितके रोग वाढत आहेत असे निदर्शनास येते. हा विकास रोगकारक आहे आणि ही आरोग्य व्यवस्था वर्चस्ववादी आहे. त्यामुळे त्यात आजारी पडलेल्या व्यक्तीचं हित पाहिलं जात नाही. विकासाचा ढाचा बदलल्याशिवाय आरोग्य व्यवस्था लोकाभिमुख होणार कशी? म्हणूनच आरोग्य सेवा लोकांपर्यंत नेऊन केवळ भागणार नाही तर या सेवेतील त्रुटी, त्यातले हितसंबंध, औषध कंपन्यांची मक्तेदारी या व अशा मूलभूत महत्त्वाच्या मुद्द्यांना हात घालणं, त्यांना आव्हान देणंही आवश्यक आहे. आरोग्य सेवा पुरवण्याच्या पलीकडे जाऊन आरोग्य व्यवस्था सुधारण्यासाठी संघर्षाला उभं राहणं आवश्यक आहे. आणि हेच आरोग्य चळवळीचे प्रयोजन आहे.'



## मागोवा, लोकविज्ञान ते जनआरोग्य अभियान

मागोवामध्ये मार्क्सवादाची भूमिका अधिक विकसित करण्यावर भर दिला गेला. आपली भूमिका सामाजिक, सांस्कृतिक, स्त्रियांचे स्थान आदी सर्व अंगांना भिडणारी असली पाहिजे यातून नवमार्क्सवादी विचारांची बैठक पक्की झाली. या काळात अनंत फडके यांची 'भारतात दारिद्र्य कां आहे?' आणि 'भांडवली अर्थव्यवस्था' ही दोन पुस्तकेही मागोवातर्फे प्रकाशित झाली. याच सुमारास मेडिको फ्रेंड्स सर्कल (एमएफसी) या देशव्यापी संघटनेशी त्यांचा संबंध आला. प्रस्थापित आरोग्य व्यवस्थेमध्ये बदल घडवण्याची गरज वाटणारे आणि त्यासाठी काम करण्याची प्रेरणा असणारे डॉक्टर्स आणि इतर व्यावसायिक यांना जोडणारे हे एक व्यापक व्यासपीठ आहे. या संघटनेत भिन्न विचारप्रवाहाच्या आणि विविध कार्यपद्धती अवलंबणाऱ्या व्यक्ती सहभागी आहेत. भोपाळ गॅसकांडानंतर पीडितांच्या परिस्थितीचा अभ्यास करून एमएफसीने आपला अहवाल पहिल्या सहा महिन्यात शासनाला सादर केला. घटनेनंतर करण्यात आलेला हा पहिलाच अभ्यास होता. या अभ्यासात अनंत फडके सहभागी झाले. एमएफसीबरोबरच्या कामाबाबत ते म्हणतात, 'माझ्या कामाच्या भूमिकेची चौकट मार्क्सवादी विचारांची असली तरी इतर विचारांच्या लोकांशी, आपापल्या मतभेदांसकटही आपण काही ठोस काम करू शकतो, याची जाणीव मला या ठिकाणी झाली. या ठिकाणी चांगली आरोग्य व्यवस्था कशी असावी याचे प्रयोग करणारे लोकही आहेत. या कामाचीही परिवर्तनाच्या कामात निश्चित भूमिका आहे, असे मला वाटले. संघर्ष आणि नवनिर्माण या दोन्हींची सांगड घालण्याची दृष्टी मला या कामातून मिळाली.' ही दृष्टी अनंत फडके यांनी त्यांच्या पुढील सर्व कामात उतरवलीही.

१९८० मध्ये स्थापन झालेल्या लोकविज्ञान संघटनेच्या स्थापनेत आणि त्यानंतरच्या तिच्या पुण्यातील शाखेच्या कामातही फडके यांचा सिंहाचा वाटा आहे. 'या संघटनेतील माझी भूमिका ऑलराऊंडरची — पडेल ते करण्याची

होती.' असे ते सहज बोलून जातात. कामाचा अभिनिवेश न बाळगणाऱ्या व्यक्तीच कामात भर घालू शकतात. अनंत फडके आणि त्यांचे अन्य सहकारी यांनी लोकविज्ञान संघटनेत याच तळमळीने काम केलेले आहे. विज्ञानाची माहिती लोकांपर्यंत पोहोचवणे आणि विज्ञान-तंत्रज्ञानाच्या गैरवापराबाबत सजगता निर्माण करणे या हेतूने लोकविज्ञानने अनेकविध उपक्रम राबवले. अगदी आदिवासी खेड्यात, शाळाशाळातून विज्ञान जत्रा आयोजित करण्यापासून ते पोस्टर, स्लाईड-शो, चर्चा याद्वारा ठिकठिकाणी लोकांशी संवाद साधण्यापर्यंत. या सर्व कामात अनंत फडकेंचा सहभाग होताच, शिवाय त्यांनी लोकविज्ञानसाठी बरेच लेखनकामही केले.

लोकविज्ञानने आणि तिच्या आरोग्य समितीने समविचारी डॉक्टरांच्या मदतीने एक-दोन नव्हे तर तब्बल पंचवीस पुस्तिका एकापाठोपाठ प्रकाशित केल्या आणि या साऱ्यांचे लेखन किंवा संपादन फडके यांनीच केले होते. आधुनिक बटवा, स्त्री आरोग्य, बाळाची काळजी कशी घ्याल, टॉनिक्सचा गैरवापर, विविध आजार आणि शस्त्रक्रिया — हे व असे जिव्हाळ्याचे विषय त्यातून अत्यंत सोप्या भाषेत मांडण्यात आले. वृत्तपत्रांच्या भरमसाट आरोग्यविषयक पुरवण्या किंवा बोटाच्या क्लिकवर मिळणारी माहिती यांचा वावर तोवर सुरु झाला नव्हता. त्यामुळे आणि या छोटेखानी पुस्तिकांतील महत्त्वपूर्ण आशय यामुळे त्या लोकांना आवडत. आरोग्यविषयक ज्ञानात भर घालणाऱ्या या पुस्तिका लोकविज्ञान संघटनेने अल्प किंमतीत उपलब्ध करून दिल्या होत्या. त्या डॉक्टरांसाठीही अत्यंत उपयुक्त अशा आहेत. यातील काही पुस्तिकांच्या तर अनेक आवृत्त्या निघाल्या.

आरोग्य चळवळीत मोलाची भर घालणाऱ्या कामात अनंत फडके यांनी सक्रिय सहभाग दिला आहे. चांगल्या दर्जाची औषधे तयार करणारी आणि कमी किंमतीत, मूळ नावाने लोकांना उपलब्ध करून देणारी लोकॉस्ट ही संस्था अथवा गावपातळीवरील किमान आवश्यक वैद्यकीय सेवा स्थानिक व्यक्तींच्या क्षमताविकासातून तयार करणारे भारत वैद्यक अथवा कंपन्यांच्या फसवेगिरीविरुद्ध आवाज उठवणारे ऑल इंडिया ड्रग ॲक्शन नेटवर्क अशा काही संस्था, संघटनांतून त्यांचे योगदान राहिले आहे.

१९९९ पासून सेहत या स्वयंसेवी संस्थेबरोबर त्यांनी काम सुरु केले. या संस्थेच्या कामातूनच सुरू झालेल्या साथी या संस्थेअंतर्गत आरोग्य साथी प्रकल्पाचे काम ते सध्या पुढे नेत आहेत. गावपातळीवरील व्यक्तींना प्रशिक्षण देऊन स्थानिक आरोग्य सेवांची किमान पूर्तता करू शकतील असे आरोग्य साथी तयार करणे ही या कामामागची कल्पना आहे. गेल्या पंचवीस वर्षांच्या अनुभवाने त्यात भर पडत आहे, सुलभता



येण्यासाठी बदल होत आहेत. अल्पशिक्षित व्यक्तींनाही समजून घेता येतील असे चित्रमय साहित्य तयार झाले आहे. आरोग्य साथीचा प्रकल्प पुढे नेण्यासाठी फडके आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी जाणीवपूर्वक संघर्षवादी संस्था-संघटनांसोबत काम केले. नवनिर्माण आणि संघर्ष या दोहोंचा समन्वय घालण्याची भूमिका अवलंबली. या आरोग्य साथी कामासोबतच स्थानिक प्राथमिक आरोग्य केंद्रांचे काम सुधारण्यासाठी या संघटनांच्या सोबतीने चळवळ उभारण्याचे काम फडके व त्यांचे सहकारी यांनी केले आहे. काही पथ्ये पाळली तर संस्थात्मक काम हे चळवळीच्या कामाला पूरक योगदान ठरू शकते हेही या कामातून लक्षात आले.

## लेखनातही सातत्य

विविधांगी कामाचा व्याप चालू असतानाही लेखनकार्यात सातत्य राखणे हा अनंत फडकेंचा एक विशेष आहे. वर लोकविज्ञानच्या पुस्तिकांचा उल्लेख केला आहेच. हा त्यांच्या लेखन कार्यातील एक लहानसा भाग. वृत्तपत्रे, मासिके, यांच्यासाठीही त्यांनी विपुल लेखन केले. त्यांच्या आजवर प्रकाशित मराठी लेखांची संख्या दोनशेच्या घरात जाते. इंग्रजी लेखन याहून वेगळे; त्याही लेखांची संख्या शंभरच्या आसपास. ती कमी, कारण 'इंग्रजीतून या विषयांबाबत खूप लेखन होते. मराठीतून लिहिणारे कमी आहेत. त्यामुळे अभ्यासाधारित लिखाण हे मुख्यत: मराठीतून करायचे हे मी जाणीवपूर्वक ठरवले.' फडके आपली



भूमिका स्पष्ट करतात. या लेखनसंपदेतील निवडक लेखांचा समावेश असलेल्या 'आरोग्याचे लोकविज्ञान' पुस्तकाला मराठी विज्ञान परिषदेचा साठे स्मृती पुरस्कार मिळाला आहे. 'लेखन हे चळवळीचे एक हत्यार आहे.' असे फडके मानतात आणि प्रांजळपणे कबूलही करतात की, '... शिवाय मला लिहायला आवडतंही.'

याशिवाय त्यांच्या लेखनामागे आणखीही एक कारण आहे. आरोग्याप्रमाणेच त्यांना समाज बदलाची इतर जी कामे महत्त्वाची वाटतात, परंतु त्यामध्ये योगदान देता येत नाही, त्या विषयांना ते लिखाणात आणतात. उदाहरणार्थ, दुष्काळ निर्मूलनाचे काम त्यांना महत्त्वाचे वाटते. दक्षिण महाराष्ट्रात भारत पाटणकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पाणी संघर्ष चळवळीमार्फत दुष्काळग्रस्तांचा प्रश्न उचलून धरला आहे. या कामाशी फडके यांचा जवळून संबंध आहे व या चळवळीबद्दल त्यांनी आवर्जून वारंवार लिखाणही केले आहे.

## प्रवृत्तीचा सत्कार

सहसा एक व्यक्ती आणि एक संघटना यांचे नाव घनिष्टपणे जोडले जाते. अनंत फडके मात्र या नियमाला अपवाद म्हणावे लागतील. दीर्घ काळापासून सामाजिक परिवर्तनाच्या कामात असल्यामुळे त्यांचा संबंध आज अनेक संस्था-संघटना-व्यासपीठे यांच्याशी आहे आणि सर्वांशी तो तितकाच निकटचा आणि प्रामाणिक आहे. मतभेद, संघटनात्मक संघर्ष तर सर्व ठिकाणीच असतात, पण हाती घेतलेल्या कामाच्या आड ते येऊ द्यायचे नाहीत हे पथ्य त्यांनी आवर्जून पाळले आहे. त्यामुळे त्यांच्या कामाचा आवाका आज एखाददुसऱ्या संस्थेपुरता मर्यादित नाही. या विविध संस्था-संघटनांतून काम करताना, वावरताना त्यांना काय भिडते तर सामाजिक काम करण्याची माणसांची आंतरिक प्रवृत्ती. आपल्या पुरस्काराचा संदर्भ देऊन ते म्हणतात, 'पुरोगामी काम करण्याच्या समाजातील प्रवृत्तीला मिळालेला हा पुरस्कार आहे. असे काम खूपजण करतात, पण त्यापैकी काही जणांनाच पुरस्कार देणे शक्य असते. अशा व्यक्तींच्या निवडीला काही महत्त्व आहे. पण पुरोगामी सामाजिक कार्याला समाजमान्यता मिळणे हा भाग जास्त महत्त्वाचा आहे.' डाव्या पक्षातील अनेक कार्यकर्ते झोकून देऊन काम करतात याचीही जाण ठेवली पाहिजे याकडे ते लक्ष वेधतात.

## पूर्णवेळ कार्यकर्तेपण

सामाजिक बदलाच्या कामात पूर्णपणे झोकून देणाऱ्या व्यक्तींना केवळ कामातून आणि सहकाऱ्यांकडून मिळणारी ऊर्जा पुरेशी नसते. हा महत्त्वाचा निर्णय जबाबदारीने निभावण्यासाठी



कुटुंबातील व्यक्तींची, विशेषत: जोडीदाराची साथ जरुरीची असते. ही कौटुंबिक ऊर्जा फडके यांना मिळाली ती संध्या फडके यांच्यामुळे. संध्या यांनी अर्थार्जन करायचे आणि अनंत फडके यांनी पूर्ण वेळ सामाजिक कामाला द्यायचे असे त्यांचे ठरले. शिवाय गरज लागली तर नोकरी करू असाही एक पर्यायही फडके यांनी स्वत:साठी खुला ठेवला. पण त्याची गरजच पडली नाही. संध्याच्या पगारात भागेल अशीच गरजांची कक्षा या कुटुंबाने ठेवली. आवश्यक तिथे परखड मतप्रदर्शन आणि कायमच आश्वासक साथ देणाऱ्या संध्यामुळेच आपल्याला आपला निर्णय बावीस वर्षे निभावता आला असे मत फडके मोकळेपणाने व्यक्त करतात. याच आश्वस्तपणामुळे आजही त्यांचा ओढा पूर्णपणे विनामोबदला कामाकडे आहे. गेली सात वर्षे अनंत फडके सेहत आणि साथी संस्थातून सवेतन काम करत आहेत. पण ते त्यांनी आता अंशवेळ केले आहे. 'ज्या कामाचे रिपोर्टिंग कुठल्याही फंडींग एजन्सीला करायची गरज नाही अशा कामासाठी परत जास्त वेळ देण्यासाठी' त्यांनी हा निर्णय घेतला आहे.

❑

महाराष्ट्राच्या आदिवासी चळवळीमध्ये शहाद्याच्या आदिवासी चळवळीचे एक वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. जमीनदार, मालदार, शेतमालक यांच्या अनन्वित अत्याचाराच्या आणि पिळवणुकीच्या दडपणाखाली वर्षानुवर्ष पिचलेल्या सातपुड्याच्या डोंगररांगात व पायथ्याशी असलेल्या आदिवासींचा जोरदार लढा १९७०च्या दरम्यान सुरू झाला होता. मागोवा परिवारातील आणि पुण्यामुंबईकडच्या पांढरपेशा समाजातील शिक्षित तरुणांना शहाद्याची ओढ लागली. कित्येक जण आपले शिक्षण आणि करीअर सोडून शहाद्याच्या आदिवासी चळवळीत दाखल झाले. मार्क्सवादी विचारांनी भारलेल्या या तरुणांनी या चळवळीला एका दिशा देण्याचा प्रयत्न केला. आदिवासी भिल सेवा मंडळ आणि ग्राम स्वराज्य समितीच्या माध्यमातून आदिवासी संघटित होत होते. आदिवासी नेते अंबरसिंग महाराज या लढ्यात पुढाकारात होते. या दरम्यान मालदारांविरुद्ध सालदार-शेतमजुरांचे व्यापक पातळीवरील जोरदार संप चालू झाले. या संपानंतर सालदार, मजूर आणि गरीब शेतकऱ्यांची संघटना उभी करण्याची गरज कार्यकर्त्यांना वाटू लागली. आणि १९७२ ला अंबरसिंग महाराजांच्या अध्यक्षतेखाली श्रमिक संघटनेची स्थापना झाली.

**अविनाश कदम**

# संघर्षमय समर्पित जीवन

# वाहरू सोनवणे

त्याच वेळी प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेत वाहरूभाऊने कॉलेजच्या प्रथम वर्षापर्यंत मजल मारली होती. शहादा तालुक्यातल्या श्रीखेड गावात वाहरूभाऊ हा पहिलाच इतका शिकलेला तरुण होता. शिक्षण सुटून गावाला आल्यावर आई, वडील, भावंडे आणि इतर आयाबायांबरोबर वाहरूभाऊला मालदाराकडे मोलमजुरीला जावे लागले. 'तू इतका शिकलेला आणि आमच्याबरोबर ढोरमेहनत करतोस. आम्हाला लाज वाटते.' असे बरोबरचे म्हणत. म्हणून नोकरी मागण्यासाठी अर्ज घेऊन वाहरूभाऊ अंबरसिंग महाराजांकडे आला. वाहरूभाऊ नेहमी सांगतो, "अंबरसिंग महाराजांनी त्या वेळच्या म्हणजे १९७० सालच्या आदिवासींवर होणाऱ्या प्रचंड अत्याचाराची करूण कहाणी सांगितली. नोकरीचा अर्ज बाजूला ठेवला. आणि ते म्हणाले "जिस समाजमे तुमने जन्म लिया है, वह समाज अन्याय-अत्याचारकी धधकती अंगारमे गिर गया है, और हाथ फैलाकर चिल्ला रहा है की भैय्या बचाओ, दादा बचाओ... लेकिन जिसमें बचानेकी ताकद है वह इस



आदिवासी मिरवणुकीत ढोल-ताशाच्या तालावर नाचताना



तरह नौकरी के नशेमे धून!'' महाराजांचे बोलणे ऐकून मी हैराण झालो आणि त्यांच्याबरोबर काम करण्याचा निर्णय घेतला आणि दलित, आदिवासी कष्टकरी चळवळीचा कार्यकर्ता झालो.''

अर्थात चळवळीचे काम खडतर होते. गावागावात, डोंगरदऱ्यात आदिवासी समाजाला संघटित करण्यासाठी कधी उपाशी वणवण फिरावे लागे. पण अतिशय हलाखीच्या सामाजिक-आर्थिक स्थितीत जगणाऱ्या आदिवासींच्या जीवनाचे दर्शन घडल्यावर वाहरूभाऊने चळवळीत झोकून देण्याचा निर्णय घेतला.

पहाटे चारपासून आदिवासी-सालदार-शेतमजूरांच्या कामाला सुरुवात व्हायची, रात्री नऊ-दहा वाजेपर्यंत राब राब राबून थकून भागून ते घरी परतायचे. मजुरी अत्यंत कमी मिळायची. मालदार खूपच माजलेले. त्यांच्याकडून अपमान-अन्याय सहन करीत आदिवासी माणसे केविलवाणे जीवन जगत होती. क्षुल्लक कारणावरून सालदार-शेतमजुरांना बेदम मारहाण केली जायची. या विरुद्ध बोलले तर मालदारांचे भाडोत्री गुंड आदिवासी वस्त्यांवर हल्ले करीत. अमानुष मारझोड होई. घरे जाळून टाकली जात. यासाठी मालदारांनी भाडोत्री गुंडांची 'पुरुषोत्तम सेना'च उभारलेली होती. कार्यकर्ता म्हणून हे सर्व पाहत असताना, अनुभवत असताना वाहरूभाऊमधला संवेदनशील कवी जागा होत होता. आपले अनुभव त्याने भिलोरी भाषेतल्या कवितेत लिहायला सुरुवात केली. त्याचा मराठी अनुवाद असा-

*असं का बुवा!*
*कोणी विचारलं तर*
*गालफाडं लाल होऊन जातात.*
*नाही तर जेलात पाठवून कोंडून देतात*
*ते काहीही करोत*
*एक शब्द उच्चारता कामा नये आपण*
*त्यांच्याविरुद्ध.*
*गुपचूप काहीही सहन करावं,*
*तेव्हा आताचा जमाना*
*चांगलं म्हणतो*
*गरिबांना...*

वाहरूभाऊविषयी काही सांगायचे म्हणजे श्रमिक संघटनेविषयी सांगायचे इतके श्रमिक संघटना आणि वाहरूभाऊ यांचे एकजीव नाते आहे. शेतमालकांनी चालवलेल्या पिळवणुकीविरुद्ध सालदार-मजुरांना संघटित करण्याचे काम संघटनेने चालवलेले होते. सालदार-शेतमजूरांना १८-१८ तास राबवले जाई, वेळीअवेळी कामासाठी उठवले जाई. जादा कामासाठी जादा



वाहरू सोनवणे

वेतन नव्हते. सालदारांनी निश्चित कोणती कामे करावीत हे ठरलेले नसल्याने त्यांना वाटेल त्या कामासाठी राबवून घेतले जाई. २४ तास अशा वेठबिगारीला बांधलेला मजूर माणूस म्हणून जीवन जगू शकत नव्हता. या सर्व अन्यायाविरुद्ध श्रमिक संघटनेने सालदार-शेतमजुरांचे व्यापक आणि दीर्घकालीन सार्वत्रिक संप घडवून आणले. किमान वेतनाहून कमी दिलेल्या मजुरीच्या फरकाचे पैसे संघर्ष करून गावोगावी मिळवले गेले. दोन-दोन महिने चाललेल्या या जोरदार संपलढ्याला दडपण्यासाठी सर्व भांडवली पक्षांच्या मालदारांची युती झाली. श्रमिक संघटनेचे मजूर शेतमालकांवर अन्याय करीत आहेत असा प्रचार केला गेला. संघटनेची बदनामी करणारे लेख वृत्तपत्रांतून लिहिले गेले. संघटनेच्या कार्यकर्त्यांवर खोट्या केसेस टाकल्या गेल्या. ट्रॅक्टर भरभरून दुसऱ्या गावातल्या मालदारांच्या तरूण पोरांना आणून मारहाण केली गेली. या सर्व अन्यायाविरुद्ध श्रमिक संघटना सातत्याने संघर्ष करीत होती. वाहरूभाऊ या सर्व संघर्षात श्रमिक संघटनेचा प्रमुख कार्यकर्ता म्हणून राबत होता. महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या श्रमिक मुक्ती दल या राजकीय संघटनेचाही एक प्रमुख कार्यकर्ता म्हणून वाहरूभाऊने केलेले योगदान महत्त्वाचे आहे.

स्त्रीमुक्ती संबंधीचे कार्य हे श्रमिक संघटनेच्या चळवळीचे एक महत्त्वाचे आणि वैशिष्ट्यपूर्ण अंग होते. बलात्कार, छेडछाड, मारहाण, दारूगुत्ते याविरुद्ध अनेक कार्यक्रम घेतले गेले. स्त्री-मुक्ती हा एकूण मानवमुक्तीच्या व शोषितांच्या चळवळीचा एक भाग आहे अशी वाहरूभाऊची भूमिका होती. ठगीबाई, हिरकणा सोनवणे यांच्याबरोबरच पुण्या-मुंबईकडच्या स्त्री-मुक्ती कार्यकर्त्यांच्या साथीने शहाद्यातली स्त्री-मुक्ती चळवळ जोरात कार्यरत होती.

आदिवासींचे लढे लढत असताना स्थानिक दलित चळवळ, नामांतर आंदोलन, लाँगमार्च, दलितांवरील अत्याचाराविरुद्धचे संघर्ष, नगरपालिका कामगारांचे संघर्ष, असंघटित कामगारांचे लढे इत्यादी अनेक कामगार-कष्टकऱ्यांच्या संघर्षात संघटना साथ करीत होती. नंदुरबार जिल्ह्यातल्या या आदिवासी, दलित, कष्टकरी जनतेच्या संघर्षात थोडीथोडकी नव्हे तर गेली ३७ वर्ष वाहरूभाऊ एक कार्यकर्ता म्हणून संघर्षरत राहिला. शहाद्याच्या चळवळीत आलेले पुण्या-मुंबईकडचे कित्येक सुशिक्षित तरूण कार्यकर्ते आपल्या मध्यमवर्गीय जीवनाकडे परतले. वाहरूभाऊ कुठे परतणार होता? तो आपल्या माणसांत संघर्ष करीत ठाम उभा राहिला. वेळ प्रसंगी जिवावरची जोखीम उचलूनही.

*मरननी नेटमां कतलाक दपता फिरू?*

*जीव सं तावूक*
*मानूस्कीनी लढाई लढनाच पडी.*

(मरणाच्या धाकाने किती दिवस लपत फिरू? जीव असेपर्यंत माणुसकीची लढाई लढवावीच लागेल.) असं आपल्या आईला आणि कुटुंबाला सांगत वाहरूभाऊ दम्याचा विकार आणि आर्थिक कुचंबणा यांच्याशीही संघर्ष करीत होता. कुठलाही ट्रस्ट, प्रतिष्ठान, संसद वा एनजीओच्या मदतीशिवाय सहानुभूतीदारांच्या मदतीवर श्रमिक संघटना कार्यरत होती. वाहरूभाऊला (पर्यायाने श्रमिक संघटनेला) काही काळ सामाजिक कृतज्ञता निधीकडून आर्थिक सहाय्य मिळत होते तेवढेच. आदिवासी कल्याणकारी योजना राबवणाऱ्या संस्थांच्या कामात काही बिगरआदिवासी कार्यकर्ते जगभर आदिवासींचे प्रतिनिधी म्हणून मिरवत असताना, पुरस्कार-सन्मान उपभोगत असताना-

*मां, तूना जीव घरमा खेचं अन्*
*मना जीव बाहेर खेचं*
*मां पयली लढाई आपनीच*



असं म्हणत वाहरूभाऊ घरातील कौटुंबिक आणि बाहेरची अन्याय-अत्याचाराविरुद्धची लढाई नेहमी लढत राहिला. परिवर्तनाची ही लढाई वाहरूभाऊच्या इतकी अंगात भिनलेली की वाहरू आणि हिरकणाने आपल्या मुलाचे नाव 'मालेमा' ठेवले, जे मार्क्स, लेनिन, माओ यांच्या आद्याक्षरांवरून बनले आहे. तर मुलीचे नाव 'समता' ठेवले.

प्रसारमाध्यमांना मॅनेज करीत आपल्या आंदोलनाच्या बातम्या छापून आणणारी कुशल यंत्रणा नाही; इंग्रजी माध्यमे आणि राष्ट्रीय पातळीवरचे रिपोर्ट, नियतकालिके, मासिके वा वर्तमानपत्रातून कार्यकर्त्या व्यक्तीवर पान भरभरून लेख लिहवून आणणाऱ्या तज्ज्ञ मंडळींचे नेटवर्कींग नाही; अशा प्रतिष्ठान, ट्रस्ट, फाउण्डेशन इत्यादी मध्यमवर्गीय व्यवहाराच्या वातावरणात वाहरूभाऊ काय किंवा काळुरामकाका काय, यांचे आदिवासी क्षेत्रातले काम दुर्लक्षिले जाणे साहजिकच आहे.

महाराष्ट्र फाउण्डेशनचा पुरस्कारही वाहरूभाऊला उशीराच मिळतोय.

परिवर्तनाच्या चळवळीतल्या या सगळ्या वातावरणाचे पडसाद वाहरूभाऊच्या संवेदनशील कवी मनात उमटत होते. एका कवितेत तो म्हणतो-

*आम्ही स्टेजवर गेलोच नाही*
*आणि आम्हाला बोलावलंही नाही*
*आमची पायरी आम्हाला दाखवून दिली*
*आम्ही तिथेच बसलो;*
*आणि ते स्टेजवर उभे राहून*
*आमचे दु:ख आम्हालाच सांगत राहिले.*

चळवळीतल्या अनुभवातल्या वाहरूभाऊच्या अशा कितीतरी कविता बिगरआदिवासी मध्यमवर्गीय कार्यकर्त्याला अस्वस्थ आणि अंतर्मुख करून सोडतात.

या पार्श्वभूमीवर १९८९-९०च्या दरम्यान वाहरूभाऊ आणि काळूरामकाकांनी आदिवासींच्या आत्मसन्मानाची व अस्मितेची चळवळ संघटित करायला सुरवात केली. हिंदू धर्मांतर्गत जातिव्यवस्थेतील बहिष्कृत जातींचा लढा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी उभा केला. पण हिंदू समाजाच्या या जातिव्यवस्थेच्या परिघाबाहेर असलेला आदिवासी समाज नेहमीच आपली समता आणि सामुहिकता यावर आधारलेली स्वयंनिर्भर जीवनशैली टिकवताना इतर नागर समाजापासून अलग राहिला. त्यात ढवळाढवळ करून ती समाजव्यवस्था मोडू पाहणाऱ्या इंग्रज वसाहतवाद्यांशी भूमिज, कोरू, संथाळ, गोंड, भिल इत्यादी आदिवासी जमातींनी संघर्ष केला. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या




कवी नारायण सुर्वे यांच्या हस्ते सत्कार, डोंबिवली




५ व्या आदिवासी एकता परिषदेच्या महासंमेलनात भाषण करताना

इतिहासातील हे पहिले स्वातंत्र्य लढे होते. आदिवासी समाजामध्ये ही स्वायत्ततेची जाणीव रुजलेली असल्यामुळेच आदिवासी स्वायत्ततेची चळवळ आसाम, उत्तरांचल, झारखंड, छत्तीसगडपासून ते दक्षिणेपर्यंत पसरलेली आहे.

जंगल, जमीन, मजुरी, आर्थिक शोषण, वेठबिगारी इत्यादी प्रश्नांवर महाराष्ट्रात आदिवासींच्या चळवळी झाल्या आहेत, होत आहेत. पण आदिवासींच्या आर्थिक प्रश्नाला बिगर आदिवासी मुख्य प्रवाहाच्या सामाजिक सांस्कृतिक वर्चस्ववादी भूमिकेचेही एक अंग आहे. आदिवासी ते उदात्त असे म्हणत आदिवासींना तिथेच ठेवणारा पर्यावरणवादी दृष्टिकोन जसा घातक तसाच जे जे नागरी मुख्य प्रवाहाचे ते ते आदिवासींवर लादण्याचा दृष्टिकोनही घातक आहे. सगळ्याच समाजघटकांच्या सांस्कृतिक अस्मिता मुख्य प्रवाहाखाली (मुख्यत: ब्राह्मणी हिंदुत्ववादी), चिरडण्याच्या प्रवृत्तीला विरोध म्हणूनही ही आत्मसन्मानाची चळवळ सुरु करण्याचे वाहरूभाऊ आणि काळूरामकाकाने ठरविले. यासाठी या चळवळीत फक्त आदिवासींनी आदिवासी म्हणून एकत्र आले पाहिजे अशी भूमिका त्यांनी घेतली व आदिवासी एकता परिषदेची स्थापना केली. यावर आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या बिगरआदिवासी कार्यकर्त्यांच्या तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. 'हे चळवळीत फूट पाडणारे आहे. जन्मावर आधारित कोणत्याही तत्त्वाने एकत्र यायला आमचा विरोध आहे' अशी भूमिका घेतली गेली.

आदिवासींच्या (अगदी दलितांच्या आणि स्त्रियांच्याही) स्वायत्ततेच्या चळवळीकडे पुरोगामी डाव्या चळवळीला कधी सकारात्मक दृष्टीने पाहता आले नाही. 'यांना आपल्या परिस्थितीची जाणीव नाही. भवितव्याविषयी आकलन नाही. नव्या समाजाचे ध्येयवादी स्वप्न नाही. अशी अनभिज्ञ माणसे स्वायत्तपणे चळवळ कशी काय करू शकतात?' अशी एक सुप्त अहंभावी भावना या विरोधामागे आहे. अशा या भूमिकेतून आदिवासी समाजात अवलंबित्वाची भावना निर्माण करून त्यांच्यावर वर्चस्व निर्माण करण्याचा दृष्टिकोन पुढे येतो.

वाहरूभाऊ, काळुरामकाका यांनी मुंबईपुण्यात बिगरआदिवासी कार्यकर्त्यांबरोबर चर्चा करून आपली भूमिका स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला. मध्यमवर्गीय बिगरआदिवासी कार्यकर्त्यांचे योगदान आदिवासी एकता परिषद नाकारत नाही. 'बिगर आदिवासींचा द्वेष' या आधारावर ते एकत्र आलेले नाहीत. आदिवासी अस्मिता विकसित करणे, शोषण गुलामीला विरोध, स्त्रियांवरच्या दडपणाला विरोध, धार्मिक व जातीय अत्याचाराला विरोध या भूमिकेतून, फक्त आदिवासींनी एकत्र यायला हवे अशी

आदिवासी एकता परिषदेची भूमिका त्यांनी स्पष्ट केली. आदिवासी एकता परिषद स्थापन झाल्यामुळे बिगर आदिवासी कार्यकर्ते असलेल्या श्रमिक संघटना आणि भूमीसेना या संघटना मोडीत काढल्या वा आदिवासी एकता परिषदेत विलीन झाल्या असे घडले नाही.

वाहरूभाऊ आणि काळूरामकाका यांनी महाराष्ट्र, गुजरात, मध्यप्रदेश व राजस्थान इत्यादी राज्यात फिरून आदिवासींना एकत्र आणले. १९९४ साली अंकुशविहिर अक्कलकुवा येथे पहिले आदिवासी महासंमेलन झाले. गेल्या दहाबारा वर्षात अक्कलकुवा, झाबुआ, जयपूर, गुजराथ इत्यादी विविध राज्यांत आदिवासी एकता परिषदेची महासंमेलने झाली. त्यात विविध राज्यांतील हजारो आदिवासींनी सहभाग घेतला. दिवसेंदिवस ही चळवळ व्यापकरूप घेत आहे.

आदिवासींना हिंदू-मुस्लिम-ख्रिश्चन या धर्मांच्या जाळ्यात अडकवण्याच्या प्रयत्नाला आदिवासी एकता परिषद प्रखर विरोध करीत आली आहे. आदिवासींचे देव, त्यांचे सामाजिक विधी, आदिवासी संस्कृती यांचे हिंदूकरण करण्याची प्रक्रियाही गेल्या काही वर्षात विश्व हिंदू परिषद, बजरंग दल व वनवासी कल्याण आश्रम यांनी जोरात चालवली आहे. आदिवासींचे 'वनवासी'करण होत आहे. आदिवासी हिंदू नाहीत, आदिवासींचा वेगळा आदिवासी धर्म आहे, अशी भूमिका घेत याला विरोध होत आहे. १८ नोव्हेंबर २००१ साली जव्हार येथे आदिवासी एकता परिषद, भूमीसेना आणि विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने या धर्मांध हिंदूकरणाच्या विरोधात प्रचंड मेळावा आयोजित करण्यात आला.

या सर्व चळवळींमागची प्रेरणा असलेला वाहरूभाऊ एक संवेदनशील कवी आहे. महाराष्ट्रात निर्माण झालेल्या आदिवासी कवी, लेखक, विचारवंतांमधला तो बिनीचा लेखक, विचारवंत आहे. महाराष्ट्रातील आदिवासी साहित्य परिषद आणि अखिल भारतीय आदिवासी साहित्य मंचाचाही तो एक प्रमुख आधारस्तंभ आहे. त्याचा 'गोधड' हा मराठी व भिलोरी भाषेतला काव्यसंग्रह अत्यंत गाजला. त्याला कुसुमाग्रज साहित्य पुरस्कार मिळाला.

१९९०च्या पाचव्या आदिवासी साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात वाहरूभाऊने आदिवासी आत्मसन्मानाच्या व अस्मितेच्या चळवळीची अतिशय सखोल वैचारिक मांडणी केली. त्यातून पुढे आदिवासी एकता परिषदेच्या चळवळीला प्रेरणा मिळाली.

महाराष्ट्रात प्रस्थापित ब्राह्मण्यवादी-भांडवली-पुरुषसत्ताक संस्कृतीच्या विरोधात उभ्या राहिलेल्या विद्रोही सांस्कृतिक चळवळीतही वाहरूभाऊने मोठे वैचारिक योगदान दिले आहे. या चळवळीच्याही स्थापनेत त्याचा मोठा वाटा आहे. कोल्हापूरला २००० साली भरलेल्या दुसऱ्या विद्रोही साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलताना आदिवासी जीवन संस्कृती, ब्राह्मण्यवादाचे कारस्थान आणि विद्रोहाची दिशा व अडचणी याविषयी अत्यंत सडेतोड आणि सर्वस्पर्शी विचार मांडून त्याने हे संमेलन गाजवले होते.

'आदिवासी ढोर नाय, माणूस हाय' एवढेच म्हणणे पुरेसे नाही. तो केवळ माणूसच नाही तर मुख्य प्रवाह म्हणवणाऱ्या नागर समाजात घडलेल्या विकृतींपासून अलिप्त असलेल्या, समता, सामूहिकता, आत्मनिर्भरता यांवर आधारलेल्या संस्कृतीचा तो वारस आहे. उद्याचा मानवमुक्तीचा नवा समाज घडवण्यात तो पुढाकारात असेल, आदर्श असेल असा ठाम विश्वास नेहमी वाहरूभाऊच्या बोलण्यात ओतप्रोत भरलेला असतो. ❑

# मानपत्र



## श्रीमती मनीषा वर्मा

जगातली सर्वात मोठी लोकशाही तोलून धरणाऱ्या चार खांबांपैकी एक - प्रशासन! या प्रशासन यंत्रणेच्या तुम्ही एक आदर्श प्रतिनिधी आहात. लोकआंदोलनांच्या रेट्यांमुळे, बदलत्या स्थितीनुसार सरकारला जे निर्णय घ्यावे लागतात ते लोकशाहीचा आत्मा असलेल्या सामान्य माणसापर्यंत पोहोचतील, त्यांची अंमलबजावणी प्रभावी रीतीने होईल, हे पाहण्याची जिम्मा असलेल्या नोकरशाहीत आपल्या कार्यतत्परतेने आणि कार्यक्षमतेने तुम्ही स्वत:चे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे.

लोक आणि लोकनियुक्त सरकार यांच्यातील आपण एक महत्त्वपूर्ण दुवा आहोत याचे पक्के भान तुम्हाला कौटुंबिक वारशाने मिळाले आणि ते तुम्ही आत्मीयतेने जपले. कायद्याच्या चौकटीत राहूनही लोकांचा सहभाग मिळवत आदर्श आणि शोषणमुक्त राज्यव्यवस्था निर्माण करता येते या विश्वासाने तुम्ही अनेक धाडसी प्रयोग केले आहेत.

महाराष्ट्रातील वेगवेगळ्या जिल्ह्यांत मुख्य कार्यकारी अधिकारी, आदिवासी विकास अप्पर आयुक्त, जिल्हाधिकारी अशा अधिकार पदांवर तुम्ही आपली चमक दाखवली आहे. ठाणे जिल्ह्याच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम करताना विकासापासून वंचित झालेल्या आदिवासींकडे तुम्ही विशेष लक्ष पुरविले. ७३व्या घटना दुरुस्तीने तसेच आदिवासी स्वशासन कायद्याने ग्रामस्थांना दिलेले अधिकार लोकांपर्यंत पोहोचावेत, पंचायत राज पाया असलेल्या या ग्रामसभा - सक्षम नि सक्रिय व्हाव्यात या दृष्टीने ''आपला विकास आपल्या हाती'' अभियान राबवलेत. सहकारी कर्मचारी, स्वयंसेवी संस्था व संघटना, समाजातील जाणकार व्यक्ती यांना जोडण्याची तुमची खुबी या अभियानामुळे सर्वांच्या ध्यानात आली. नोकरशाही व सरपंचांचे प्रशिक्षण, प्रशासनाची पोलादी चौकट वाकवून लोकाभिमुख कारभार, ग्रामसभांना दस्तुरखुद्द उपस्थिती या सर्वामुळे ठाणे जिल्ह्यात चांगल्या लोकशाही परंपरा मूळ धरू शकल्या. शालेय विद्यार्थ्यांच्या 'अभिरूप ग्रामसभा' घेऊन नव्या पिढीला लोकशाहीचे धडे तुम्ही दिलेच, पण मुलांच्या माध्यमातून मोठ्यांनाही तुम्ही हे वळण लावले.

अमरावती येथे जिल्हाधिकारी असताना वन अतिक्रमणाबाबत आदिवासींचे हक्क नोंदण्याची वैशिष्ट्यपूर्ण कार्यपद्धती तुम्ही विकसित केली. शासकीय आदेश १९७८-७९ लाच निघाले असले, तरी त्याची अंमलबजावणीच झालेली नाही हे लक्षात येताच केंद्र सरकारचा १९९०चा आदेश आणि सर्वोच्च न्यायालयाचा निर्वाळा यांचा आधार घेऊन गावपातळ्यांवर समित्या नेमल्या. गावातच प्रत्यक्ष पाहणीद्वारे वन लागवडी तपासून सांगणारे दावे तपासण्याचे ठरविले. त्यासाठी ग्रामसभांना अधिकार देऊन त्यांना कार्यपद्धती समजावून सांगितली. अधिकारी सर्वत्र जाऊ शकत नाहीत, म्हणून लाल फितीत अडकून राहण्याऐवजी लोकसहभाग मिळवून काम करण्याच्या तुमच्या कार्यपद्धतीचे समर्थन राज्य सरकारला करावेच लागले. एवढेच नव्हे तर या कार्यपद्धतीचा 'अमरावती पॅटर्न' असा गौरवपूर्ण उल्लेख करत राज्यभर हा पॅटर्न लागू करण्याच्या दृष्टीने सरकारने जीआरसुद्धा काढला.

पण आम्हा सर्वसामान्यांच्या मनात तुम्ही ठसलात ते सोलापूरच्या जिल्हाधिकारी म्हणून काम करत असताना रोजगार हमी योजनेतील भ्रष्टाचार उघडकीला आणल्यामुळे. ज्या निर्भयतेने आणि ज्या तडफेने तुम्ही हे केलेत त्याला तोड नाही. कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ या न्यायाने योजना राबविणारेच भ्रष्ट झाले तर लोकांनी कोणाकडे पाहावयाचे या अस्वस्थ विचारातून भल्याबुऱ्या परिणामांचा विचार न करता तुम्ही हा भ्रष्ट व्यवहार उजेडात आणलात. सरकारी अधिकारी म्हणजे हांजी हांजी करणारे, शासनालाही वरचढ ठरून विकासाची परिमाणेच बदलणारे ही लोकांच्या मनातली प्रतिमा आपल्या काटेकोर वर्तनाने तुम्ही पुसून टाकलीत. विश्वास ठेवावा असेही काही आजकालच्या जगात आहे यावरचा साध्यासुध्या माणसांचा विश्वास अबाधित ठेवलात हे तुमचे सर्वोच्च योगदान म्हणायला हवे. तुम्ही सुरू केलेले 'चावडीवाचन' म्हणजे लोकशाही हक्कांचेच वाचन ठरले.

तुम्ही सध्या 'राजीव गांधी ड्रिंकिंग वॉटर मिशन'वर संचालक म्हणून दिल्ली मुक्कामी आहात. या देशातल्या कोट्यवधी जनतेच्या जीवनमरणाशी निगडित असलेल्या पाणी प्रश्नावर काम करतानाही तुमचे 'पाणी' सरकारला जोखावे लागेल याची आम्हाला खात्री वाटते. खरे तर तुमच्यासारख्या अधिकाऱ्यांना कोठेही 'टाकले' तरी त्यातून जनतेचे हितच होणार हेच सत्य पुन्हा पुन्हा निर्विवाद शाबीत होत राहील.

सामाजिक न्यायाचे भान असलेल्या तुमच्यासारख्या दुर्मीळ अधिकाऱ्यांप्रति आम्हाला नेहमीच कृतज्ञता वाटत राहील...

**- प्रतिमा जोशी**



मधू आडेलकर
अध्यक्ष
केशव गोरे स्मारक ट्रस्टचे विश्वस्त



डॉ. विलास वाघ



श्री. विलास भोंगाडे



ॲड. सुरेखा दळवी

# महाराष्ट्र फाउण्डेशन
# समाजकार्य पुरस्कार योजना
# २००६
# निवड / सल्लागार समिती
# (भारत)



प्रा. रवी देवगडकर



श्रीमती प्रतिमा जोशी



श्रीमती रजिया पटेल



विजय दिवाण



श्रीमती ज्योती केळकर



भूषण ठाकूर
निमंत्रक



**सुनील देशमुख**



**सुनीता धुमाळे**

अमेरिकेमध्ये 'दक्षिण आशियाई महिलांचे प्रश्न' हे प्रमुख कार्यक्षेत्र. तेथील मराठी स्त्रियांमध्ये 'आत्मभान' जागविण्याचे कार्य. हॉस्पाईसारख्या संस्थेच्या सल्लागार. २००४ पासूनच्या 'महाराष्ट्र फाउण्डेशन'च्या अध्यक्षा.

# महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार योजना २००६ निवड समिती (अमेरिका)



**शोभा चित्रे**

'गोठलेल्या वाटा', 'पानगळीच्या आठवणी' आणि 'गौरी, गौरी कुठे आलीस...?' या पुस्तकांच्या लेखिका. अनेक नियतकालिकांतून सातत्याने ललित-लेखन. अनेक सांस्कृतिक आणि सामाजिक कार्यात सहभाग.



**डॉ. अरुंधती विनोद**

स्त्रीरोगतज्ज्ञ, टेनाफ्लाय, न्यूजर्सी अनेक सेवाभावी संस्थांशी संबंधित

# महाराष्ट्र फाउण्डेशन

चैतन्याची फुलवा झाडे, द्या जगण्याला अर्थ नवा
अडले पडले उचला, ज्यांना आधाराचा हात हवा
— दिलीप वि. चित्रे

'महाराष्ट्र फाउण्डेशन' ही अमेरिकेतील मराठी माणसांची संस्था आहे. १९७८ साली या संस्थेची स्थापना झाली. समाजसेवेची भावना ही या संस्थेच्या स्थापनेमागील प्रेरणा आहे. समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निवारण करून त्यांना स्वत:च्या पायावर उभे करण्याचा प्रयत्न ही संस्था गेली अठ्ठावीस वर्षे करीत आहे.

आदिवासींमध्ये शिक्षणप्रसार, अपंगांचे पुनर्वसन, गावातील आरोग्यसेवेची सुधारणा, शेतीतील उत्पादनवाढीचे प्रयोग यांसारखे समाजोपयोगी उपक्रम करणाऱ्या ध्येयवादी संस्थांना आर्थिक व श्रमदानाचे साहाय्य 'महाराष्ट्र फाउण्डेशन' या संस्थेद्वारे होत असते.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने भारतातील सातशे पन्नासहून अधिक गरजू मुलांना आर्थिक साहाय्य केले आहे; सर्वांगीण विकासासाठी महाराष्ट्रातील बारा गावे दत्तक घेतली आहेत; जनकल्याण रक्तपेढीमार्फत महाड येथे 'एड्स चिकित्सा प्रयोगशाळा' स्थापन केली आहे. 'पूना ब्लाइंड मेन्स असोसिएशन'साठी एक रुग्णवाहिका घेऊन दिली आहे. महाराष्ट्रातील भूकंपग्रस्तांसाठी पाच लक्ष डॉलर्सचे, तर गुजरातमधील भूकंपग्रस्तांसाठी सव्वा लक्ष डॉलर्सचे साहाय्य केले आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने स्त्रियांचे सबलीकरण, शिक्षण, आरोग्य, पर्यावरण आदी क्षेत्रांत काम करणाऱ्या साठ स्वयंसेवी संस्थांना ६ लक्ष ८० हजार डॉलर्सच्या देणग्या दिल्या. याव्यतिरिक्त डिसेंबर २००४ मधील त्सुनामीची आपत्ती आणि जुलै २००५ मधला महाराष्ट्रातला पूर या दुःखद घटनांतील संकटग्रस्तांसाठी 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने तातडीने ७३ हजार डॉलर्सची रक्कम उभी केली.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने 'भारत-वैद्य' (अनवाणी डॉक्टर) व 'मैत्रीण' हे दोन नवे प्रकल्पही गेल्या वर्षी हाती घेतले, तर 'समाज परिवर्तनासाठी माहिती तंत्रज्ञान' हा 'फाउण्डेशन'चा प्रकल्प आता दुसऱ्या टप्प्यात प्रवेश करत आहे. एक गाव - एक संगणक हा या प्रकल्पाचा पहिला टप्पा होता व त्याद्वारे आजपर्यंत ५९ खेड्यांना त्याचा लाभ मिळवून देण्यात आला आहे.

अशा रीतीने आजवर भारतातील चारशेहून अधिक संस्थांना ८७ लक्ष डॉलर्सहून अधिक रकमांच्या देणग्या दिल्या गेल्या आहेत. येत्या वर्षासाठी 'महाराष्ट्र फाउण्डेशन' पुढील प्रकल्प हाती घेत आहे : (१) मानवी अपव्यापाराचे नियंत्रण : भारतात या तऱ्हेच्या अपव्यापारातून दरवर्षी हजारो स्त्रिया वेश्याव्यवसायात आणल्या जात आहेत. त्यांतील ४०% प्रमाण १८ वर्षांखालील मुलींचे आहे. हा अपव्यापार थांबवण्यासाठी विविध उपायांचा अवलंब करणे व या व्यवसायातून बाहेर येणाऱ्या मुली/स्त्रियांचे पुनर्वसन करणे या हेतूने हा प्रकल्प योजला आहे. (२) बालिका-विवाह नियंत्रण : लातूरच्या 'ग्रामीण विकास लोकसंस्थे'च्या सहकार्याने १३ ते १६ वयोगटातील मुलींचा विवाह लावण्यास प्रतिबंध करणारा प्रकल्पही यावर्षी सुरू केला जात आहे. (३) निराधार महिला पुनर्वसन/ज्येष्ठ नागरिकांना काळजीवाहू सहकारी : या दुहेरी प्रकल्पातून निराधार परंतु सक्षम महिलांना एकाकी ज्येष्ठ नागरिकांसोबत राहून त्यांना साथ देणे व त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे यासाठी प्रशिक्षण देण्यात येईल. पर्यायाने दोन्ही घटकांना त्याचा लाभ होईल.

विशेष अभिमानाची बाब म्हणजे या सर्व कामाची दखल घेऊन 'संयुक्त राष्ट्रसंघा'ने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला Special Consultative Status हा विशेष दर्जा दिला आहे. यामुळे 'फाउण्डेशन'ला संयुक्त राष्ट्रसंघाने आयोजित केलेल्या स्वयंसेवी संघटनांच्या परिषदांना सल्लागार म्हणून उपस्थित राहता येणार आहे.

Invest in future
of those
with no future...
So they can reinvest

हे 'महाराष्ट्र फाउण्डेशन'चे घोषवाक्य आहे.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला अभिप्रेत असणाऱ्या या समाज-परिवर्तनाचा वसा घेतलेल्या अनेक व्यक्ती व संस्था महाराष्ट्रात सतत कार्यरत आहेत. अशा संस्था व व्यक्ती यांच्या कार्याबद्दल वाटत असलेली कृतज्ञता अल्पांशाने का होईना, व्यक्त व्हावी या हेतूने श्री. सुनील देशमुख यांच्या पुढाकाराने १९९६ साली सुरू केलेली समाजकार्य पुरस्कार योजना या वर्षी अकराव्या वर्षात प्रवेश करत आहे.

समाजाच्या सांस्कृतिक विकासात व समाजाच्या घडणीत साहित्य व साहित्यिक यांचा मोठा वाटा असतो. मराठी साहित्यिक व साहित्य यांचे हे ऋण अल्पांशाने फेडावे, या भावनेने 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने १९९४ साली सुरू केलेली 'मराठी साहित्य पुरस्कार योजना' या वर्षी तेराव्या वर्षात पदार्पण करत आहे. ❑



## केशव गोरे स्मारक ट्रस्ट

केशव ऊर्फ बंडू गोरे हे महाराष्ट्रातील समाजवादी चळवळीतील एक तेजस्वी व्यक्तिमत्त्व होते. भारतीय स्वातंत्र्य चळवळ, गोवा मुक्ती आंदोलन यातील त्यांच्या सहभागाबरोबरच मुंबईतील कामगार चळवळीतील त्यांचे योगदान मोलाचे आहे. मुंबई महापालिकेतील सफाई कामगार, तसेच असंघटित कष्टकऱ्यांना संघटित करण्यात केशव गोरे आघाडीवर होते. त्यांनी लिहिलेला 'आंतरराष्ट्रीय समाजवाद' हा ग्रंथ त्यांच्या व्यासंगाची झलक दाखवतो. १९५८ साली त्यांचे अल्पवयात निधन झाले. केशव गोरे यांच्या अकाली निधनानंतर त्यांचे चळवळीतील सहकारी व मित्र यांनी 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट'ची स्थापना केली. ट्रस्टतर्फे समाजपरिवर्तनाच्या दृष्टिकोनातून प्रबोधनात्मक तसेच रचनात्मक आणि सेवाभावी कार्यक्रम राबवले जातात. ट्रस्टचे एक संदर्भ ग्रंथालय असून विविध सामाजिक शास्त्रांच्या संदर्भातील सुमारे ५,५०० ग्रंथ या ग्रंथालयात उपलब्ध आहेत. राजकीय, सामाजिक, अभ्यासू कार्यकर्ते व संशोधन करणारे विद्यार्थी यांना या सोयीचा लाभ मिळत आहे.

संशोधनाच्या कार्याला उपकारक व्हावे म्हणून ट्रस्ट एक डॉक्युमेंटेशन सेंटर चालवते. या केंद्रात सुमारे २०० विषयांवरील नियतकालिकांतील कात्रणे रीतसर जतन केली जातात. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनाच्या अनुषंगाने व्याख्याने आयोजित केली जातात. ट्रस्टतर्फे महत्त्वाच्या सामाजिक विषयांवर पुस्तिका प्रकाशित करण्यात येतात. परिसंवाद, चर्चासत्रे, शिबिरे अशा विविध माध्यमांतून विचारमंथनाला चालना देणारे कार्यक्रम ट्रस्टतर्फे आयोजित करण्यात येतात.

मुंबईतील राहण्याच्या जागांच्या अपुरेपणामुळे विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन ट्रस्टतर्फे अभ्यासिका चालविण्यात येते. आज ४०० विद्यार्थी या अभ्यासिकेचा लाभ घेत आहेत.

मुंबई महानगरपालिकेच्या उन्नत नगर, गोरेगाव (प.) येथील दोन प्राथमिक शाळा विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी ट्रस्टने दत्तक घेतल्या असून तीन डोंगरी (गोरेगाव) झोपडपट्टी विभागात व कल्याण केंद्राच्या इमारतीमध्ये बालवाड्या, २०० विद्यार्थी-विद्यार्थिनींकरता अभ्यासिका, क्षयरोग निवारण केंद्र, आरोग्य केंद्र, स्वयंरोजगार केंद्र असे उपक्रम ट्रस्ट चालवीत आहे. आरोग्य केंद्रामधील दंतविभागात दातावरील सर्व प्रकारच्या उपाययोजनांची व्यवस्था आहे. तसेच सर्व प्रमुख आजारांवर सल्ला देण्यासाठी विशेषज्ञ विशिष्ट दिवशी उपलब्ध असतात. ट्रस्टतर्फे डिसेंबर २००३पासून तीन डोंगरी भागात 'परिवार विकास कार्यक्रम' राबवला जात आहे. वस्तीतल्या समस्याग्रस्त कुटुंबांची निवड करणे, त्यांच्या समस्या समजून घेणे आणि त्यांना मार्गदर्शन करून या समस्या त्यांच्या त्यांनीच सोडवण्यास प्रेरित आणि प्रोत्साहित करणे असे या कामाचे स्वरूप आहे. सध्या एकूण १२१ कुटुंबांमध्ये हे काम चालू आहे.

ज्येष्ठ नागरिकांना ज्या शासकीय सवलती उपलब्ध होतात, त्याकरता त्यांना सक्षम अधिकाऱ्यांच्या सहीचे ओळखपत्र बहुधा आवश्यक असते. ते मिळवण्याकरता अशा ज्येष्ठ व्यक्तींना यातायात करावी लागते. त्यांची ही गरज लक्षात घेऊन ट्रस्टने २० रुपयांच्या नाममात्र शुल्कामध्ये अशी ओळखपत्रे मिळवून देण्याची व्यवस्था २००४ पासून केली आहे. आजपर्यंत २७५० ज्येष्ठ नागरिकांनी याचा लाभ घेतला. तसेच, कायद्याचा योग्य सल्ला मिळणे हेही आता सामान्य माणसाच्या आवाक्यात राहीनासे होत असल्याने ट्रस्टने एक मोफत कायदा-सल्ला केंद्र याच वर्षी सुरू केले आहे. रोजगार मिळवण्याची क्षमता वाढविण्याच्या दृष्टीने श्रमिक विद्यापीठाच्या मदतीने इलेक्ट्रिशिअनचे, मेंदी नक्षीकामाचे प्रशिक्षण दिले जाते.

केशव गोरे स्मारक ट्रस्टने भाषेच्या दृष्टीने एक महत्त्वाचा उपक्रम जुलै २००५ पासून सुरू केला आहे. दिवंगत प्रा. सुहास गोळे यांच्या प्राध्यापक व विद्यार्थी मित्रांनी त्यांचे यथोचित स्मारक व्हावे, या उद्देशाने केशव गोरे स्मारक ट्रस्टचा एक उपक्रम म्हणून 'प्रा. सुहास गोळे भाषा शिक्षण केंद्र' चालू केले आहे. सुहास गोळे हे इंग्रजीचे सुप्रसिद्ध व्याख्याते होते. या केंद्राचे उद्घाटन डॉ. भालचंद्र नेमाडे यांनी केले. या केंद्रामार्फत प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांचे इंग्रजी व मराठी भाषेचे प्रशिक्षण, इंग्रजी संभाषण, प्रादेशिक भाषेत शिकलेल्या विद्यार्थ्यांना अकरावीत प्रवेश घेतल्यावर इंग्रजी भाषेच्या ज्या अनेक प्रकारच्या अडचणी येतात त्याकरता संभाषणात्मक इंग्रजीचा अभ्यासक्रम, जर्मन, जपानी, फ्रेंच, स्पॅनिश, रशियन यांसारख्या परकी भाषांचे शिक्षण - असे उद्देश आहेत. त्यांपैकी केंद्राने शिक्षकांच्या मराठी-इंग्रजीच्या कार्यशाळा व जर्मन, जपानी, इंग्रजी संभाषण अभ्यासक्रम चालू केले आहेत.

गेल्या वर्षापासून केशव गोरे स्मारक ट्रस्टमध्ये 'रसिक चित्र मंडळ' या नावाने फिल्म सोसायटी सुरू करण्यात आली आहे. देश-विदेशातील विविध चित्रपट दाखवण्याबरोबरच चित्रपटाविषयी समज वाढवण्याचे उपक्रमही 'रसिक चित्र मंडळा'तर्फे घेतले जाणार आहेत.

वैद्यकीय चिकित्सा केंद्र, बालविकास केंद्र, बालवाड्या, प्रौढ साक्षरता वर्ग, दैनिके व नियतकालिके यांचे नि:शुल्क वाचनालय, व्यक्तिमत्त्व विकास प्रशिक्षण वर्ग, असे अनेक उपक्रम ट्रस्टतर्फे चालविले जातात. स्त्रियांसाठी कायदेशीर सल्ला देण्याचे व आवश्यक तेथे counselling करण्याचे 'स्वाधार' या संस्थेचे कार्य ट्रस्टच्या वास्तूतूनच केले जाते. 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ने सुरू केलेल्या 'मराठी साहित्य पुरस्कार योजना', 'समाजकार्य पुरस्कार योजना', यांची कार्यवाही ट्रस्टकडून केली जाते. तसेच तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी कुटुंबीयांच्या पुढाकाराने सुरू झालेल्या अनुवाद-अनुदान योजनेची कार्यवाहीही ट्रस्टकडूनच केली जाते. या योजनेखाली तर्कतीर्थांच्या 'वैदिक संस्कृतीचा विकास' या ग्रंथाचा 'Development of Indian Culture : Vedas to Gandhi' हा एस.आर.नेने यांनी केलेला इंग्रजी अनुवाद तसेच त्यांच्या 'जडवाद' या पुस्तकाचा अरुंधती खंडकर यांनी केलेला 'Spiritual Materialism' हा इंग्रजी अनुवाद असे दोन अनुवाद प्रकाशित झाले आहेत. या योजनेचे स्वरूप २००४ पासून बदलले आहे.

वाई या गावातील सर्व शाळांमधून शालान्त परीक्षेत पहिल्या क्रमांकाने यशस्वी होणाऱ्या विद्यार्थ्याला व विद्यार्थिनीला शिक्षणाकरता येणारा पदवी/पदविकेपर्यंतचा फीचा खर्च करण्याकरता साहाय्य दिले जाते. अशा तऱ्हेने २००४ व २००५ या साली दोन विद्यार्थी व दोन विद्यार्थिनींना या योजनेतून साहाय्य करण्यात आले.

महाराष्ट्र फाउण्डेशनच्या साहाय्याने 'आगरकर विचार व्यासपीठ योजना' गेली पाच वर्षे केशव गोरे स्मारक ट्रस्टतर्फे कार्यान्वित झाली आहे. या योजनेखाली 'पुरोगामित्व म्हणजे काय?' (श्रुती तांबे), 'गुजरात: सत्य आणि फक्त सत्यच' (संपादक : अंजली मुळे, किरण मोघे, विद्या कुलकर्णी) या पुस्तिका प्रकाशित करण्यात आल्या. त्याचप्रमाणे या योजनेखाली सामाजिक परिवर्तनाला साहाय्यभूत होणारे परिसंवाद, कार्यशाळा, नियतकालिके वगैरेंसारख्या महाराष्ट्रातील उपक्रमांना आर्थिक साहाय्य दिले जाते.

ट्रस्टच्या १९६० साली बांधलेल्या वास्तूमध्ये व १९९९ साली गोरेगावातील तीन डोंगरी येथील झोपडपट्टीत बांधलेल्या वास्तूमध्ये ट्रस्टचे कार्य चालते. ❑



उषा रविकांत साव यांचे एका मोटर अपघातात या वर्षी दु:खद निधन झाले. अमेरिकेतील न्यू जर्सी येथील मराठी माणसांसाठी काम करणारी 'मराठी विश्व' नावाची संस्था आहे. या संस्थेची मूळ संकल्पना त्यांचीच. त्या संस्थेच्या उषा साव या एक आधारस्तंभ होत्या. गरजू व्यक्तीला मदत करणे हा त्यांचा स्थायीभाव होता. आपल्या नोकरीच्या फावल्या वेळात त्या मराठी समाजाच्या परंपरा जपण्यासाठी मराठी समाजामध्ये अनेक प्रकारे निरपेक्षपणे काम करीत असत. त्यांच्या कार्यामुळे त्यांनी मोठा मित्र-परिवार जमविला होता.

त्यांची निरंतर स्मृती आम्हाला भविष्यकाळात प्रेरणादायी होवो.



# सुनील देशमुख

सुनील देशमुख हे मूळचे सांगलीचे. १९६४ साली एस.एस.सी. परीक्षेत बोर्डात चौथ्या क्रमांकाने उत्तीर्ण झाल्यावर शिक्षणासाठी ते मुंबईत आले. १९७० साली मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून बी.केम. ही पदवी त्यांनी प्राप्त केली. पुढील शिक्षणासाठी ते अमेरिकेत गेले.

अमेरिकेमध्ये एम.एस. (केमिकल इंजिनिअरिंग), एम.बी.ए. या पदव्यांबरोबरच जे.डी. ही कायद्याची पदवीही त्यांनी मिळविली. अमेरिकेत वकिली करण्याचा परवानाही त्यांनी प्राप्त केला.

नंतर अमेरिकेतच कमॉडिटी ट्रेडर म्हणून वॉलस्ट्रीटवर त्यांनी अनेक वर्षे यशस्वी व्यवसाय केला.

आज गिरीश, निशा व सुशील या तीन मुलांसह ते व त्यांची पत्नी प्रतिभा (पूर्वाश्रमीच्या प्रतिभा टिळक) अमेरिकेत स्थायिक झाले आहेत.

व्यवसायात नेत्रदीपक यश मिळवणाऱ्या श्री. सुनील देशमुख यांना साहित्य व समाजसेवा यांविषयी विशेष आस्था आहे. व्यवसायातून स्वेच्छेने निवृत्त झाल्यापासून आठवड्यातील काही काळ ते सामाजिक कामासाठी आवर्जून देत असतात.

मराठी भाषा, समाज व संस्कृती यांबद्दल त्यांना प्रेम व कळकळ आहे. हे ऋण फेडण्याचा अल्पसा प्रयत्न म्हणून 'महाराष्ट्र फाउण्डेशन'ला एक कोटी रुपयांची देणगी देऊन १९९४ पासून 'महाराष्ट्र फाउण्डेशन मराठी साहित्य पुरस्कार योजना' त्यांनी सुरू केली. 'केशव गोरे स्मारक ट्रस्ट' आयोजित 'महाराष्ट्र फाउण्डेशन समाजकार्य पुरस्कार योजने'मागेही सुनील देशमुख यांचीच प्रेरणा आहे.

Sunil Deshmukh
Tele/Fax. : 305-918-0755
email : sunild@aol.com

# 'महाराष्ट्र फाउण्डेशन'कडून अनुदान मिळविण्याकरता प्रक्रिया

महाराष्ट्रातील सामाजिक काम करणाऱ्या व ज्यांचे आर्थिक व्यवहार पारदर्शक आहेत अशा संस्थांकडून अभिनव प्रकल्पांचे 'महाराष्ट्र फाउण्डेशन' स्वागतच करते. **अशा संस्था एफ.सी.आर. ॲक्टखाली** (Foreign Contribution Act) **केंद्र सरकारच्या गृहखात्याकडे नोंदणी केलेल्या असणे, प्राप्तीकर कायद्याच्या ८०-जी कलमाप्रमाणे त्यांच्यापाशी दाखला असणे आवश्यक आहे.** एफ.सी.आर. नोंदणीशिवाय प्रस्तावाचा विचार होऊ शकणार नाही.

'महाराष्ट्र फाउण्डेशन'कडे अनेक संस्थांकडून अनुदानासाठी नवीन प्रकल्प सतत येत असतात. हे अर्ज स्वीकारताना पुढील निकष लावले जातात :

- ❖ संस्था समाजातील खालच्या थराकरता कार्य करणाऱ्या, स्थिरावलेल्या व काही प्रकल्प यशस्वीपणे राबवलेल्या असावयास हव्यात.
- ❖ संकल्पित प्रकल्पाचा वा योजनेचा उद्देश गरीब व दुर्बल (vulnerable) अशा समाजघटकांचे जीवनमान गुणात्मकदृष्ट्या सुधारणारा असायला हवा.
- ❖ प्रकल्पाचे लाभ दीर्घ काळ टिकणारे व दारिद्र्य दूर करणारे असायला हवेत.
- ❖ शिक्षण, आरोग्य, आर्थिक सक्षमीकरण, पर्यावरण व स्त्रियांचे सबलीकरण ही महाराष्ट्र फाउण्डेशनच्या कार्याची प्रमुख क्षेत्रे आहेत.

**महाराष्ट्र फाउण्डेशनकडे साहाय्यासाठी येणाऱ्या प्रस्तावाचे स्वरूप थोडक्यात (४ पृष्ठापर्यंत) असे असावे :**

- ❖ प्रकल्पाची पार्श्वभूमी : स्थानिक परिस्थितीचे विश्लेषण व प्रकल्पाची गरज.
- ❖ प्रकल्प : प्रकल्प कशाकरता (थोडक्यात), संकल्पित कामाचे स्वरूप; त्या कामाचे फलित.
- ❖ प्रकल्पाकरता संस्थेकडे असलेले विशेष तज्ञ मार्गदर्शक व संस्थेचा त्या क्षेत्रातील अनुभव.
- ❖ खर्चाचे अंदाजपत्रक : प्रकल्पाच्या पूर्तीकरता लागणारे मनुष्यबळ, साहित्य व सामान, कार्यालय, प्रवास व इतर खर्चाचे अंदाज. (एक पृष्ठ).
- ❖ प्रकल्प पूर्ण होण्याचा अपेक्षित काळ.
- ❖ प्रकल्पाची कार्यवाही व देखरेख करणाऱ्या प्रमुख व्यक्तींची नावे.
- ❖ संस्थेला मदत करणाऱ्या इतर देशी व विदेशी संस्थांची नावे.

(या पत्रासोबत इतर कागदपत्रे जोडू नयेत.)

महाराष्ट्र फाउण्डेशनकडे नवीन प्रकल्पांच्या सूचना सतत येत असतात; परंतु आलेल्या सर्व प्रकल्पांचा विचार वर्षातून एकदाच केला जातो. प्रकल्पाविषयी अधिक माहिती आवश्यक वाटल्यास ती त्यावेळी मागविण्यात येते.

जर महाराष्ट्र फाउण्डेशनकडे आलेला प्रकल्प स्वीकारला गेला, तर संस्थेला तसे कळवून संस्थेशी करार केला जातो. करारावर सह्या झाल्यावर मंजूर केलेल्या रकमेपैकी पहिला हप्ता संस्थेकडे पाठविला जातो. प्रकल्पाच्या प्रगतीचा अहवाल व खर्चाचा तपशील कळविल्यावर मंजूर अनुदानाचे पुढील हप्ते दिले जातात व प्रकल्प पूर्ण झाल्याचा अहवाल पाठविल्यानंतर अनुदानाचा शेवटचा हप्ता पाठविला जातो.

**अनुदानासाठी महाराष्ट्र फाउण्डेशनकडे मोठ्या प्रमाणावर सूचना येत असल्यामुळे वरील निकष लावून त्यातील काही प्रकल्पांचीच निवड करणे महाराष्ट्र फाउण्डेशनला शक्य होते.**

महाराष्ट्र फाउण्डेशनशी करावयाचा पत्रव्यवहार e-mail द्वारा करणे हे सोयीचे आहे. हा पत्रव्यवहार महाराष्ट्र फाउण्डेशनच्या अध्यक्षांच्या नावे (sunitadhumale@yahoo.com) करावा.

संस्थेकडे e-mail ची सोय उपलब्ध नसेल तर अशा संस्थेने आपली वरील प्रकारची माहिती महाराष्ट्र फाउण्डेशनच्या पुढील पत्त्यावर पाठवावी :

Maharashtra Foundation C/o. Ramesh Sarva, CPA PC,
Post Box No. 750-250, 109-17, 72nd Road, No. 6-R, Forest Hills,
Newyork 11375, USA., 718-268-6906-269-6906

प्रवेश ज्यांना कधि न महाली
घरे जयांची आणि पथावरी
खरेच वारस असती जे परि-
बुध्दाचे ख्रिस्ताचे
त्यांचे राज्य उद्याचे